सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, ०७ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २२३ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अमेरिकेत पुन्हा ट्रम्प सरकार!

## कमला हॅरिस यांना पराभूत करत डोनाल्ड ट्रम्प यांनी मिळवला दणदणीत विजय

वॉशिंग्टन : संपूर्ण जगाचे लक्ष लागलेल्या अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प यांनी डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांना पराभूत करत दणदणीत विजय मिळवला आहे.

अटीतटीच्या लढतीत डोनाल्ड ट्रम्प यांनी मतमोजणीला सुरुवात झाल्यापासूनच जोरदार मुसंडी मारत कमला हॅरिस यांच्यावर विजयी आघाडी घेतली. डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेचे ४७वे राष्ट्राध्यक्ष म्हणून जानेवारी महिन्यात शपथ घेतील. अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत विजयी होण्यासाठी ५३८ इलेक्टोरल मतांपैकी २७० मतं मिळवणं आवश्यक असतं. दरम्यान आतापर्यंत ४८१ निकाल हाती आले असून, त्यामध्ये डोनाल्ड ट्रम्प यांना २६७ इलेक्टोरल मतं मिळाली आहेत. तर कमला हॅरिस यांना २१४ इलेक्टोरल मतं मिळाली आहेत. मात्र डोनाल्ड ट्रम्प हे विस्कॉंसिन, मिशिगन, ॲरिझोना, नेवाडा आणि अलास्का या राज्यांमध्ये आघाडीवर असल्याने ते तीनशेपार मजल मारतील, अशी शक्यता आहे.

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयाने पंतप्रधान मोदी झाले खुश



डोनाल्ड ट्रम्प पुन्हा एकदा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी विराजमान होणार असल्याचं आता स्पष्ट झालं आहे. जागतिक महासत्ता अमेरिकेच्या चाव्या आता डोनाल्ड ट्रम्प यांच्या हातात गेल्या आहेत. भारताबरोबर डोनाल्ड ट्रम्प यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ते खूप चांगले मित्र आहेत. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांचे अभिनंदन केलं आहे.

निवडणुकीतील ऐतिहासिक विजयाबद्दल माझे मित्र डोनाल्ड ट्रम्प यांचे मनापासून अभिनंदन. तुम्ही तुमच्या मागील कार्यकाळात चांगली कामगिरी केलीत. भारत-अमेरिका व्यापक जागतिक आणि धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत करण्यासाठी मी उत्सुक आहे. आपल्या लोकांच्या भल्यासाठी आणि जागतिक शांतता, स्थिरता आणि समृद्धीसाठी एकत्रितपणे काम करूया, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलंय.

अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक अत्यंत चुरशीची होईल, असा अंदाज होता. प्रत्यक्षात रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार आणि माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक राज्यांमध्ये मुसंडी मारली आणि डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांची समीकरणे बिघडवली. पेनसिल्वेनिया, जॉर्जिया ही महत्त्वाची मोक्याची राज्ये (स्विंग स्टेट्स) रिपब्लिकन पक्षाने डेमोक्रॅट्सकडून खेचून आणली. नॉर्थ कॅरोलिना या आणखी एका निर्णायक राज्यात डोनाल्ड ट्रम्प यांनी विजय मिळवला.

**अमेरिकेला पुन्हा महान बनवण्याचा केला उल्लेख**

आपला देश आता आपण कधीच नव्हता इतका उत्तम बनवणार आहोत. हे यश आपल्या सगळ्यांना एकत्र आणणार आहे. आपल्याला सर्व समस्या सोडवायच्या आहेत. आपण सगळे मिळून अमेरिकेला पुन्हा महान बनवू शकतो. त्यामुळे मला हे संगण्यात अतिशय आनंद होतोय की हे करणं ही माझ्यासाठी अभिमानास्पद बाब आहे. मी तुमचा अपेक्षाभंग करणार नाही. अमेरिकेचं भविष्य आणखी विशाल, आणखी चांगलं, आणखी श्रीमंत आणि आणखी सामर्थशाली असेल. देव तुम्हा सर्वांवर कृपा करो, असं डोनाल्ड ट्रम्प आपल्या विजयी भाषणात म्हणाले.

‘खटाखट’ खोटं आश्वासन देणाऱ्यांपासून सावधान!
महिलांच्या हक्कावर दरोडा,
काँग्रेसचा हाच खरा चेहरा
बोलणं मोठ्ठं
कर्नाटकमध्ये गृहलक्ष्मी योजनेअंतर्गत महिलांना दरमहा रु. २००० देणार
तेलंगणामध्ये महालक्ष्मी योजनेअंतर्गत महिलांना दरमहा रु. २५०० देणार
हिमाचल प्रदेशमध्ये महिलांना दरमहा रु. १५०० देणार
लक्षण खोट्टं
कर्नाटकमध्ये महिलांना फसवून त्यांचा अपमान केला
तेलंगणामध्ये महिलांची फसवणूक केली
हिमाचल प्रदेशातील महिलांचा विश्वासघात केला
Published By: Bharatiya Janata Party, Maharashtra | C.D.O Barrack No. 1, Nariman Point, Mumbai - 400020
महिला विरोधी काँग्रेसने नेहमीच आपल्या खोट्या वचनांमुळे नारी शक्तीचा अपमान केला

# राज्य सरकारने डीजीपी संजय वर्मांची ‘तात्पुरती नियुक्ती’चा आदेश का काढला? : काँग्रेसचा न्यायालयात जाण्याचा इशारा

### निवडणूक आयोगाला लिहिले पत्र

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.६ नोव्हेंबर,: आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला यांना पोलीस महासंचालक पदावरून हटवून निवडणूक आयागाने संजय वर्मा यांना पोलीस संचालकपदी नियुक्त करताना काढलेल्या आदेशात तात्पुरती नियुक्ती असा उल्लेख केलेला नाही, तरीही राज्य सरकारच्या आदेशात मात्र तात्पुरती नियुक्ती असा उल्लेख का करण्यात आला? या संदर्भात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले मुख्य निवडणूक आयोगाला पत्र लिहिले आहे.

२४ तासाच्या आत वर्मा यांच्या कायमस्वरूपी नियुक्तीचे आदेश काढा, अन्यथा न्यायालयात याचिका दाखल करु, असा इशारा प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी दिला आहे.

याबाबत लोंढे म्हणाले की, रश्मी शुक्ला यांना मिळालेली मुदतवाढ ही फक्त पोलीस महासंचालक पदासाठीच होती, दुसऱ्या कोणत्याही पदासाठी नाही, त्यांनी वयाची ६० वर्ष पूर्ण केलेली आहेत आणि ज्याक्षणी निवडणूक आयोगाने त्यांना पोलीस महासंचालक पदावरून हटवले त्याक्षणी त्या कायद्यानुसार निवृत्त झालेल्या आहेत, असे असताना त्यांना सक्तीच्या रजेवर कसे पाठवले जाते. महाराष्ट्रात एकच अधिकारी सरकारच्या सर्वात लाडक्या आहेत का, रश्मी शुक्लाच का, दुसरे अधिकारी नाहीत का, सदानंद दाते, रितेशकुमार, संजय वर्मा, फणसाळकर हे सक्षम अधिकारी नाहीत का? शुक्ला निवृत्त झाल्या तरी त्यांच्यासाठी वेगळा कायदा लावला जातो, कायद्याचा चुकीचा अर्थ काढून त्यांना नियुक्ती दिली जाते.

# राहुल गांधींचें संविधान वाचवणे फडणवीसांना शहरी नक्षलवाद वाटतो का? : नाना पटोले

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.६ ऑक्टोबर:

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नागपुर मधील पहिल्याच कार्यक्रमाने भारतीय जनता पक्ष व देवेंद्र फडणवीसांची पळता भुई थोडी झाली असून घाबरलेल्या फडणवीसांचे ताळतंत्र सुटल्याने ते राहुल गांधींवर खोटे आरोप करून बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत.संविधानाच्या पुस्तकाचा रंग लाल, पिवळा का काळा असावा हे ठरविण्याचा अधिकार संविधान विरोधी लोकांना नाही. संविधान वाचवणे भाजपा व फडणविसांना शहरी नक्षलवाद वाटतो का? , असा सवाल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बुधवारी उपस्थित केला.

फडणवीस यांनी राहूल गांधी अर्बन नक्षली संघटनाच्या संपर्कात असल्याबद्दलच्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिले.भारत जोडो यात्रेत राहुल यांच्यासोबत चालणारी मराठी माणसे शहरी नक्षलवादी आहेत का?, असा सवाल विचारून फडणवीसांनी भारत जोडो यात्रेत सहभागी झालेल्या महाराष्ट्रातील सर्व नागरिकांची माफी मागावी, अशी मागणी करुन ते म्हणाले, राहुल हे संविधान ‘बचाओ’ची भूमिका हाती घेत संविधानाचे पुस्तक दाखवत



असतात. ज्या लोकांनी आरक्षण व संविधानाला विरोध केला, संविधान जाळले त्या व्यवस्थेच्या बाजूला भाजपाच्या शक्तीस्थळाजवळच सुरेश भट्ट सभागृहात राहुल गांधींचा संविधान संमेलन कार्यक्रम झाला, त्यामुळे भाजपाचा जळफळाट झाला आहे. केरळमध्ये डाव्या पक्षाचे सरकार आहे, पश्चिम बंगालमध्ये अनेक वर्षे डाव्या पक्षांचे सरकार होते, देशात आजही डाव्या पक्षाचे आमदार, खासदार आहेत, त्यांना मतदान करणारे देशविरोधी आहेत का? आणि भाजपाला तसे वाटत असेल तर केंद्रात त्यांची सत्ता आहे फडणविसांनी कारवाई करावी. कोणालाही देशभक्तीचे किंवा देश विरोधाचे सर्टिफिकेट देण्याचा अधिकार भाजपाला कोणी दिला?, अशी विचारणा त्यांनी केली.

# वाळूज महानगरवासिय मोबाइल टॉवरपासून निघणाऱ्या विकिरणांच्या तोंडी

वाळूज महानगर (प्रतिनिधी): वाळूज महानगर रहिवासी क्षेत्रात झपाट्याने वाढणा-या मोबाइल टॉवरच्या जाळ्यामुळे सर्वसामान्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. रहिवासी मोबाइल टॉवरपासून निघणाऱ्या विकिरणांच्या तोंडी येत असून यामुळे अनेकांना नानाविध प्रकारचे विकार होण्याची शक्यता वाढली आहे. चार ते पाच किलोमीटरच्या परिघासाठी केवळ दोन उंच टॉवर पुरेशे आहेत. असे असतानाही केवळ खासगी मोबाइल कंपन्यांच्या स्पर्धेतून रहिवास क्षेत्रात चक्क मोबाइल टॉवर उभारण्यात आले आहेत. गच्चीवर मोबाइल टॉवर लावण्यासाठी घर किंवा गच्ची उपलब्ध करून देणाऱ्यांना महिन्याकाठी दहा ते १३ हजार रुपयांचे मासिक उत्पन्न मिळते. ताजा पैसा मिळत असल्याने मोबाइल टॉवरमुळे भविष्यात आपण किंवा आपल्या कुटुंबीयांना काय नुकसान होऊ शकते याकडे मात्र कानाडोळा करण्यात येतो. मोबाइल टॉवर असलेल्या घरात एक मंद आवाज सतत सुरू असतो. या घरात प्रवेश केल्यावर नवीन व्यक्तीस त्याची जाणीव होते. मात्र, सरावाचा भाग झाल्याने गच्ची मोबाइल टॉवरसाठी भाड्याने देणा-यांना याची जाणीव होत नाही. जास्तवेळ मोबाइल टॉवरच्या सानिध्यात राहिल्यास मात्र कालांतराने किडनी, हृदय किंवा शरीराच्या वेगवेगळ्या अवयवांवर परिणाम होतो, याबाबत जनजागृतीची गरज आहे.



नियमानुसार ०. ४ मिलीवॉट प्रती वर्ग सेंटीमीटर रेंज असावी. मात्र, ती कधी ४. ६ मिलीवॉट होते. ढगाळ वातावरणात रेंजचा प्रश्न निर्माण झाल्यास ती ६ मिलीवॉट पेक्षा अधिक धोके दायक असते. मात्र याकडे दुर्लक्षच होते.

**मोजण्यासाठी यंत्रणाच नाही**

ध्वनीलहरी किती प्रमाणात निघतात आणि त्याचा मानवी जीवावर किंवा पशुपक्ष्यांवर काय परिणाम होतो ? याकडेही कोणाचे लक्ष नाही. प्रदूषण नियंत्रण बोर्ड किंवा कोणत्याही खासगी संस्थेचे फ्रिक्वेंसी मापक यंत्र नाही. यामुळे मोबाइल कंपन्यांनी किती प्रमाणात फ्रिक्वेंसी वाढविली याची पुसटशीही कल्पना ग्राहक किंवा पर्यावरणवाद्यांना माहिती नाही.

**टॉवरमुळे होणारे विकार**

मोबाइल टॉवरमधून निघणा-या किरणांमुळे मानवी शरीरावर परिणाम होतो. मोबाइल ध्वनीलहरींच्या अधिक संपर्कास आल्यास कॅन्सर, दृष्टी कमी होणे, चिडचिडेपणा, नकारात्मक विचार, सतत डोके दुखणे, शारीरिक कमजोरी, थकवा येणे, अंगाला खाज येणे, जळजळ होणे, लहान मुलांत विकृती निर्माण होते. रेडिएशनचे विकार दीर्घकालिन आहेत.

**मापदंडांना धाब्यावर बसवून टॉवर उभारणी**

मोबाइल टॉवरपासून किती फ्रिक्वेंसी सोडण्यात यावी यासाठी मापदंड आहेत. अणू संशोधन केंद्राने त्याचे प्रमाणही सांगितले आहे. मात्र, याकडे सर्वच खासगी कंपन्या दुर्लक्ष करतात. रहिवासी असलेल्या जागेवर मोबाइल टॉवर नसणे हा उत्तम पर्याय आहे.

# आयकर विभागाचे शहरात छापे

छत्रपती संभाजीनगर : दिवाळी संपताच आयकर विभाग सतर्क झाली असून आज (दि.६) सकाळीच आयकर विभागाच्या पथकाने व्यापाऱ्यांवर धाडसत्र सुरू केले आहे. शहरातील एका किराणा व्यापाऱ्याची पथकाने चौकशी सुरू केल्याची माहिती सुत्रांनी दिली. सुत्रांच्या माहितीनुसार जुना मोंढा - परिसरात असलेल्या किराणा दुकानावर - आयकर विभागाचे पथक धडकले.त्याच बरोबर या व्यापाऱ्याच्या सिडको परिसरातील घरीही आयकर विभागाच्या पथकाने INCOME TAX D DEPARTMENT छापा टाकला. याच व्यापाऱ्याच्या वैजापूर येथील दुकानावर तसेच घरीही आयकर विभागाचे पथक ठाण मांडून आहे. सदर व्यापारी गहू, रवा, मैदा आदी मालाचे होलसेल सप्लायर आहेत.

आणखीही काही व्यापारी रडारवर आयकर विभागाने गुप्त माहितच्या आधारे शहरात छापेमारी सुरू केली आहे. होलसेल किराणा व्यापारी तसे इतरही काही व्यवसायिक आयकर विभागाच्या रडारवर असल्याचे समजते. याबाबत आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी काहीही सांगण्यास नकार दिला आहे. मात्र या धाडसत्राने शहरातील व्यापाऱ्यांत मात्र खळबळ उडाली आहे.

# भाजपाकडुन ४० पदाधिकाऱ्यांची हकालपट्टी; बंडखोरी, पक्ष विरोधी कारवायांसाठी ६ वर्षासाठी निलंबन

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि ६ ऑक्टोबर : विधानसभा निवडणुकीत बंडखोरी, पक्षविरोधी कारवाया व शिस्तीचा भंग करणाऱ्या ४० पदाधिकाऱ्यांची भाजपाने पक्षातून हकालपट्टी केली आहे.त्यामध्ये श्रीगोंद्यातून अधिकृत उमेदवारी जाहीर केले असताना मुलासाठी माघार घेणाऱ्या सुवर्णा पाचपुते,सोलापूर शहर - उत्तरमधील शोभा बनशेट्टी अक्कलकोट मधील सुनील बंडगर आदींचा समावेश आहे. ३७ विधानसभा मतदारसंघातील हे ४० पदाधिकारी असून पक्षशिस्तीचा भंग करणाऱ्या अन्य काहीजणांची लवकरच हकालपट्टी करण्यात येईल,असे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

महायुतीत जागावाटपावरुन मित्रपक्षांमध्ये रस्सीखेच सुरू होती. त्यामुळे काही जागा शिंदे गट व अजित पवार गटाला सोडाव्या लागल्याने भाजपच्या अनेक नेत्यांना बंडखोरीचे हत्यार उपसले होते. त्यामध्ये माजी खासदार हिना गावित, गोपाळ शेट्टी यांचाही समावेश होता.शेट्टी यांची समजूत काढण्यात पक्षक्षेष्ठींना यश आले.मात्र गावित या निवडणूक रिंगणात कायम असून त्यांनी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्याशिवाय पक्षविरोधी कारवायांमुळे ४० जणांची हकालपट्टी करण्यात आली आहे.

हकालपट्टी करण्यात आलेल्यांची मतदारसंघनिहाय नांवे अशी: धुळे ग्रामीण - श्रीकांत करर्ले, सोपान पाटील, जळगांव शहर - मयुर कापसे, आश्विन सोनवणे, श्रीगोंदा-सुवर्णा पाचपुते,सोलापूर शहर - उत्तर- शोभा बनशेट्टी, अक्कलकोट - सुनील बंडगर, अकोट - गजानन महाले, वाशिम - नागेश घोपे , बडनेरा - तुषार भारतीय , अमरावती - जगदीश गुप्ता, अचलपूर - प्रमोद सिंह गडरेल , साकोली - सोमदत्त करंजेकर , आमगांव- शंकर मडावी , चंद्रपूर - ब्रिजभूषण पाझारे , ब्रम्हपूरी - वसंत वरजुरकर , वरोरा - राजू गायकवाड, अतेशाम अली उमरखेड - भाविक भगत, नटवरलाल उंतवल, नांदेड उत्तर - वैशाली देशमुख, मिलिंद देशमुख, नांदेड दक्षिण- दिलीप कंदकुर्ते, सुनील मोरे, संजय घोगरे, घणसावंगी - सतीश घाटगे जालना - अशोग पांगारकर गंगापूर- सुरेश सोनावणे, वैजापूर -एकनाथ जाधव, मालेगांव बाह्य - कुणाल सूर्यवंशी, बागलान- आकाश साळुंख, जयश्री गरुड, नालासोपारा- हरिष भगत, भिवंडी ग्रामीण- स्नेहा देवेंद्र पाटील, कल्याण पश्चिम - वरुण सदाशिव पाटील, मागाठणे - गोपाळ जव्हेरी, जोगेश्वरी पूर्व- धर्मेंद्र गोपीनाथ ठाकूर, अलिबाग - दिलीप भोईर, नेवासा - बाळासाहेब मुरकुटे व सावंतवाडी - विशाल प्रभाकर परब.

# राहुल गांधींचें संविधान पुस्तक कोरे असल्याचा व्हिडिओ भाजपकडून ट्विट

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.६ नोव्हेंबर:

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचा अपमान करणाऱ्या राहुल गांधींचा भाजपकडून निषेध करण्यात आला आहे.

भाजपने आपल्या एक्स अकाऊंटवरून त्याबाबत म्हटले आहे की,आरक्षण विरोधी खछ्उखपवळर ची ही संविधान संपवण्याची पहिली पायरी तर नाही ना ?संविधान सिर्फ बहाना है. लाल पुस्तक को बढ़ाना है मोहब्बत के नाम पर सिर्फ नफरत फैलाना है.काँग्रेसला भारताचे संविधान असेच कोरे करायचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले सर्व कायदे अनुच्छेद वगळून टाकायचे आहेत. म्हणूनच तर राहुल गांधींनी मध्यंतरी आरक्षण रद्द करणार ही भविष्यवाणी केली होती.

पंचायत समिती व ग्रामसेवक संघटना कंधार
यांच्यावतीने सर्व जनतेस दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
: शुभेच्छुक :

महेश पाटील मा.ग.वि.अ. | देऊबाई शिंदे महिला उपाध्यक्ष | शिवाजीराव पानपट्टे वि.अ.(पै.) | विलास नारनाळीकर अध्यक्ष | एम.बी. शिंदे कार्याध्यक्ष | जगदेव शिंदे सचिव | छत्रपती हालगे सदस्य
श्रीमती एस.के. दिपके, श्रीमती आर.पी. पोटे, श्रीमती एस.एस. डोईजड, श्रीमती ए.एस. मुंडकर, श्रीमती लता पैनापल्ले, श्रीमती व्हि.बी. पवार, श्रीमती पी.टा. निलपत्रेवार, श्रीमती जि.एस. बुद्धेवार, श्रीमती एम. जी. ऊतकर, श्रीमती एम. के. महाजन, श्रीमती. के. यु. राठोड
प्रकाशक : ग्रामसेवक संघटना ता. शाखा कंधार, जिल्हा नांदेड.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महायुतीच्या विधानसभा निवडणुक प्रचाराचा किनवट येथून नारळ फुटणार

## किनवट येथे महायुतीचे उमेदवार भीमराव केराम यांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री फडणवीस यांची आज जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा**
**माहूर/किनवट,दि. ०६ नोव्हेंबर**

राज्यात आता विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली असून,राजकीय पक्ष,युती, आघाडी या सर्वांनी आपापले स्टार प्रचारक निवडणुकीच्या मैदानात प्रचारासाठी उतरविले आहेत. ०८३ किनवट विधानसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी महायुतीचे उमेदवार आ.भिमराव रामजी केराम यांच्या प्रचारार्थ आज गुरुवार दि.७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता किनवट येथे हुतात्मा गोंडराजे शंकरशहा रघुनाथशहा मैदानावर आयोजित भाजपची बुलंद तोफ म्हणून ओळखले जाणारे भाजपचे नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशाल सभेच्या आयोजनातून राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या शुभारंभाचा दणक्यात नारळ फुटणार आहे. या विशाल सभेला माहूर तालुक्यातील सुजाण मतदारांसह महायुतीच्या सर्व घटक पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे! असे आवाहन भाजपचे नेते अनिल वाघमारे, तालुका अध्यक्ष कांतराव घोडेकर तथा नगरसेवक सागर महामुने यांनी केले आहे.




०८३किनवट/माहूर विधानसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज मागे घेण्याची डेडलाईन संपल्यानंतर प्रत्यक्षात कोणकोणते उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरणार आहेत,यांचे एकंदरीत राजकीय चित्र स्पष्ट झालेले आहे. सत्ताधारी पाच वर्षांच्या कार्यकाळात केलेल्या विविध विकास कामांच्या भरघोस शिदोरीच्या जोरावर तर त्यांचे विरोधकही सत्ताधाऱ्यांनी केलेल्या कामातील कमतरता व चुकांचा तुनतुना वाजवत राजकीय लढाई जिंकण्यासाठी सज्ज झाले आहेत.उमेदवार निश्चित झाल्यानंतर आता विधानसभा निवडणुकीची खरी रणधुमाळी सुरू झाली असून, मतदारसंघातील नागरिकांच्या टॉप-टू- बॉटम समस्या सोडविण्यासाठी आपलाच उमेदवार कसा कर्तबगार व योग्य आहे हे पटवून देण्यासाठी विविध राजकीय पक्षांच्यावतीने आपल्या वक्तृत्वकलेतून जनतेच्या अंतःकरणाचा ठाव घेणारे धुरंधर नेते,वक्ते,प्रवक्ते हे हुकुमाचे एक्के पिटाऱ्यातून बाहेर काढण्यात आलेले आहेत.त्यात जेवढे स्थितप्रज्ञ शांत स्वभावाचे नेते तेवढेच जोरदार बुलंद तोफ म्हणून ओळखले जाणारे भाजपचे नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे भाजप, शिवसेना (ए.शिं.) व राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) हे प्रमुख व इतर घटकपक्ष सामिल असलेल्या महायुतीचे किनवट/माहूर विधानसभा मतदारसंघ निवडणुकीचे उमेदवार आ.भिमराव केराम यांच्या प्रचारार्थ आज गुरुवारी .७ नोव्हेंबर रोजी स.१० वा. किनवट येथील हुतात्मा शंकरशहा गोंडराजे मैदानावर विशाल सभेला प्रामुख्याने उपस्थित राहून सभेला संबोधित करणार आहेत. या सभेला माहूर तालुक्यातील सुजाण मतदारांसह महायुतीचे सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी,सर्व आघाडी,सर्व सेल,शक्तीकेंद्र व बूथ प्रमुख यांनी मोठ्या संख्येत उपस्थित राहावे, असे विनंतीवजा आवाहन भाजपचे नेते अनिल वाघमारे, तालुका अध्यक्ष कांतराव घोडेकर व नगरसेवक गोपु महामुने यांनी केले आहे.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रामतीर्थ पोलीसांचे पथ संचलन

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. ०६ नोव्हेंबर**



हिंदू धर्मातील पवित्र सण दिवाळी या सणाचे औचित्य साधून व राज्यातील होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्व भुमी वर रामतीर्थ पोलिस ठाण्याचे स.पो.नि. जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली नरसीत पथ संचलन करण्यात आले.

हिंदू धर्मातील अन्य पवित्र सणा पैकी दिवाळी हा सण अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र सण असुन या सणाचे औचित्य साधून.सध्या राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या कार्यकाळात कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचणार नाही यांची खबरदारी घेवून. हिंदू धर्मातील सण अथवा विधानसभा निवडणूकी सारखा लोकशाही उत्सव हा शांततेच्या मार्गाने पार पाडावे आपली सर्वांची जबाबदारी आहे. या अनुषंगाने राम तीर्थचे सहायक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांच्या नेतृत्वा खाली सिमा सुरक्षा बलाची एक अधिकारी ४० जवानांची एक तुकडी. नरसी बिट मधील पोलीस कर्मचार्यासह ता.१ ऑक्टोबर शुक्रवार सकाळी नरसी येथील चार ही राज्य महा मार्गा वरून पथसंचलन करण्यात आले.

या पथसंचलना वेळी पि एस आय शिवाजी नरवाडे,पो हे कॉ शेख साहेब ,अनिल रिंदकवाले सह पो हे कॉ आल्लेवाड साहेब,पो हे कॉ शिवशंकर शिंदे साहेब सह,नरसी बिट मधील सर्व पोलीस प्रशासना चे कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माहूर पोलीसांचे पथ संचलन

**माहूर**-राज्यात २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणूक २०२४ ची आदर्श आचारसंहिता लागू असून, सर्वत्र प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे.त्याचअनुषंगाने ०८३किनवट विधानसभा मतदारसंघ निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर शहरासह तालुक्यात कायदा,



सुव्यवस्था व शांतता अबाधित राखण्यासाठी नांदेड पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांचे मार्गदर्शनाखाली माहूर पोलीस ठाण्याच्यावतीने बुधवार दिनांक ०६ नोव्हेंबर रोजी शहरातील शिवाजी चौक,चक्रधर नगर,दत्त नगर, विठ्ठल मंदिर,महाराणा प्रताप चौक, आंबेडकर चौक,बिरसामुंडा चौक, दत्तचौक (टि-पॉईंट)या प्रमुख मार्गावरून पोलीसांनी रुट मार्च (पथ संचलन) केले. निवडणुक काळात कायदा, सुव्यवस्था, शांतता राखत समाजातील जातीय सलोखा कायम राखण्यासाठी नागरीकांनी प्रशासनास सहकार्य करावे ! असे आवाहन सपोनि शिवप्रकाश मुळे यांनी केले आहे.

यावेळी नागरिकांना आवाहन करताना सपोनि मुळे म्हणाले कि,निवडणुकीदरम्यान पोलीस ठाण्याच्या हद्दीत कुठलीही अनुचित घटना घडू नये, तसेच जातीय सलोखा कायम राहावा,नागरीकांनी सोशल मीडियावर जातीय व सामाजिक, धार्मिक तेढ निर्माण होईल अशी कुठलीही आक्षेपार्ह पोस्ट टाकु नये,आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे असा सूचनावजा कडक इशारा देत ज्या कोणी कायदा सुव्यवस्था शांतता बिघडवण्याचा प्रयत्न केल्यास त्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास नागरीकांनी पोलीस प्रशासनाशी संपर्क करावा,असे सांगत हि निवडणूक शांततेत निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी सर्वांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.तसेच प्रत्येक नागरिकाने राष्ट्रीय कर्तव्य समजून मतदानाचा हक्क बजावला पाहिजे अशी अपेक्षाही सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे यांनी यावेळी व्यक्त केली. बीएसएफचे चार अधिकारी ५० जवान, पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी पथ संचलनात सहभागी झाले होते.

### नांदेड दक्षिण मतदार संघासाठी टोल फ्री क्रमांक

**नांदेड**-विधानसभा सार्वत्रिक निवडणूक ८७ नांदेड दक्षिण अंतर्गत नागरिकांना आचारसंहिता भंग न होण्याच्या संदर्भात किंवा इतर तक्रार असल्यास त्यासाठी टोल फ्री क्रमांक ०२४६२-२९९३८८ दिला आहे. तरी नागरिकांनी आचारसंहिता भंग न होण्याच्या संदर्भात काही तक्रार असल्यास २४ तास या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी केले आहे.

### ग्रामीण पोलिसांनी नदीपात्रात अवैध रेतीमाफीयावर कारवाई करून साहित्य नष्ट केले



# मतदार जनजागृतीसाठी सेल्फी पॉईटचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०६ नोव्हेंबर**

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व रुग्ण सेवा मंडळ सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने मनपा मुख्यालयाच्या बाजुला रुग्ण सेवा मंडळ सार्वजनिक वाचनालयात जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या सहयोगाने मतदार जनजागृतीसाठी सेल्फी पॉइंटचे उद्घाटन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते करण्यात आले आहे. मतदाराला प्रोत्साहन म्हणून मतदानाच्या बोटाची शाई दाखवा आणि मोफत डोळे तपासणी करून घ्या असा उपक्रम आयोजित केला आहे. यावेळी मोठया प्रमाणात मतदानाविषयी जनजागृती करण्यात आली. आज वाचनालयाच्या वतीने बाह्यरुग्ण विभागात व लसीकरण केंद्रात रुग्णाला दिल्या जाणाऱ्या पावती व औषधाच्या कागदावर मी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मी मतदान करणार तुम्ही पण करा असा एक शिक्का देण्यात येत आहे.




याप्रसंगी नांदेड महानगर पालिका उपायुक्त अजितपाल सिंग संधू, शिक्षण अधिकारी व्यंकटेश चौधरी , जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी एस एम पेरके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एच के साखरे, स्वीप ८६ नांदेड़ उत्तरचे संभाजी पोकले व सुनिल मुत्तेपवार व रुग्ण सेवा मंडळाचे सहसचिव प्रा. डॉ. बालाजी कतूरवार यांच्यासह वाचक, रुग्ण व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भोकर येथे तृतीयपंथी मतदारासाठी विशेष कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०६ नोव्हेंबर**

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी स्वीप अंतर्गत विविध उपक्रम घेतले जात आहेत. भोकरमध्ये स्वीप अंतर्गत तृतीयपंथी मतदारांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रम नुकताच घेण्यात आला. या उपक्रमात मतदारांनी मतदान करण्याची शपथ घेतली आणि मतदानासाठी स्वाक्षरी मोहीम तसेच सेल्फी काढून या उपक्रमात सहभाग नोंदवला.

भोकरमध्ये मतदार जागृतीच्या दृष्टीने आयोजित केलेल्या या विशेष कार्यक्रमात तृतीयपंथी मतदारांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. त्यांनी स्वाक्षरी मोहीमेत सहभाग घेतला आणि मतदान करण्याचा संकल्प केला. या उपक्रमाद्वारे तृतीयपंथी मतदारांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून दिली आणि सामाजिक योगदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले.




यावेळी गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे यांनी मतदानाच्या प्रक्रियेतील पारदर्शकता व जबाबदारी या विषयी माहिती दिली. यावेळी सुमन गोणारकर यांनी मतदारांना मतदान प्रक्रियेची माहिती दिली आणि त्यांच्याशी संवाद साधत त्यांनी या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाने तृतीयपंथी मतदारामध्ये एक नवा आत्मविश्वास निर्माण झाला. या कार्यक्रमामुळे त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्यासाठी प्रोत्साहन मिळाले आहे. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी जकियोद्दीन शेख, मिलिंद जाधव, सुधांशु कांबळे आदींची उपस्थिती होती.

# राष्ट्रीय गोंधळी समाज सेवा संघाची नांदेड जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०६ नोव्हेंबर**

राष्ट्रीय गोंधळी समाज सेवा संघाची नांदेड जिल्हा कार्यकारिणी दि. ५ नोव्हेंबर रोजी नांदेड येथे रेमंड शॉप हॉल, श्रीनगर मधील झालेल्या संवाद बैठकीत सेवा संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्राचार्य शिवाजीराव नवरखेले, संस्थापक अध्यक्ष प्रा. राजेश भांडे मराठवाडा सरचिटणीस विक्रम पाचंगे, मराठवाडा/विदर्भ महिला आघाडीच्या अध्यक्षा श्रीमती अर्चनाताई मराठे यांच्या प्रमुख उपस्थितीत गोंधळी समाज बंधू-भगिनीशी संवाद साधून, सर्वानुमते जाहीर करण्यात आली.

शासकीय सेवेत नियोजन डेप्युटी कमिशनर (माजी) राहिलेले किशनराव पाचंगे नांदेड जिल्हाध्यक्ष, आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते नरसिंग सुपलकर, जिल्हाध्यक्ष ग्रामीण दिलीपराव भंडारे, उपाध्यक्ष दशरथ सावळे, उपाध्यक्ष विनोदजी पाचंगे, जिल्हा सचिव चंद्रकात सावळे, सहसचिव



विशाल दुनदुनले, कोषाध्यक्ष चंद्रकात पाचंगे, कार्याध्यक्ष अशोकराव शिंदे, जिल्हा संपर्कप्रमुख राजकुमार काटे, जिल्हा संघटक तर, राष्ट्रीय गोंधळी समाज सेवा संघाच्या नांदेड महिला अध्यक्षा म्हणून श्रीमती अनितताई किशनराव पाचंगे, उपाध्यक्षा सौ. रोहिणी सुनील इंगळे, सचिव सौ. कविता प्रल्हादराव पाचंगे, सहसचिव, सौ. सविता गणपतराव पाचंगे, कार्याध्यक्ष सौ. सुषमाताई अशोक शिंदे यांची नांदेड पदाधिकारी म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी संपन्न झालेल्या गोंधळी समाजाच्या संवाद बैठकीत गोंधळी समाजाच्या प्रगतशील कार्य, संघटन, आर्थिक नियोजन तसेच गोंधळी समाजाच्या अनेक सामाजिक प्रश्नावर चर्चा होऊन त्यावर उपाय या बाबतही चर्चा होऊन गोंधळी समाजातल्या महिलांना पाठबळ देऊनही नारीशक्तीला सामाजिक प्रवाहात आणून विद्यार्थी, कर्मचारीवर्ग यांनाही संघटनेच्या माध्यमातून शक्ती देण्याचे कार्य ठरले. याप्रसंगी राष्ट्रीय गोंधळी समाज सेवा संघाचे संथापक अध्यक्ष प्रा.राजेश भांडे, प्राचार्य शिवाजीराव नवरखेले, विक्रम पाचंगे, विलासराव बडगे यांनी संवाद बैठकीत गोंधळी समाजाच्या सामाजिक प्रगतीबद्दल आपले विचार व्यक्त केले. या बैठकीचे सूत्रसंचालन विनोद पाचंगे यांनी करून नरसिंग सुपलकर यांनी आभार मानले.

# सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी हे देशासाठी आखरी श्वासापर्यंत कार्य करणारे महान नेते: गुणवंत मिसलवाड

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०५ नोव्हेंबर**

सरदार वल्लभभाई पटेल हे थोर स्वातंत्र्य सेनानी होते. देश स्वातंत्र्यासाठी व स्वातंत्र्यानंतर गृहमंत्री पदावर असताना भारतातील संस्थान विलीन करुन देश एकसंघ करुन अखंडता राखली. मराठवाडा हा हैद्राबाद संस्थानातून मुक्त होत नव्हता तेंव्हा पोलिस अ‍ॅक्शन प्लॅन आखून हैद्राबाद संस्थानातून मराठवाडा मुक्ती लढ्यासाठीही मोठे योगदान देणारे महान राजकीय नेते होते म्हणून ते पोलादी पुरुष म्हणून ओळखले गेले. पटेल यांनी मुक्त व्यापार, खाजगी मालकी हक्काचे समर्थन करणारे महान राजकीय नेते म्हणजे सरदार वल्लभभाई पटेल हे होत असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले.



ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. ३१ ऑक्टोंबर २०२४ गुरुवार रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता पोलादी पुरुष, देशाचे पहिले गृहमंत्री, भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांची १४९ वी जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून तर आयर्न लेडी, भारतरत्न, देशाच्या तिसऱ्या पहिल्या महिला पंतप्रधान स्व. इंदिरा प्रियदर्शनी गांधी यांचा ४० वा स्मृतीदिन (पुण्यतिथी) राष्ट्रीय संकल्प दिवस म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

सर्वप्रथम आगार व्यवस्थापक मा.श्री. अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे तर सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक मा.श्री. श्रीनिवास रेणके यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी गुणवंत एच. मिसलवाड यांनी राष्ट्रीय एकता दिवस व संकल्प दिवसाची शपथ (प्रतिज्ञा) सामूहिकरित्या कामगार- कर्मचाऱ्यांना दिली.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक विष्णू हारकळ, श्रीनिवास रेणके, पाळी प्रमुख मनोहर माळगे, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, वाहतुक नियंत्रक बालाजी शिंदे, आनंदा कंधारे, वरिष्ठ लिपीक नितीन मांजरमकर, गुलाम रब्बानी, सौ. श्वेता तेलेवार, सुनीता हुंबे, संगीता वाघमारे, श्रीकांत अंकुशे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रा.प.म. आगारातील कामगार- कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# नांदेडच्या पाच बंडखोरांची पक्षातून हकालपट्टी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०६ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीमध्ये पक्षाने तिकीट दिले नाही, म्हणून महायुतीचा उमेदवार असतानाही अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल करीत बंडखोरी करणाऱ्या महाराष्ट्रातील भाजपच्या ४० पदाधिकाऱ्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर भारतीय जनता पक्षाने राज्यातील वेगवेगळ्या ३७ विधानसभा मतदारसंघातून ४० जणांची हकालपट्टी केली आहे. यात नांदेड उत्तर मधून भाजपशी बंडखोरी करीत अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल करणारे मिलिंद देशमुख, माजी नगरसेविका वैशाली देशमुख, तर नांदेड दक्षिण मतदार संघातून भाजपशी अर्थात महायुतीशी बंडखोरी करून भाजपचे महानगराध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, सुनील मोरे व संजय घोगरे यांचाही समावेश आहे. पक्षाचे पदाधिकारी असून पक्षशिस्तीचा भंग केल्याचा ठपका या बंडखोरांवर ठेवण्यात आला आहे. मंगळवार दि. ५ नोव्हेंबर रोजी, भाजपचे कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी यांच्या स्वाक्षरीनिशी ४० जणांची यादी आज ६ नोव्हेंबर रोजी सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. पक्षासोबत बंडखोरी करणाऱ्या ४० जणांना अखेर बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. पक्षाने सांगूनही उमेदवारी अर्ज मागे न घेतल्याने पक्षाकडून ही कारवाई केल्याचे बोलले जात आहे.

# कर्नाटक आरटीओ कमिशनर कडून सीमा वरती भागाची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ०६ नोव्हेंबर**

देगलूर (प्रतिनिधी) विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सीमावर्ती भागात स्थिर सनियंत्रण पथकामार्फत वाहनांची तपासणी चालू आहे. दि. ०६ नोव्हेंबर बुधवार रोजी दुपारी कर्नाटक राज्यातील आरटीओ कमिशनरने मराठवाडा कर्नाटक सीमेलगत असलेल्या हनेगाव येथील एसएसटी पथकास भेट देऊन चर्चा केली.

महाराष्ट्रात सध्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. सर्वच राजकीय पक्षांचे उमेदवार व कार्यकर्ते पदाधिकारी जोमाने प्रचाराला लागले आहेत. प्रचारादरम्यान काही अनुचित प्रकार होऊ नयेत, आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन व्हावे, मतदारांना डोळसपणे पारदर्शक रित्या मतदान करता यावे यासाठी भयमुक्त वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने निवडणूक विभागाकडून योग्य ती खबरदारी घेतली जात आहे. देगलूर विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी तथा बिलोली उपविभागीय अधिकारी श्रीमती क्रांती डोंबे यांचे मार्गदर्शनाखाली सीमा वरती भागातून जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांची स्थिर सनियंत्रण पथकामार्फत कसून चौकशी केली जात आहे. याशिवाय काही फिरते पथकही संशयास्पद वाहनांची तपासणी करीत आहेत.



**देगलूर बिलोली विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कर्नाटक राज्यातील आरटीओ कमिशनर महाराष्ट्र राज्यातील देगलूर तालुक्यातील हाणेगाव येथील यशस्वी पथकास भेट देऊन पाहणी व चर्चा केली.**

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व देगलूर बिलोली विधानसभेसाठी तेलंगणा, कर्नाटक राज्याच्या सीमेलगत एस. एस. टी. पथक कार्यान्वित करण्यात आले आहेत. दि. ०६ नोव्हेंबर बुधवार रोजी दुपारी कर्नाटकातील आरटीओ कमिशनरनी औराद(कर्नाटक) - वझर दरम्यान असलेल्या हनेगाव येथील टी पॉईंट येथील यशस्वी पथकास भेट देऊन माहिती जाणून घेतली. यावेळी पथक प्रमुख बी. सी. पाठक, सहाय्यक एस डी लुटे, पोलिस कर्मचारी पी. व्ही. बेलकर व पांडुरंग कुंपरसे कॅमेरामन आदींची उपस्थिती होती.

# किनवट विधानसभा निवडणुकीतील रासपचे उमेदवार गोविंद जेठेवार यांचा आत्महत्येचा प्रयत्न

**ययतभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ०६ नोव्हेंबर**

०८३ किनवट विधानसभा मतदारसंघ निवडणुक २०२४ साठी राष्ट्रीय समाज पक्षाकडून निवडणूक लढविण्यासाठी उभे असलेले किनवट उमेदवार गोविंद सांबन्ना जेठेवार यांनी आज दुपारी विषारी औषध प्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न केला.गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी शेजारच्या तेलंगणा राज्यातील आदिलाबाद येथे पाठवण्यात आले.वृत्त लिहिपर्यंत या धक्कादायक घटनेची किनवट पोलीसात नोंद प्रक्रीया चालू होती.



किनवट तालुक्यातील दहेली येथील रहिवासी असलेले सामाजिक कार्यकर्ते गोविंद जेठेवार हे राज्यात सध्या सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकीत नांदेड जिल्ह्यातील किनवट/माहूर मतदारसंघात राष्ट्रीय समाज पक्षाकडून निवडणूक लढवित असलेले एक अधिकृत उमेदवार आहेत. दि.०४ नोव्हेंबर या उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी उमेदवारी अर्ज वैध ठरलेल्या २९ उमेदवारांपैकी १२ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्यानंतर किनवट विधानसभा निवडणुक रिंगणात निवडणुक लढविण्यासाठी उभे असलेल्या १७ अधिकृत उमेदवारांपैकी ते एक होत. निवडणुक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी किनवट यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात आलेल्या निवडणुकीत उभे असलेल्या अधिकृत उमेदवारांच्या यादीत अनुक्रमे ०७व्या स्थानी त्यांचे नाव असून, आजपासून प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली असतानाच आज मंगळवार ०५ रोजी जेठेवार यांनी विषारी औषध प्राषन केल्याने मतदारसंघासह संपूर्ण राज्यातच या अनाहूतपणे घडलेल्या धक्कादायक घटनेने प्रचंड खळबळ उडाली आहे.त्यांनी असे का केले ? याचे नेमके कारण मात्र कळू शकलेले नाही. आज (५ नोव्हेंबर) दुपारी घडलेल्या या थरारक घटनेने संपूर्ण राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. किनवट विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय समाज पक्षाकडून त्यांना उमेदवारी मिळालेली आहे. ऐन निवडणूक प्रचाराच्या रणधुमाळीतच हा प्रकार घडला आहे. एका बैठकीदरम्यान ही घटना घडल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे.

या घटनेनंतर जेठेवार यांना किनवट शहराजवळील गोकुंद्यातील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी घटनेचे गांभीर्य ओळखून त्यांना पुढील उपचारासाठी तेलंगणा राज्याच्या आदिलाबादकडे तात्काळ पाठवले आहे. दरम्यान किनवट पोलीसांत घटनेची नोंद प्रक्रीया चालू असल्याने याविषयीची अधिक माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

# आम्ही मतदान करणार नव मतदारांचा निर्धार



तभा वृत्तसेवा

कन्नड – दि.०६ नोव्हेंबर –विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कन्नड स्वीप पथकाच्या वतीने इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी कन्नड या महाविद्यालयात मतदार जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते स्वीप पथकाचे सदस्य प्रवीण दाभाडे यांनी चला करूया मतदान हे गीत सादर करत उपस्थित विद्यार्थ्यांना, नव मतदारांना आव्हान केले की आपण कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडता राष्ट्रीय कर्तव्य पार पाडलेच पाहिजे असे आवाहन त्यांनी केले यावेळी उपप्राचार्य संतोष मतसागर यांनी सांगितले की आमचे विद्यार्थी आपल्या कन्नड तालुक्याला पुन्हा एकदा मतदानाच्या टक्केवारीत एक नंबर ठेवण्यासाठी प्रयत्नशील राहतील अशी ग्वाही त्यांनी दिली महाविद्यालयातील नव मतदारांनी आम्ही पहिल्यांदा मतदानाचा अधिकार वापरणार आहोत आणि इतरांनाही मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करणार आहोत असे मत व्यक्त केले कार्यक्रमासाठी स्वीप पथकाचे सदस्य दिपक सोनवणे अजित चौधरी, श्रीराम काळे, सागर भोजने, महेंद्र राजपूत, इक्रम पठाण,गोपाल दाभाडे,सोनाली गोरखा, सचिन चव्हाण यांची उपस्थिती होती.

## पंतप्रधानांच्या सभेमुळे धुळ्यात नो फ्लाईंग झोन घोषित; वाहतूक मार्गातही बदल!

धुळे : पंतप्रधान नरेंद्र मोदी ८ नोव्हेंबर रोजी धुळे दौऱ्यावर असणार आहेत. यावेळी ते पांझरापोळ गोशाळा, महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्राजवळ, मालेगाव रोडद्वारे धुळे ठिकाणी येणार आहेत. विधानसभा निवडनुकीच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या दौऱ्यादरम्यान पोलीस सतर्क झाले आहेत. त्यामुळे येत्या शुक्रवारी सभा परिसर ड्रोन उड्डाणास प्रतिबंधित करण्यात आला असून वाहतूक मार्गातही बदल करण्यात आले आहे. जारी झालेल्या आदेशानुसार, या दिवशी हा परिसर कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने नो फ्लाईंग झोन घोषित करण्यात येत आहे. तसेच कोणत्याही प्रकारचे ड्रोन उडविण्यास सक्षम प्राधिकारी यांची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय मनाई करण्यात आली आहे. असेही जिल्हाधिकारी पापळकर यांनी आदेशात नमूद केले आहे.

# मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मतदार जागृती मोहीम राबवा : सिद्धाराम सालीमठ

अहिल्यानगर दि.६– लोकसभा निवडणुकीत कमी मतदान झालेल्या मतदान केंद्रांवर मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी लोकसहभागातून मतदार जागृती मोहीम राबवावी आणि जिल्ह्यात ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होण्यासाठी एकत्रित प्रयत्न करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ, नगरपालिका प्रशासन अधिकारी प्रशांत खांडकेकर आदी उपस्थित होते.

श्री.सालीमठ म्हणाले, मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, रांगेत उभे राहायला सावलीची व्यवस्था, प्रतीक्षा कक्ष, सायंकाळी प्रकाश व्यवस्था, रॅम्प, मतदान कक्षात प्रकाश व्यवस्था, आरोग्य सुविधा, पाळणाघर, व्हीलचेअर आदी किमान सुविधा कराव्यात. मतदारांसाठी आवश्यक सुविधा देऊन त्यांना मतदानासाठी प्रोत्साहित करावे. दोन किंवा अधिक मतदान केंद्र एकच ठिकाणी असल्यास स्वयंसेवकांची नियुक्ती करावी आणि परिसरात सूचना फलक लावण्यात यावे. मतदान केंद्रावर मतदार सुलभपणे पोहोचेल अशी व्यवस्था असावी.

मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्याकरिता जिल्हा प्रशासनातर्फे ई प्रतिज्ञापत्राचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. उपक्रमात सहभागासाठी संकेतस्थळाच्या माध्यमातून मतदान करणार असल्याचे ई – प्रतिज्ञापत्र भरायचे आहे. या उपक्रमासाठी लिंक मिळाल्यानंतर अधिकाधिक व्यक्ती मतदान करण्याचे ई – प्रतिज्ञापत्र भरतील असे प्रयत्न करावेत. प्रतिज्ञापत्र संकेतस्थळावर सादर करणाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने ई प्रमाणपत्र देण्यात येईल.

महिला बचत गट, आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका यांच्या मदतीने मतदार जागृती मोहीम आखण्यात यावी. ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झालेल्या केंद्राच्या परिसरात गृहभेटीद्वारे मतदारांच्या समस्या जाणून घ्याव्यात. अराजकीय सामाजिक आणि सेवाभावी संस्था, व्यक्तींची मदत घेण्यात यावी. सर्व उपक्रम प्रभावीपणे राबवावेत, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

श्री.येरेकर म्हणाले, ग्रामसेवकांनी ग्रामीण भागातील मतदान केंद्रावर भेट देऊन किमान आवश्यक सुविधेची माहिती घ्यावी. स्वीप उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना मतदानाचे आवाहन करावे. यासाठी विविध स्पर्धा आणि उपक्रमांचे आयोजन करा. स्थानिकस्तरावर नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावेत. मतदानाच्या दिवशी दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर आणण्यासाठी सुविधा द्याव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी स्वीप समन्वयक कडुस यांनी मतदार जागृती उपक्रमांची माहिती दिली. कमी मतदान झालेल्या शेवटच्या १० टक्के मतदान केंद्रांवर आणि ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झालेल्या केंद्रांवर विशेष लक्ष द्यावे. ८ नोव्हेंबर रोजी मतदार शपथद्वारे या मोहिमेचा शुभारंभ करावा. पथनाट्य, रांगोळी स्पर्धा, विविध स्पर्धा, मानवी साखळी, पालकांकडून संकल्प पत्र भरून घेणे, लोकशाही दौड, उद्योगातील कामगारांना प्रोत्साहित करण्यासाठी उपक्रम, सेल्फी पॉइंट, सायकल रॅली, गृहभेटीद्वारे मतदारांना मार्गदर्शन आदी उपक्रम राबवावेत, असे आवाहन त्यांनी केले.

बैठकीला तहसीलदार, गटविकास अधिकारी, नगरपालिकांचे मुख्याधिकारी, आरोग्य अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक आदी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# पैठणला ईण्डेण गॅस एजन्सीच्या वतीने ग्राहकांची फसवणूक

तभा वृत्तसेवा पैठण दि ०६ :– उद्यान रोडवरील हॉटेल पार्कवे जवळील ईण्डेणची संत एकनाथ गॅस सर्व्हिसेस कडून ग्राहकांना कमी वजनाचे गॅस सिलिंडर देऊन फसवणूक केल्या प्रकरणी महसूलच्या पुरवठा विभागाने याठिकाणी पंचनामा केला असतांना आता बार व्यवसायिकांच्या मर्जीने याठिकाणी पुन्हा ग्राहकांना कमी वजनाचे गॅस सिलेंडर देऊन फसवणूक केली जात आहे. पैठण शहरात एकमेव असलेल्या या गॅस एजन्सीकडून नेहमीच ग्राहकांना वेठीस धरण्याचा प्रकार होत असून एन दिवाळीला याठिकाणी ग्राहकांच्या वतीने मोठे आंदोलन करण्यात आले. सदरील गॅस एजन्सी अपंग व्यक्तीला देण्यात आली असतांना बार चालकांनी आर्थिक फायद्यासाठी सदरील गॅस एजन्सीचा ताबा घेतल्याचा आरोप होत आहे. केवायसी आणि ईतर कारणाने ग्राहकांना त्रास होत असलेल्या या एजन्सीकडून ग्राहकांना कमी वजनाचे गॅस सिलेंडर देऊन कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली जात आहे.याप्रकरणी नायब तहसीलदार कैलास बहुरे यांच्याशी संपर्क केला असतांना गॅस गोडावूनची तपासणी करून चौकशी करू असे बहुरे म्हणाले.

## रिअल-टाइम ट्रॅकिंगमध्ये क्रांतीचे नेतृत्व

मुंबई : स्विफ्ट च्या सहकार्याने परदेशात पाठवलेल्या निधीसाठी रिअल-टाइम ट्रॅकिंग सेवा देणारी आयडीएफसी फर्स्ट बँक ही पहिली भारतीय बँक ठरली आहे. हे बँकेच्या पुरस्कारप्राप्त मोबाईल ऍप्लिकेशन आणि इंटरनेट बँकिंग प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. ही भारतीय बँकिंग उद्योगातील एक महत्त्वपूर्ण गोष्ट असून अखंड आणि कार्यक्षम बँकिंग सोल्यूशन्स वितरीत करण्यासाठी बँकेच्या वचनबद्धता दाखवून ग्राहक प्रथम दृष्टिकोन कायम ठेवते.भारतातील ग्राहकांना डिजिटल प्लॅटफॉर्मवर रिअल–टाइम स्टेटस अपडेट्स आणि ट्रॅकिंगसह यूपीआई किंवा आईएमपीएस द्वारे डिजिटल पेमेंटची सवय आहे.

पुढील तारीख १७/११/२०२४

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ४९३/२०२४

अर्जदार : मुक्ताबाई हरिभाऊ बोरुडे, वय. ७४ वर्ष धंदा. शेती १. रा. गायत्री नगर, वाळुज, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर २. कैलास हरिभाऊ बोरुडे, वय. ३६ वर्ष धंदा. शेती रा. झेंडा मैदान, धोंबी गल्ली, वाळुज ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ३. जयश्री पाराजी म्हस्के वय ४७ वर्ष धंदा. शेती रा. अखातवाडा ता. पैठण जि.छ. संभाजीनगर

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व कथन केले आहे की,

असे की, अर्जदार नं. १ यांचे सासरे व अर्जदार नं. २ व ३ यांचे आजोबा नामे माणीकराव सावळीराम बोरुडे हे दि. २४/०२/१९८४ रोजी मौजे सावखेडा ता. गंगापूर येथे मयत झाले आहेत. त्याच प्रमाणे मयत माणीकराव सावळीराम बोरुडे यांचा मुलगा व अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल नामे हरिभाऊ माणिकराव बोरुडे हे देखील वाळुज बु. ता. गंगापूर येथे दि. २१/१०/२०२२ रोजी मयत झाले असल्याने अर्जदार यांच्या शिवाय मयत माणीकराव सावळीराम बोरुडे व मयत हरिभाऊ माणिकराव बोरुडे यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही.

असे की, मयत माणीकराव सावळीराम बोरुडे व मयत हरिभाऊ माणिकराव बोरुडे हे दोन्ही शेतमजूर होते व अर्जदार यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी मयत माणीकराव सावळीराम बोरुडे व मयत हरिभाऊ माणिकराव बोरुडे यांचे वारस प्रमाणपत्राची आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की मयत माणीकराव सावळीराम बोरुडे व मयत हरिभाऊ माणिकराव बोरुडे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्दीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत मयत माणीकराव सावळीराम बोरुडे व मयत हरिभाऊ माणिकराव बोरुडे यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

# भाजपाचे पदाधिकारी निस्वार्थ, निरपेक्षपणे, सचोटी व प्रामाणिकपणे उमेदवार आ.जगतापांच्या मागे उभे : ॲड.अभय आगरकर

## शहर भाजप महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांच्या प्रचारात सक्रिय



शहर भाजपाच्या महत्त्वपूर्ण बैठकीत मार्गदर्शन करताना शहर जिल्हाध्यक्ष ॲड.अभय आगरकर, समवेत महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप, सुनील रामदासी, महेंद्र गंधे, प्रा.भानुदास बेरड, , प्रशांत मुथा, अनिल मोहिते, बाबासाहेब वाकळे, महेश नामदे, मयूर बोचूघोळ आदी

नगर – राज्यात तीन पक्षांची महायुती झाल्यावर नगर शहरातील भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस बरोबरची ही पहिलीच बैठक आहे. भाजपचे काही ध्येयधोरणे आहेत. त्यानुसारच काम करून निर्णय घेण्यात येतात. त्यानुसार आजपासून महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांना शहर भाजपचे अधिकृतरीत्या समर्थन देण्यात येत आहे. सर्व पदाधिकाऱ्यांनी विधानसभा निवडणुकीत निस्वार्थ, निरपेक्षपणे, सचोटी व प्रामाणिकपणे काम करून उमेदवार आ.जगतापांच्या मागे उभे राहून त्यांच्या विजयासाठी योगदान द्यावे. महायुतीमधील घटक पक्षांना बरोबर घेत कोणत्याही प्रकारचा संभ्रम व किल्विष न ठेवता जास्तीत जास्त प्रचार व काम करू, असे प्रतिपादन शहर भाजपचे अध्यक्ष ॲड.अभय आगरकर यांनी केले.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या रणधुमाळीत शहर भारतीय जनता पार्टीने महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांच्या प्रचारात सक्रिय होण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मंगळवारी झालेल्या बैठकीत जाहीर केला. आमदार संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांनी भाजपाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना प्रचारात सक्रिय होण्याच्या सूचना केल्या. यावेळी ज्येष्ठ नेते सुनील रामदासी, विधानसभा निवडणूक प्रमुख व महायुतीचे समन्वयक महेंद्र गंधे, माजी जिल्हाध्यक्ष प्रा.भानुदास बेरड, शहर जिल्हा सरचिटणीस सचिन पारखी, प्रशांत मुथा, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मोहिते, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, सरचिटणीस महेश नामदे, प्रदेश सदस्या सुरेखा विद्ये, महिला आघाडी प्रमुख प्रिया जानवे, सविता कोटा, पंडित वाघमारे, बाळासाहेब भुजबळ, मयूर बोचूघोळ आदी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी शहर भारतीय जनता पार्टीचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. भारत माता की जय..., जय श्रीराम..., भारतीय जनता पार्टीचा विजय असो..., अशा घोषणा देत बैठकीत उमेदवार आ.संग्राम जगताप यांचा शहर भाजपच्या वतीने सत्कार करून विजयासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी आ.संग्राम जगताप म्हणाले, भारतीय जनता पार्टीने मला समर्थन देण्याचे जाहीर केल्याबद्दल मी अंत:करणातून आभार व्यक्त करतो. राज्यात पुन्हा महायुतीचीच सत्ता येणार असून नगर जिल्ह्यातही सर्वत जास्त महायुतुचेच उमेदवार निवडून येतील यात शंका नाही. आता मतदानासाठी खूप कमी दिवस राहिले आहेत. या दिवसात सर्वांनी आपापले योगदान देऊन जास्तीत जास्त प्रचार करावा. मझ्या विजयात मोठा सिंहाचा वाटा भाजपचा असेल. या निवडणुकीत काही मंडळी मुद्दाम अपप्रचार करत संभ्रम निर्माण करत आहेत. त्यांच्या अफवांना बळी न पडता नागरिकांमध्ये जागृती करा. भाजप हा राष्ट्रवादी काँग्रेसचा मोठा भाऊ आहे. या निवडणुकीत भाजपने मोठ्या भावाप्रमाणे मदत करावी. मीही छोट्या भावा सारखा तुमच्या बरोबर राहील. राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येण्यासाठी मला पुन्हा संधी द्यावी.

यावेळी प्रा.भानुदास बेरड, सुनील रामदासी, अनिल मोहिते आदींनी विविध सूचना करत मनोगते व्यक्त केले. बैठकीचे प्रास्ताविक सरचिटणीस सचिन पारखी यांनी केले. प्रशांत मुथा व महेश नामदे यांनी सूत्रसंचालन केले. सविता कोटा यांनी आभार मानले.


**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 91- Mukhed | Tushar Govindrao Rathod | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

Name of constituency : 91- Mukhed
Place : Mumbai
Date : 05/11/2024

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 90 - Deglur (S.C.) | Jitesh Raosaheb Antapurkar | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

Name of constituency : 90 - Deglur (S.C.)
Place : Mumbai
Date : 05/11/2024

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 85 - Bhokar | Sreejaya Ashok Chavan | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

Name of constituency : 85-Bhokar
Place : Mumbai
Date : 05/11/2024

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**


# गावठी कट्टा विक्रीसाठी आलेला रिक्षाचालक पोलिसांच्या जाळ्यात

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : सिडको वाळूज महानगर परिसरात गावठी कट्टा विक्री करण्यासाठी आलेल्या रिक्षाचालकास एमआयडीसी वाळूज पोलिसांनी जेरबंद केले असून , त्याच्या ताब्यातून एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे असा ४६ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



एक तरुण सिडको वाळूज महानगरातील जलकुंभाजवळ कमरेला गावठी कट्टा लटकावून फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक शेख सलीम, सहा. फौजदार विलास वैष्णव, बाबासाहेब काकडे, पोकॉ. नितीन इनामे आदींच्या पथकाने सिडकोच्या जलकुंभाजवळ सापळा रचला. सायंकाळी ४ वाजता संशयित तरुण दिसताच त्याला ताब्यात घेतले. अधिक विचारपूस केली असता सय्यद सैफ सय्यद असद उर्फ दादा (२९, रा. कटकट गेट) असे त्याचे नाव सांगितले. सय्यद सैफची अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला देशी बनावटीचा गावठी कट्टा व जिवंत काडतुसे आढळले. कट्टा विक्रीसाठी ग्राहक शोधत असल्याची कबुली त्याने दिली.

## अग्रलेख...

# उदंड जाहली बंडखोरी

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवारांचे अर्ज मागे घेण्याचा दिवस होता ४ नोव्हेंबर २०२४. यात प्रामुख्याने बंडखोरांच्या माघारीवर सर्वांचे लक्ष होते. महाराष्ट्रातील २८८ विधानसभा मतदारसंघांसाठी ही निवडणूक होत आहे. अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यावर चार हजारांवर उमेदवार रिंगणात असून सुमारे तीन हजार उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यातील बहुसंख्य लोक हौसेखातरच उभे झालेले होते. काही मोजके प्रायोजितही होते. राज्याचे एकूण चित्र पाहिले तर दीडशेच्या वर बंडखोरांनी आपली उमेदवारी कायम ठेवलेली आहे. भाजपा, काँग्रेस, शिवसेना-उबाठा, शिवसेना-शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस-अजित पवार असे सहा प्रमुख पक्ष यावेळी मैदानात आहेत. याशिवाय, मनसे, वंचित बहुजन, बसपासारखे छोटे पक्ष आणि मोठ्या संख्येने अपक्षही शड्डू ठोकून आहेत. सहाही प्रमुख पक्षांचे बंडखोर मोठ्या संख्येने रिंगणात कायम आहेत. काहींची बंडखोरी रोखण्यात या पक्षांना यश आले, पण बहुतेकांची मनधरणी यशस्वी ठरलेली नाही. त्यामुळे अनेक ठिकाणी बंडखोरांच्या रूपाने स्वपक्षीय उमेदवार अपक्ष म्हणून किंवा अन्य कुठल्या तरी पक्षाचा म्हणून, कुणाचा भाऊ, कुणाचा नातेवाईक, कुणाचा शत्रू, कुठल्या तरी जातीचा नेता अशा विविध रूपाने उमेदवार दिसत आहेत. विदर्भात ६२ विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यापैकी ३२ मतदारसंघांत बंडखोर कायम आहेत. अशीच परिस्थिती मुंबई, कोकण, पश्चिम व दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही आहे. क्षेत्रानुसार जातींचे गणित बदलते, प्रभाव बदलतात, राजकीय समीकरणे बदलतात; पण बंडखोरीचे लोण सर्वत्र कायम दिसते आहे. या बंडखोरीमुळे महायुती व महाविकास आघाडी या दोन्ही प्रमुख राजकीय आघाड्यांपुढे मोठे आव्हान उभे राहिले असून महाराष्ट्राच्या राजकारणात अपक्ष आमदारांचा बोलबाला तर दिसणार नाही ना, अशी चर्चा आता सुरू झालेली आहे.

१९९९ पर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणात तीनच प्रमुख पक्ष होते. भाजपा-शिवसेना यांची युती होती आणि दुसऱ्या बाजूला काँग्रेस पक्ष होता. छोटे-मोठे पक्ष या दोन प्रवाहांमध्ये सामील झालेले होते. १९९९ मध्ये शरद पवार यांनी सोनिया गांधींच्या नेतृत्वातील काँग्रेसशी काडीमोड घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. हा महाराष्ट्राच्या राजकारणातील चौथ्या पक्षाचा उदय होता. पुढे निवडणुका झाल्या आणि शरद पवारांनी भांडण बाजूला ठेवून काँग्रेसच्या सोबत सत्ता उपभोगली. केंद्रात आणि राज्यातही. त्यानंतर भाजपा-शिवसेना एकीकडे आणि काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस दुसरीकडे, असेच राजकारण दीर्घकाळ चालत राहिले. दरम्यान, शिवसेना व भाजपाचे संबंध ताणले गेले. २०२२ मध्ये उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वातील शिवसेनेची दोन शकले झाली आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात वेगळी शिवसेना स्थापन झाली. त्या पाठोपाठ शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटला आणि अजित पवारांच्या नेतृत्वात वेगळा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन झाला. तीन पक्षांचे अशा तऱ्हेने सहा पक्ष झाले. भाजपा हा न फुटलेला एकमेव पक्ष. भाजपातले काही लोक राजी-नाराजीतून बाहेर गेले, काही परतही आले. पण, भाजपा अद्याप न फुटलेला आणि दमदार असा एकमेव पक्ष आहे. तीच त्याची खरी ताकद आहे. त्यामुळे सर्वांत मोठा पक्ष म्हणून भाजपाचे स्थान यंदाच्या निवडणुकीतही कायम राहील, असे दिसते. तरीही सत्तेची समीकरणे कोणती वळणे घेतात, हे प्रत्यक्षात निकाल लागल्यावर कळेल.

एकाचे दोन पक्ष होतात, तेव्हा दोन प्रवाह आपसूकच त्या पक्षात वाहू लागतात. दोन नेते असतात आणि कार्यकर्त्यांचेही विभाजन होते. आता छोटा असला तरी आपला पक्ष म्हणून अनेकांच्या आशा पल्लवित होतात. प्रत्येकाला आमदार व्हायची घाई असतेच. आमदारकीचे तिकीट मागितले आणि नाकारले गेले तरी नगरसेवक पदाचे तिकीट पक्के होते किंवा विधान परिषद, मंडळ-महामंडळ यांची सोय होते, अशी राजकीय थिअरी आहेच. त्यात भर म्हणून सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांकडे गाजराची गोदामे भरून ठेवलेली असतात. त्यामुळे, आला कार्यकर्ता की दे गाजर, असा कार्यक्रम सुरू राहतो. थोडेसे आठवून पाहा. प्रत्येकाच्या लक्षात येईल की, यंदाच्या निवडणुकीची पृष्ठभूमी अशीच तयार झाली. लोकसभेतील यशामुळे महाविकास आघाडीच्या आशा पल्लवित झाल्या. तिकडे गाजराची मागणी आणि पुरवठा हे दोन्ही वाढले. महायुतीतही थोड्या फार प्रमाणात का होईना, असेच होत राहिले. जे विद्यमान आमदार आहेत, त्यांना आपल्याच युतीतील किंवा आघाडीतील आकांक्षी उमेदवार अडचणीचा वाटू लागला. जे इतके दिवस वाट पाहत होते, त्यांना विद्यमान आमदार नकोसा झालेला. आपले काम सुरू ठेवा, असे अनेकांना त्यांच्या नेत्यांनी सांगितले होते. ते काम करीत राहिले आणि प्रसंग आल्यावर तिकिटावर दावा केला. तिकीट नाकारले गेले तर तो बंडखोर झाला. काही बंडखोरांना असे वाटते की, आपण आपल्या जातीमुळे निवडून येऊ. काहींना असे वाटते की, आपण अपक्ष असलो तरी लोकप्रिय उमेदवार आहोत. काहींचा समज असा आहे की, आपल्याशिवाय देशसेवा करणारे दुसरे कुणीच नसल्यामुळे आपल्याला निवडणूक लढवावीच लागणार. यातही एक मुद्दा लक्षणीय आहे. तो असा की, स्वयंस्फूर्त आणि प्रायोजित अशी दोन्ही प्रकारांची बंडखोरी यावेळी रिंगणात दिसते. काही ठिकाणी बंडखोरांना प्रायोजित करून मत विभाजनासाठी उभे ठेवण्यात आले आहे. ज्यांना छोट्या पक्षांची तिकिटे दिली गेली त्यातील बहुतांशी उमेदवार या रणनीतीचे भाग म्हणून उभे आहेत. पडद्यामागे बराच मोठा व्यवहार झाल्याची चर्चा उगीच होत नसते. काहींची उमेदवारी वरकरणी अपक्ष दिसत असली, तरी त्यांच्या मागे कुठली तरी शक्ती उभी आहे. या साऱ्यांचा परिणाम म्हणून सत्तेची समीकरणे पूर्णपणे बदलतील, असे वाटत नाही. मात्र, अपक्ष आमदारांची संख्या यावेळी अधिक राहील, असा अंदाज वर्तविला जाऊ लागला. तसे झाले तर अपक्ष आमदारांच्या भूमिकेला १९९५ मध्ये आले होते, तसे महत्त्व येईल. त्यात नऊ पक्षांच्या परिवर्तन आघाडीचे उमेदवार आणि मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या आवाहनानुसार काही मतदारसंघात पडणारा फरक हेही मुद्दे असतील. एकुणात असे दिसते की, गतकाळातील फोडाफोडीतून उद्भवलेल्या कार्यकर्त्यांच्या महत्त्वाकांक्षांना विविध पक्षांच्या नेत्यांनी दाखविलेली गाजरे त्यांच्याच अंगावर येऊ लागलेली आहेत. त्यांच्या पक्षाचे नुकसान होते आहे. राजकारणात असे होतच असते. राजकारण म्हणून हे सारे ठीक आहे. इच्छा असेल त्याला निवडणूक लढण्याची मुभा आपल्या देशात आहेच. परंतु, इतक्या मोठ्या संख्येने उमेदवारी, इतक्या मोठ्या प्रमाणात बंडखोरी यातून निवडणुकीचा बाज विस्कटतो. लोकांचे प्रश्न चर्चेत येतच नाहीत. राज्यासमोरील प्रमुख मुद्यांचीही चर्चा होत नाही. नागरिकांनाही अशा गोंधळाच्या परिस्थितीत त्यांचा विचार करता येत नाही. राजकारणाचे गणित हे प्रामुख्याने जात-धर्म आणि मतविभाजन यांच्या भोवतीच फिरत असते. हे वाईट आहे, पण मतदारही याच विषयावर फोकस करतात. बोलत असतात. खरे तर तसे होऊ नये. उमेदवार कितीही असले, तरी स्वतःच्या आणि राज्य व देशाच्या हिताचा विचार करूनच मतदान केले पाहिजे. मतदानातून बंडखोरीला प्रोत्साहन मिळत नाही. परंतु, निर्धारपूर्वक मतदान झाले नाही तर बंडखोरांची संख्या वाढते आणि मग अस्थिर सरकार येते. हा धोका लोकांनी समजून घेतला पाहिजे. एखादा सन्माननीय अपवाद वगळला तर बहुतांशी बंडखोरांच्या हातून समाजाचे भले होण्याची शक्यता नसते. विजेत्या बंडखोरांना स्वतःच्या फायद्यात अधिक स्वारस्य असते. मंत्रिपद, महामंडळ किंवा अन्य काहीतरी लाभ त्यांना हवे असतात. स्वतःच्या लाभापलीकडे सरकारकडून लोककल्याणाचे ठोस काम करून घेण्यासाठी त्यांच्याकडे इच्छाशक्तीही नसते आणि बहुतेकदा क्षमताही नसते. त्यामुळे मैदानात कितीही बंडखोर दिसत असले, तरी मतदारांनी सुजाणपणा दाखविला पाहिजे आणि आपल्या मताचे दान समाजाच्या व्यापक कल्याणासाठी सत्पात्रीच पडेल, याची काळजी घेतली पाहिजे. उडदामाजीच निवडायचे असतील तर एवढा विवेक मतदारांकडे हवाच!

## प्रासंगिक

राहुल गोखले

# वायनाडमध्ये प्रियांका वढेरांची कसोटी

महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकांबरोबरच काही राज्यांत लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांत पोटनिवडणुका होणार आहेत. त्यातील लक्षवेधी पोटनिवडणूक ही केरळमधील वायनाडची. लोकसभेतील विद्यमान विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी यंदाची लोकसभा निवडणूक अमेठी आणि वायनाड या दोन मतदारसंघांतून लढविली होती. २०१९ सालच्या निवडणुकीतही ते दोन ठिकाणी रिंगणात होते. मात्र, त्यावेळी अमेठीत त्यांचा पराभव झाल्याने वायनाडचे प्रतिनिधित्व करण्यावाचून त्यांच्यासमोर पर्याय नव्हता. यावेळी ते या दोन्ही मतदारसंघांतून विजयी झाल्याने त्यांनी वायनाड मतदारसंघातून खासदारकीचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर तेथून त्यांच्या भगिनी प्रियांका वढेरा पोटनिवडणूक लढवतील, असे जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. प्रियांका वढेरा यांची प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात प्रवेश करण्याची ही पहिलीच वेळ आहे. आजवर त्यांनी पक्ष संघटनेत काम केले आणि निवडणुकांमध्ये पक्षाचा प्रचारही केला; पण त्या स्वतः उमेदवार कधीच नव्हत्या.

वायनाड लोकसभा मतदारसंघ काँग्रेससाठी अत्यंत सुरक्षित मतदारसंघ मानला जातो. कारण तो मतदारसंघ २००९ साली नव्याने अस्तित्वात आल्यापासून तेथे सातत्याने काँग्रेसचाच उमेदवार विजयी होत आला आहे. मतदारसंघ सुरक्षित असला, तरी काँग्रेससमोर तेथे आव्हान उभे राहत नाही, असे मुळीच नाही. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी यांच्या विरोधात भाजपाने प्रदेशाध्यक्ष के. सुरेंद्रन यांना उमेदवारी दिली होती. २०१९ च्या तुलनेत भाजपाला मिळालेल्या मतांचे प्रमाण यंदा सुमारे सात टक्क्यांनी वाढले; परिणामतः राहुल गांधी यांना मिळालेल्या मतांचे प्रमाण जवळपास तितक्याच प्रमाणात घटले. याचाच अर्थ डाव्या आघाडीच्या उमेदवाराच्या मतांच्या प्रमाणात फारसा बदल झाला नाही आणि काँग्रेसची मते भाजपाने खेचून घेतली. पोटनिवडणुकीत भाजपा आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष (सीपीआय) या दोन्ही पक्षांनी आपापले उमेदवार बदलले आहेत. सीपीआयने सत्येन मोकेरी यांना उमेदवारी दिली आहे. मोकेरी यांनी याच मतदारसंघातून २०१४ साली निवडणूक लढविली होती. २००९ च्या निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवाराचा तब्बल दीड लाखांच्या मताधिक्याने विजय झाला होता; ते मताधिक्य मोकेरी यांनी २०१४ साली २० हजारांवर उतरवले होते. भाजपाने आपल्या तरुण नेत्या नव्या हरिदास यांना उमेदवारी दिली आहे

नव्या हरिदास या सॉफ्टवेअर अभियंता आहेत आणि २०१५ पासून कोझिकोडे महापालिकेत नगरसेवक आहेत. २०१५ साली भाजपाने त्यांना



प्रथम उमेदवारी दिली ती दोन कारणांमुळे. एक, तो मतदारसंघ महिलांसाठी राखीव होता आणि दोन, नव्या हरिदास यांचे कुटुंब भाजपाशी निगडित होते. पहिल्याच निवडणुकीत हरिदास यांनी बाजी मारली. प्रतिस्पर्ध्यापेक्षा १२० मते अधिक मिळवून त्या विजयी झाल्या. आपल्या पहिल्या कार्यकाळात त्यांनी आपल्या प्रभागाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला. २०२० सालच्या निवडणुकीत त्यांना पुन्हा उमेदवारी मिळाली आणि त्यांनी आपले मताधिक्य ५०० पर्यंत वाढवत विजय नोंदविला. २०२१ साली कोझिकोडे दक्षिण विधानसभा मतदारसंघातून भाजपाने त्यांना उमेदवारी दिली होती. या निवडणुकीत जरी त्या तिसऱ्या स्थानावर राहिल्या तरी अगोदरच्या निवडणुकीच्या तुलनेत त्यांनी भाजपाची मत टक्केवारी पाचेक टक्क्यांनी वाढवून दाखविली. आता त्यांना थेट लोकसभा पोटनिवडणुकीत भाजपाने उमेदवारी दिली आहे. त्यांचा मार्ग सोपा नाही हे खरे; मात्र प्रियांका वढेरा आणि पर्यायाने काँग्रेसचा जनाधार काही प्रमाणात तरी भाजपाकडे वळविण्यात त्या यशस्वी ठरल्या तरी त्यांनी पुढील निवडणुकीची पायाभरणी केली, असेच मानले जाईल.

केरळ हा भाजपासाठी नेहमीच आव्हानात्मक प्रदेश राहिला आहे. तथापि अविरत मेहनत, चिकाटी, जिद्द यामुळे भाजपाचा जनाधार तेथे विस्तारत आहे, हेही खरे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीच्या निकालात त्याचे प्रत्यंतर आले. २०१९ च्या निवडणुकीच्या तुलनेत यंदा भाजपाला साडेतीन टक्के जास्त मते मिळाली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला केवळ एका विधानसभा मतदारसंघात आघाडी मिळाली होती; तर सात विधानसभा मतदारसंघांत तो पक्ष दुसऱ्या स्थानावर होता. यंदा ते चित्र कमालीचे बदलले आहे. भाजपाने तब्बल ११ विधानसभा मतदारसंघांत आघाडी घेतली; तर तो पक्ष नऊ विधानसभा मतदारसंघांत दुसऱ्या स्थानावर राहिला. अगदी कमी फरकाने भाजपा तिसऱ्या स्थानावर फेकला गेला. अशा विधानसभा मतदारसंघांची संख्या १० इतकी आहे. याचाच अर्थ केरळच्या १४० विधानसभा मतदारसंघांपैकी किमान ३० मतदारसंघ असे आहेत, जेथे भाजपाचे आव्हान काँग्रेसप्रणीत आणि डाव्या आघाडीसमोर उभे राहत आहे. त्यामुळे या दोन्ही आघाड्यांमध्ये अस्वस्थता असणे क्रमप्राप्त. शिवाय त्रिशूर लोकसभा मतदारसंघात भाजपाने विजय नोंदविला. तिरुवनंतपुरम् लोकसभा मतदारसंघात भाजपा दुसऱ्या स्थानावर राहिलाच; पण २०१९ साली काँग्रेसला तब्बल एक लाखाचे मताधिक्य होते; ते यंदा अवघ्या १६ हजारांवर घसरले. या पृष्ठभूमीवर वायनाड पोटनिवडणुकीची उत्सुकता वाढणे अपरिहार्य.

वास्तविक, केरळात काँग्रेसची लढत ही डाव्या आघाडीशी. तथापि, पोटनिवडणूक प्रचारात प्रियांका वढेरा यांनी टीका केली ती भाजपा आणि केंद्र सरकारवर. मणिपूरपासून अनेक विषयांवरून प्रियांका यांनी भाजपाला लक्ष्य केले. वायनाडमध्ये झालेल्या भूस्खलनाच्या आपत्तीनंतर तेथील पुनर्वसनाची जबाबदारी राज्य सरकारचीही असताना प्रियांका वढेरा यांनी पुरेसा निधी उपलब्ध करून दिला नाही म्हणून केंद्र सरकारवर म्हणजेच पर्यायाने भाजपावर टीका केली. केरळात भाजपाच्या वाढत्या जनाधाराचा किती धसका काँग्रेसने घेतला आहे, याची कल्पना यातून येऊ शकेल. भाजपाला वायनाडमध्ये मोठा पल्ला गाठायचा असला, तरी त्या पक्षाचे आव्हान आहे, हेच प्रियांका यांनी अप्रत्यक्षपणे कबूल केले आहे, असे म्हटले पाहिजे. मुद्दा तेवढाच नाही; वायनाड मतदारसंघाला आता दोन प्रतिनिधी मिळतील, असे विधान राहुल गांधी यांनी केले आहे. आपण या मतदारसंघाच्या खासदारकीचा राजीनामा दिला असला, तरी आपलेही लक्ष असेल, असे त्यांना सुचवायचे असेलही; पण तसे करताना ते प्रियांका यांना दुय्यम भूमिका देत नाहीत का? असा प्रश्न अप्रस्तुत नाही. केवळ प्रियांका वढेरा निवडून आल्या तर त्या आपल्या राजकीय कारकीर्दीत प्रथमच लोकप्रतिनिधी होतील. पण म्हणून राहुल गांधी यांच्या सवलतीच वावरणे प्रशस्त नाही. लोकसभेत राहुल विरोधी पक्ष नेते आहेत. प्रियांका यांची नेमकी भूमिका काय राहील हा पुढचा प्रश्न. अन्य खासदारांपेक्षा त्यांना विशेष वागणूक देण्यास काँग्रेस नेते आतुर असतीलच. अगदी लोकसभा सभागृहात त्या कोणत्या रांगेत बसतात, याकडेही सर्वांचे लक्ष असेल. कारण, त्यातून काँग्रेसची मानसिकता स्पष्ट होईल. वायनाड लोकसभा पोटनिवडणूक ही अशी अनेक परिणाम घडवून आणणारी आहे. मताधिक्य घटल्याचा अनुभव राहुल गांधी यांना चारच महिन्यांपूर्वी मिळाला होता. ते आणखी घटले आणि भाजपाचा जनाधार वाढला तर प्रियांका वढेरा यांचा विजयदेखील निखळ नसेल.

९८२२८२८८१९

## वेध

गिरीश शेरेकर

# दिवाळीपाठोपाठ लग्न खरेदीने डोळे दिपणार!

दिवाळीला सणांचा राजा म्हणून ओळखले जाते. देशाच्या कानाकोपऱ्यात हा सण गरिबातला गरीब आणि श्रीमंतातला श्रीमंत मोठ्या उत्साहात साजरा करतो. आपल्या क्रयशक्तीनुसार प्रत्येक व्यक्ती म्हणा की कुटुंब दिवाळीत काही नवीन वस्तू खरेदी करतात. यंदाच्या दिवाळीच्या पाच दिवसांत बम्पर खरेदी झाली. धनत्रयोदशीच्या दिवशी देशभरातील बाजारपेठांमध्ये कमालीची चमक दिसून आली. लोकांनी जबरदस्त खरेदी केली. सोन्या-चांदीबरोबरच वाहने, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, भांडी, कपडे यासह अन्य उत्पादनांची तुफान खरेदी-विक्री झाली. कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सच्या (कॅट) म्हणण्यानुसार, यावर्षी धनत्रयोदशीला सुमारे ६० हजार कोटी रुपयांचा व्यवसाय झाल्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षी सुमारे ५० हजार कोटी रुपयांची उलाढाल झाली होती. यंदा त्यात १० हजार कोटींची वाढ झाली. वाहन उद्योग संघटना फाडानुसार दिवाळीत चारचाकी वाहनांच्या विक्रीत १० टक्के तर दुचाकींच्या विक्रीत १५ टक्क्यांची वाढ झाली. ऑल इंडिया ज्वेलर्स ॲण्ड गोल्डस्मिथ्स फेडरेशनच्या म्हणण्यानुसार भाव वाढले असले, तरी या धनत्रयोदशीला सोने-चांदीची जोरदार विक्री झाली. देशभरात सुमारे २० हजार कोटींचे सोने आणि सुमारे २,५०० कोटी रुपयांची चांदी खरेदी करण्यात आली. त्यात सुमारे २५ टन सोने व २५० टन चांदीचा समावेश आहे.

दिवाळीच्या पाच दिवसांच्या पर्वावर एकूण ४.२५ लाख कोटींची खरेदी झाल्याने अर्थव्यवस्थेला गती मिळाली आहे. यापूर्वी नवरात्रीच्या काळात १० दिवसांत ५० हजार कोटींपेक्षा जास्त रुपयांचा व्यवसाय झाला होता. दिवाळीत भारतीय वस्तूंची जोरदार खरेदी झाली. ग्राहकांनी देशातील वस्तूंना मोठ्या प्रमाणात पसंती दिली. देशाच्या प्रत्येक कोपऱ्यात दिवाळीचे पर्व अत्यंत उत्साहात साजरे करण्यात आले. मोठ्या व्यावसायिकांसोबतच लहान व्यापारी तसेच कुंभार, कारागीर आणि दिवाळीचे साहित्य तयार करणाऱ्यांनीही मोठ्या प्रमाणात विक्री केली. दिवाळीत झालेल्या उलाढालीमुळे लहान व्यापाऱ्यांना मोठा फायदा झाला. खाद्य व किराणा, दागिने, गारमेंट्स, सुकामेवा, मिठाई, घर सजवण्याच्या वस्तू, कॉस्मेटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स साहित्य, मोबाईल, पूजा सामग्री, भांडे, भेटवस्तू, फर्निचर या वस्तूंची चांगली खरेदी झाली. दरवर्षीच्या दिवाळीप्रमाणे यंदाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'व्होकल फॉर लोकल' अभियानांतर्गत केलेल्या आवाहनामुळे भारतीय बनावटीच्या साहित्याची खरेदी मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून आले. गेल्या काही वर्षांपासून नागरिकांनी चिनी वस्तूंना नकार देत भारतात तयार होणाऱ्या वस्तूंना प्राथमिकता दिली. त्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये कमालीचा उत्साह वाढला. छोट्या व्यापाऱ्यांसाठी दिवाळीतली मिळकत वर्षभराची पुंजी असते. दिवाळीच्या खरेदीची आकडेवारी पाहिली तर देशातील नागरिकांच्या क्रयशक्तीत वाढ झाल्याचे स्पष्ट होते. प्रत्येकाच्या दरडोई उत्पन्नातही वाढ झाल्याचे यावरून दिसते.

दिवाळी आटोपली. आता लग्नसराईचे वेध लागले आहे. तुळशी विवाहानंतर लग्नाचा धडाका सुरू होणार आहे. व्यावसायिकांच्या नजरा आता त्याकडे लागल्या आहेत. विवाह मुहूर्ताच्या ६० दिवसांत म्हणजे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये ४८ लाख विवाह होतील आणि त्यामुळे सहा लाख कोटी रुपयांचा व्यवसाय होईल, असा अंदाज कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सने (कॅट) व्यक्त केला आहे. यावर्षी विवाहासाठी १८ शुभमुहूर्त आहेत. प्रबोधिनी एकादशी १२ नोव्हेंबरला आहे. त्यानंतर विवाह सुरू होतील. पुढे १६ डिसेंबरपर्यंत विवाह होतील. अंदाजे ४८ लाख विवाह होणे अपेक्षित आहे. वस्तू आणि सेवा या दोन्हीचा समावेश असलेल्या किरकोळ क्षेत्रात सुमारे सहा लाख कोटींची उलाढाल अपेक्षित आहे. गेल्या वर्षी या हंगामात ३५ लाख विवाहांमधून एकूण ४.२५ लाख कोटींचा व्यवसाय झाला होता. यंदा शुभमुहूर्तांच्या तारखांमध्ये वाढ झाल्यामुळे व्यवसायात लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. २०२३ मध्ये ११ शुभमुहूर्त होते तर यंदा १८ मुहूर्त असल्याने व्यवसायाला आणखी चालना मिळणार आहे. त्यातही ग्राहक आता परदेशी वस्तूंपेक्षा भारतीय वस्तूंच्या खरेदीला अधिक प्राधान्य देत आहे. लग्नाच्या खर्चाचा तपशील देताना कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतिया यांनी कोणत्या लग्नावर किती लाख खर्च होतील, याची यादीच दिली आहे. लग्न खरेदीतून आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात होते. अनेकांना त्यातून रोजगार मिळत असल्याने अर्थव्यवस्था गतिमान होते. बाजारपेठेत चैतन्याचे वातावरण राहते. प्राप्त होणाऱ्या पैशातून व्यवसायाच्या व रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्यास मदत मिळते. सण भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे, तो आणखी मजबूत व्हावा, ही अपेक्षा आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# भारतीय संस्कारातच खरा आणि सुदृढ भारत!

हिंदू संस्कृती संस्कारावर आधारित संस्कृती आहे. गर्भाधानापासून अन्त्यविधीपर्यंत आपण संस्कारच म्हणतो. या संस्कारातून समाजस्वास्थ्य सुदृढ असायचे. आपण एकमेकांच्या सुख-दुःखात सहभाग असायचो. इतरांच्या सुखाने आपल्याला आनंद व्हायचा आणि दुःखाने मन विषण्ण होत असे. शेजार हा धर्म होता. आपल्या घरी विशेष पदार्थ बनला की, शेजारी मुद्दाम भांड्यात घालून पाठवून दिला जायचा. घरातले पीठ संपले की शेजारी पेलाभर मागितले जायचे आणि दळून आणले की आठवणीने परत दिले जायचे. घरातले कोरड्यास म्हणजे घट्ट-वरण किंवा भाजी संपली तर लगेच शेजारच्या काकूकडे वाटी घेऊन जायचे आणि कोरड्यास आणायचे. अचानक पाहुणे आल्यास कपभर दुधाची देवाणघेवाण हमखास असे. इतकेच काय, चहापत्ती-साखर सोबतच आगपेटीच्या काड्यांचीही आदानप्रदान असे. खलबत्ता, कुरडयासाठीचा सोऱ्या, एखादा स्टुल, शिडी, रंग देण्याचा ब्रश अख्ख्या वेटाळात फिरायचा. वर्तमानपत्र गल्लीत एखाद्याच्याच घरी असायचे. तेच वृत्तपत्र मोहल्ल्यात फिरायचे. बऱ्याचदा तर मूळ मालकाकडे ते परततदेखील नसे. सत्यनारायणासाठी चौरंग, प्रवासासाठी सुटकेस, पाच मिनिटांसाठी सायकल, पाव्हणे आल्यावर चहाचे कप, इस्त्री, सतरंजी यांचेही आदानप्रदान निर्भेळ अंतःकरणाने होत असे. थोडीफार कुरकुर असायची, पण वेळ धकविल्या जायची. अहंभाव, अभिमान, गर्व यांना स्थान जवळजवळ नव्हतेच. एकमेकांना मागण्यात कमीपणा वाटत नसे. वाटून खाण्याची वृत्ती म्हणजे एखाद्याच्या घरी गाई-म्हशी व्याल्या तर खरवस सर्व घरी आठवणीने दिला जायचा. ताक सर्वांना मोफत वाटले जायचे किंवा निःसंकोच मागितले जायचे. ताकाला जाऊन भांडे लपवण्याचा प्रकार असेही पण क्वचितच. ही आत्मीयता भारतीय संस्कारामुळे असायची. भुलाबाईची गाणी एकमेकांच्या घरी जाऊन म्हणायची. गणपतीची आरती टोळीने जाऊन म्हणायची. एकत्रित कोजागरी, सामूहिक भजन, महिलांचा धावा, सप्ताह, पंगत यातूनही भारतीय संस्कार आणि सामाजिक स्वास्थ्य निर्माण होत असे.

भारतातून हा भारतीय संस्कार संपला आणि आपण स्व-अर्थी आणि स्व-केंद्रित झालो. शुद्ध अंतःकरणात 'इगो' अहंभाव शिरला. मी आणि माझे हा बद्ध विचार मेंदूत मोठा झाला. हृदय आणि मेंदू म्हणजे मन आणि बुद्धी गौण झाली. पोट आणि पोटाखालचा भाग याचाच विचार सर्वांमध्ये मातला. विवेकाची जागा अविचाराने घेतली. मोठ्यांचा सन्मान नाही, विनम्रता जीवनातून हद्दपार झाली. स्वैराचार बोकाळला. मोठ्यांना नमस्कार करावा लागतो, हे तर नवीन पिढी जवळ जवळ विसरली. मर्यादा पाळणे तर माहीतच नाही. सर्वजण बंदद्वार बसू लागले. एकमेकांच्या घरी जाणे, अडचणीत मदत मागणे कमीपणा आणि मदत देणे म्हणजे झंझट वाटायला लागली. महिला मंडळी आठवड्याला भाजी बाजारात एकत्रित जायच्या, साडी खरेदीसाठी एकमेकांसोबत जायच्या, वटसावित्रीला जत्थ्याने जाणे असायचे, मरणधरणात चहा-बेसन-पोळी अख्ख्या वेटाळातून यायचे. या सर्व बाबी जवळ जवळ संपल्या.

भारतीय संस्कार आपण सोडले. इंग्रजाळलेपणा अंगीकारला आणि आपले हृदय पाषाण आणि मेंदू बोथट झाला. त्यामुळे नको त्या गोष्टीत वाहावत जाणे राजमान्य होऊ लागले. खरं म्हणजे लग्न हा संस्कार होता, पण त्याचे महत्त्वच कमी झाले. मुलामुलींनी प्रेमविवाह केल्यास मायबापांना हायसे वाटते. 'सुटलो बुआ' म्हणून सुटकेचा निःश्वास घेणारेही आहेत. लग्नात दोन घरांचा परिचय, त्यानंतर मुलगा-मुलगी एकमेकांना बघत असत. पसंतीनंतर साखरपुडा, त्यानंतर लग्न. लग्न ठरल्यावरही मर्यादा असायच्या. त्याची जागा पूर्ण व्यापून टाकली ती विवाहपूर्व छायाचित्रणाने. 'प्री-वेडिंग शूट' हा प्रकार सर्वात घातक. या छायाचित्रणानंतर कित्येक लग्न मोडलीत. हा बीभत्स प्रकार केवळ संस्काराच्या अभावाने होतो. लग्नात मंगलाष्टकानंतर वर-वधूंना वर उचलून घ्यायचे, हार घालण्यात अडथळा आणायचा हे सर्व कर्मदरिद्री लक्षण. वाढदिवसाला जीव गुदमरेल इतका केक फासायचा तोंडाला. यात अनेकांचे जीव गेलेत. कसला हा राक्षसी प्रकार. कपल चॅलेंज, बाप-मुलगी चॅलेंज अशा नावावर विनाकारण फोटो टाकायचे आणि त्यातून निर्माण होतात भयानक प्रसंग. भ्रमणध्वनी तर सर्वव्यापी झाला आणि सर्व समस्यांचे मूळही तोच झाला. 'जीवीचा जिव्हाळा' कमजोर करण्यात भ्रमणध्वनीचा मोठा हात आहे. फेसबुकवर मित्र हजारो आहेत, पण हृदयाचे नाते म्हणाल तर शून्य. भारतीय समाजरचना भारतीय संस्कारावर आधारित होती. सामाजिक सौहार्द, एकोपा आणि आनंदी समाज अशा छोट्या छोट्या गोष्टीतून भारत एकसंध उभा असतो. स्वार्थी आणि बरबटलेल्या वातावरणात देव-देश-धर्म मूर्खपणा वाटू लागला. अशा चिंताजनक आणि भयावह स्थितीत बदल फक्त भारतीय संस्कारच घडवू शकतात. भारतीय संस्कारच भारतीयत्व टिकवू शकतात. भारतीयत्व जेव्हा मनामनांत रुजेल तेव्हाच भारतीय समाजाचे स्वास्थ्यही सुदृढ राहील. भारतीय संस्कार देशाला पुढे नेणारे आहेत. उपभोग आणि ऐहिक सुखासाठी वाटेल ते करणाऱ्या पिढीला लगाम घालण्यासाठी भारतीयत्वाचे संस्कार महत्त्वाचे आहेत. प्रत्येकाला जाती-पातीचा अभिमान आणि आपली जातपातच आपला परिचय वाटतो. किराणा दुकानात तेल, तिखट, मीठ असे पदार्थ असतात. नाव किराणा दुकान, पण त्या दुकानात किराणा नावाची गोष्टच नसते तसेच इथे प्रत्येक माणूस जातीपातीत वाटल्या गेल्यामुळे देशाचे नाव भारत पण इथे भारतीय कोणीच नाही. अशी अवस्था टाळायची असेल तर भारतीयत्वासाठी भारतीय संस्कार महत्त्वाचे. भारतीय संस्कार पुन्हा रुजविणे म्हणजे मागे जाणे नसून उज्ज्वल भारतासाठीचा सर्वोत्तम उपाय आहे. याच संस्कारातून कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था, पर्यावरण त्यामुळे भारत समृद्ध बनेल म्हणूनच भारतीय संस्कारातूनच खरा भारत घडेल, हा विश्वास.

९८२२२६२७३५


### नशिबाचा शिल्पकार

आपले आयुष्य आपणच घडवायचे असते. दुसऱ्यावर अवलंबून राहिल्याने किंवा दुसऱ्याचा हेवा केल्याने आपले नशीब घडत नसते. आपणच आपल्या आयुष्याचे शिल्पकार असतो हे कदापि विसरता कामा नये. आपल्या सुख व दुःखाचा कर्ता हा व्यक्ती स्वतःच असतो. दुसऱ्यांना दोष देण्यात अर्थ नसतो. व्यक्तीचे सौख्य हे त्याच्या विचारशैलीवर अवलंबून असते. जसा विचार, तसाच आचार व तसाच संचार असतो. आपल्या भाग्याचे विधाते आपण स्वतःच असतो. व्यक्ती मनावर कोणताही अशुद्ध संस्कार होऊ नये. अशुद्ध संस्कार हे जीवनाला वाईट मार्गाकडे नेतात तर सुसंस्कार हे विधायक व रचनात्मक मार्गाकडे नेतात. यासाठी सदैव विधायक, रचनात्मक व शुद्ध विचार करावा. व्यापक दृष्टिकोन ठेवावा, सर्वांचे हित चिंतावे. थोडक्यात स्वतः बदलून जावे म्हणजे जग आपोआप बदलेल.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### डॉक्टर-रुग्ण संवाद आवश्यक

डॉक्टर, रुग्ण आणि रुग्णाचे नातेवाईक यांच्यातील वाढता विसंवाद पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. डॉक्टरांविरुद्धच्या बोगस खटल्यांमध्ये वाढ होत आहे. अशा खटल्यांमागे पैसे उकळण्याचा उद्देश असतो. डॉक्टरांना संरक्षणाची गरज



न्यायालयाने प्रतिपादित केली. न्यायालयाने एका गंभीर प्रश्नाला हात घातला आहे. त्यात न्यायालयाला नक्कीच तथ्य आढळले असण्याची शक्यता राहू शकते. म्हणूनच कदाचित त्यांनी संरक्षणाची बाबही समाज आणि सरकारच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. खोटी कारणे पुढे करून केली जाणारी फसवणूक दंडनीयच आहे. डॉक्टर आणि रुग्ण सामाजिक आरोग्याचे दोन प्रमुख खांब मानले जातात. त्यांच्याबाबतीत असे प्रकार उघडकीस येणे ही अतिगंभीर आणि चिंताजनक बाब आहे. त्याची दखल तातडीने घेण्याची गरज आहे. ते करताना समस्येच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न संबंधित जाणत्यांना सर्वांकडून अपेक्षित आहे. या दोन घटकांतील बहुसंख्य समस्यांचे डॉक्टर-रुग्ण आणि रुग्णाचे नातेवाईक यांच्यातील वाढता बेबनाव हे प्रमुख कारण आहे. जो मानसिक आरोग्याचा पाया मानला जातो. संवाद निर्माण आणि बळकट झाला तर अनेक समस्या कदाचित निर्माण होणार नाहीत. रुग्णाचा अचानक मृत्यू झाल्यास जमाव आक्रमक होतो. दुर्लक्ष केल्याचा आरोप डॉक्टर आणि इतर कर्मचाऱ्यांवर केला जातो. प्रसंगी मारहाण आणि तोडफोडी होताना आढळते. असे झाले की संबंधित दोन्ही घटक परस्पर आरोप आणि खुलासे करताना आढळतात. दोन्ही घटकांमध्ये सामंजस्य अपेक्षित आहे. डॉक्टर जीवनदाते असले तरी ते परमेश्वर नाहीत. अनेकदा रुग्णाला अत्यवस्थ अवस्थेत आणले जाऊ शकतात, हे रुग्णाच्या नातेवाईकांनी लक्षात घेण्याची गरज आहे. डॉक्टरांनी वेळ काढून रुग्णाच्या नातेवाईकांशी संवाद राखणे आवश्यक आहे. या विषयावर माध्यमात अनेक तज्ज्ञ काही सूचना सुचवतात. त्यांची दखलदेखील सरकारने तातडीने घ्यायला पाहिजे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

## वाचक पत्रे

### अन् रोही काळ बनून आला!

२५ ऑक्टोबर २०२४ ची घटना. एक मध्यमवयीन मनुष्य (वय वर्षे ५५) मोटारसायकलने अंजनगावहून दर्यापूरकडे येत असताना लेहगाव (रेल्वे) ते इटकीदरम्यान दुपारी साडेचार ते पाचच्यादरम्यान बाजूच्या शेतामधून रोही हा वन्यप्राणी गाडीवर धडकला. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, त्या प्राण्याची धडक इतकी जबर होती की, ते जागेवरच आडवेतिडवे गाडीसह पडले व बेशुद्ध झाले. त्यांना दर्यापूरच्या ग्रामीण रुग्णालयात भरती केले; तेथेच ते गतप्राण झाले. ही दगावणारी व्यक्ती म्हणजे माझे साडभाऊ रवींद्र रमेश देशपांडे (अकोला) होते. ही बातमी ऐकून मन हेलावले. आता प्रश्न येतो की, यामध्ये दोष कोणाला द्यायचा? नाईलाजाने अंगुलिनिर्देश वन खात्याकडे जातो. या रोही प्राण्यांच्या धडकेने कितीतरी अपघात झाल्याचे आपण नेहमीच वाचतो. लोक बातम्या वाचतात आणि तेथेच सोडून देतात. आज जेव्हा माझ्या जवळच्या व्यक्तीचा असा अपघात झाला तेव्हा कळले की, तो अपघात किती भयानक होता. वन खात्याला कळकळीची विनंती आहे की, त्यांनी या व्यक्तीच्या कुटुंबीयांना म्हणजेच त्या व्यक्तीची पत्नी, मुलगी व वृद्ध आई यांना त्वरित नुकसान भरपाई द्यावी. तसेच यापुढे अशा दुर्घटना होणार नाही याची खबरदारी घ्यावी. अशा दुर्घटना टाळण्यासाठी वन खात्यांनी अशा रस्त्यांवर जागोजागी 'वन्य प्राण्यांपासून सावधान' असे सचित्र फलक लावावेत. वाहनांच्या वेग मर्यादेचे फलक लावावेत तसेच जागोजागी सायरन व गार्डची (रक्षक) व्यवस्था करावी. रस्त्याच्या दुतर्फा जाळीचे कम्पाऊंड करावे. जेणेकरून भरल्या संसारातून कोणी इतक्या तडकाफडकी जाणार नाही.

**प्रशांत राजहंस हनवाडीकर**/९५६१६९०३५९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांच्या प्रचार फेऱ्यांना उपनगरमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद



नगर – महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांची नगर विकास यात्रा मतदारांशी सुसंवाद साधत प्रभाग क्रमांक ५ मध्ये पोहोचली. येथील भिस्तबाग चौक, श्रमिकनगर बालाजी मंदिर, शिवकृपा कॉलनी, वैदुवाडी, कुष्ठधाम रोड, सोनानगर चौक, नवीन प्रेमदान हडको या उपनगरांमध्ये प्रचार फेरी काढण्यात आली. सर्व भागांमध्ये उमेदवार आ.संग्राम जगताप यांच्या प्रचार फेऱ्यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पहावयास मिळाला.

प्रचार फेरीचा शुभारंभ यावेळी भाजपचे विधानसभा निवडणूक प्रमुख भैया गंधे यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी माजी नगरसेवक मनोज दुल्लम, सोनाबाई शिंदे, उदय कराळे, सतिश शिंदे, अजिंक्य बोरकर, शिवसेनेचे काका शेळके, सतिश बारस्कर, नितीन शेलार, सचिन जगताप, बाळासाहेब निकम, सुमित कुलकर्णी, आदींसह मोठ्या संख्यने महायुतीतील पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी आ.संग्राम जगताप म्हणाले, आपल्या शहराची वाटचाल आता वेगाने विकासाच्या दिशेने चालली आहे. शहर व उपनगरातील सर्व भागांमध्ये मोठ्याप्रमाणात विकास कामे प्रगतीपथावर आहेत. या कामांचे समाधान प्रचारा दरम्यान नागरिक उत्स्फूर्तपणे व्यक्त करत मला प्रतिसाद देत आहेत. त्यामुळे ही निवडणूक नागरिकांनीच हातात घेतली आहे.

यावेळी किरण बारस्कर, जय दिघे, सूरज वाकळे, गजू भांडवलकर, नमन महांकाळ, सुरज शिंदे, राहुल शिंदे, शिवाजी शिंदे, अजिंक्य पानसंबळ, गौरव पाटोळे, अमित वाघमारे, पियुष मनोचा, योगेश ठुबे, शिवाजी डोके, विशाल म्हस्के, तसेच भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी पक्षाचे सर्व पदाधिकारी या प्रचार फेरीत उपस्थित होते.

## जैन संस्कृतीला समर्पित अभय प्रभावन संग्रहालयाचे उद्घाटन

मुंबई- जैन तत्त्वज्ञान आणि भारतीय वारसा यांना समर्पित असलेल्या अभय प्रभावन संग्रहालयाचे मोठ्या उत्साहात उद्घाटन करण्यात आले. या प्रतिष्ठेत अश्या या संस्थेची स्थापना ही अमर प्रेरणा ट्रस्टचे अध्यक्ष अभय फिरोदिया यांनी केली आहे. भारतीय अध्यात्मिक वारसा जतन करण्यासाठीच्या प्रवासातील हे संग्रहालय महत्त्वपूर्ण असा टप्पा आहे. जैन मूल्यांची सखोल समज निर्माण करणे, भारतीय मूल्य प्रणालीवर आणि समकालीन समाजात जैन मूल्यांची प्रासंगिकता यावर आधारित असणाऱ्या या संग्रहालयाच्या उद्घाटन समारंभात अनेक आदरणीय मान्यवर, सांस्कृतिक विद्वान आणि नेते उपस्थित होते.

# निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे- हिर्देशकुमार

## पूर्वतयारी आढावा बैठकीत आयोगाचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर, दि.६(जिमाका):- निवडणूक प्रक्रिया राबवितांना त्यात कोणत्याही शंकेला वाव असता कामा नये याची खबरदारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी घ्यावी व निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश भारत निवडणूक आयोगाचे उपनिवडणूक आयुक्त हिर्देशकुमार यांनी आज निवडणूक यंत्रणांना दिले. येथील स्मार्ट सिटी कार्यालयात छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांतील विधानसभा मतदारसंघांमधील निवडणूक पूर्वतयारीबाबत आढावा बैठक आज पार पडली. या बैठकीस राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम, अति.मुख्य निवडणूक अधिकारी पी. प्रदीप, उपसचिव सुमनकुमार, संजयकुमार, अभिलाष कुमार, अनिलकुमार, अविनाशकुमार तसेच विभागीय आयुक्त दिलीप गावडे, मनपा आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्रा, पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड आदी उपस्थित होते.

प्रत्येक विधानसभा क्षेत्रात निवडणूक निर्णय अधिकारी यांनाच सर्व प्रक्रिया राबवावयाची आहे. राबवित असलेल्या निवडणूक विषयक कामकाजाबाबत प्रत्येक टप्प्यावर राजकीय पक्ष, उमेदवार यांच्या प्रतिनिधींना माहिती द्यावी व प्रक्रिया राबवावी. त्याचे दस्तऐवजीकरण करावे. त्यांचे शंकानिरसन करावे. निवडणूक प्रक्रिया राबवितांना पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे,असे हिर्देशकुमार यांनी सांगितले.

मतदार याद्यांबाबतही योग्य ती काळजी घेऊन त्या याद्या अधिक बिनचूक असाव्यात. प्रत्येक मतदारापर्यंत मतदान चिठ्ठ्या वेळत पोहोचतील याचे नियोजन करा. मतदार याद्यांविषयी असलेल्या तक्रारींबाबत तात्काळ दखल घ्यावी. मतदान केंद्रांबाबतही सर्व यंत्रणांनी खबरदारी घ्यावी. प्रत्येक मतदान केंद्रांवर पुरेशी सुरक्षा व्यवस्था, तात्पुरत्या मतदान केंद्रांची मान्यता घेणे, मतदान केंद्राचे ठिकाण बदलले असल्यास त्याबाबत मतदारांपर्यंत माहिती पोहोचविणे, त्याची प्रसिद्धी करणे, विशेष मतदान केंद्रांची निर्मिती करणे जसे. पर्यावरणपूरक, महिलांनी, दिव्यांग कर्मचाऱ्यांनी संचलित केलेले इ, मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, रॅम्प, सावली इ. सुविधांची निर्मिती, तसेच वेब कॅमेरे व सीसीटीव्ही कॅमेरे लावून मतदान केंद्रांचे वेबकास्टिंग करणे, मतदान केंद्राच्या बाहेर व आत कॅमेरे लावावे इ. सुचना दिल्या. तसेच या सर्व सुविधांची पूर्तता झाल्याबाबत व आवश्यकतांबाबत स्वतः जिल्हा निवडणूक अधिकारी, पोलीस अधीक्षक, पोलीस आयुक्त यांनी स्वतः पाहणी करुन खातरजमा करावी,असे निर्देशही देण्यात आले.

यंदा मतदान हे नोव्हेंबर महिन्यात असून आता सुर्यास्त लवकर होईल, अशा वेळी सायंकाळी मतदान केंद्रांवर पुरेशा प्रकाशासाठी दिवे लावण्याची सुविधा करावी,अशी सुचना देण्यात आली. कोणत्याही परिस्थितीत मतदान केंद्रात मोबाईल नेता येणार नाही, याबाबत योग्य ती काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले. टपाली मतदान व गृह मतदान प्रक्रियेबाबतही यंत्रणांनी पूर्ण प्रक्रिया व्यवस्थित राबवावी. गृह मतदान कार्यक्रम अगोदर जाहीर करावा. त्याबाबत उमेदवारांना कळवावे.

**मतदान कर्मचाऱ्यांसाठी सुविधा द्या**

निवडणूक कामकाजासाठी लागणारे पुरेस मनुष्यबळ उपलब्ध असल्याची खात्री करावी. आवश्यकतेनुसार मनुष्यबळ उपलब्ध करुन घ्यावे. नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना जेवण, पिण्याचे पाणी, कामकाजाची सुविधा, मतदान केंद्रांवर गेल्यावर मुक्काम, मुक्कामाच्या ठिकाणी स्वच्छता, सुरक्षितता, भोजन, पाणी याबाबतची व्यवस्था पुरविण्यात यावी. महिला कर्मचाऱ्यांना विशेष सुरक्षा व सोयी सुविधा द्याव्या. निवडणूक कामकाजात कर्मचाऱ्यांना अचानक उद्भवणाऱ्या आजारांसाठी तात्काळ वैद्यकीय सेवा देण्याचे नियोजन असावे. त्यासाठी स्थानिक पातळीवर रुग्णालयांमध्ये खाटा राखीव ठेवाव्या. प्रत्येक निवडणूक कर्मचाऱ्याची योग्य काळजी घेतली जाईल, याची खबरदारी घ्यावी.

**सी व्हिजील वरील तक्रारींचे तात्काळ निराकरण करा**

प्रत्येक जिल्ह्यात व विधानसभा क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्यासाठी सर्व संलग्न जिल्ह्यांच्या पोलीस यंत्रणांनी आपापसात समन्वय ठेवावा. मद्य, अंमलीपदार्थ, मौल्यवान वस्तू, रोकड यांच्या अवैध वाहतुकीवर नजर ठेवून कारवाई करावी. याबाबत सी व्हिजील पवर येणाऱ्या तक्रारींची दखल घेऊन कारवाई करावी. या तक्रारींचे तात्काळ निराकरण झाले पाहिजे, याबाबत विशेष काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले.

**फेक न्यूजला तात्काळ पायबंद**

निवडणूक काळात माध्यमांमध्ये येणाऱ्या बनावट बातम्या, फेक न्यूज अर्थात खोट्या माहितीचे प्रसारण तात्काळ रोखावे. खोटी माहिती असल्यास तिचे प्रसारण रोखून सत्य माहितीचे तात्काळ प्रसारण करावे. याबाबत या विभागाशी संबंधित बातम्या असतील त्यांनी तात्काळ योग्य माहिती पुरवावी व वस्तूस्थिती जनतेसमोर मांडावी, जेणेकरुन निवडणूक प्रक्रियेवर परिणाम होणार नाही व त्याबाबत गैरसमज निर्माण होणार नाही.

**मतदार जनजागृतीवर भर द्या**

मतदारांचे मतदानाचे प्रमाण वाढावे यासाठी आयोगामार्फत लवकरच 'स्विप' उपक्रम मोठ्याप्रमाणावर राबविले जाणार आहेत. ते सर्व उपक्रम आपल्या विधानसभा क्षेत्रात राबवावे. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी प्रयत्न करावे. मतदारांना मतदान करणे सोईचे व सुलभ व्हावे यासाठी उपाययोजना राबवाव्या.

**अचूक आकडेवारीसाठी स्वतंत्र नोडल अधिकारी**

मतदानाचे प्रमाण नेमके कळावे व त्यातील आकडेवारीत अधिक अचूकता यावी यासाठी या निवडणूकीत झालेल्या मतदानाच्या टक्केवारीसाठी स्वतंत्र नोडल अधिकारी विधानसभा मतदार संघस्तरावर, जिल्हास्तरावर आणि राज्यस्तरावर नेमण्यात येणार आहे. मतदान टक्केवारीची आकडेवारी बुथनिहाय पडताळणी करुन मतदान टक्केवारी अचूक देण्यात येईल यासाठी ही उपाययोजना करण्यात आल्याचेही निवडणूक उपायुक्त यांनी सांगितले.

**मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन**

मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. एस. चोकलिंगम म्हणाले की, राजकीय पक्ष उमेदवारांना वेळोवेळी अद्यावत निर्णय व माहिती देऊन अवगत करावे.मतमोजणी साठी मतमोजणी केंद्राच्या पुनर्रचनेचा आराखडा नव्याने मंजूर करावयाचा असल्यास त्याचे प्रस्ताव तातडीने पाठवावे. टपाली मतमोजणीबाबतच्या व्यवस्थेसह आराखडा मंजूर करावा. निवडणूक कामकाजाविषयी सर्व अहवाल वेळेत व अचूक पाठविणे आवश्यक आहे. त्यात कोणतीही दिरंगाई व हयगय खपवून घेतली जाणार नाही. सर्व आकडेवारी अचूक पाठवावी. जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी आपल्या अंतर्गतअसलेल्या सर्व विधानसभा क्षेत्रातील कामकाजावर लक्ष ठेवावे. पैशांचा वापर. माध्यमांमध्ये येणारी माहिती, आणि असामाजिक तत्वांचा वावर याबाबत सजग राहून वेळीच कारवाई करावी.

**यांची होती उपस्थिती –** बैठकीस नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, लातूरचे जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे,नांदेड जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, परभणी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, बीड जिल्हाधिकारी अविनाश पाठक, लातूर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे,चंद्रपूर जिल्हाधिकारी . विनय गौडा जी सी, गोंदिया जिल्हाधिकारी प्राजित नायर, भंडारा जिल्हाधिकारी संजय कोलते, वाशिम जिल्हाधिकारी बुवनेश्वरी. एस, वर्धा जिल्हाधिकारी राहूल कर्डिले, गडचिरोली, जिल्हाधिकारी संजय दैने, हिंगोली जिल्हाधिकारी अभिनव गोयल, धाराशिव जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, लातूर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, नागपुरचे पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंघल तसेच बीड पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ,जालना पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, नांदेड पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, धाराशिव पोलीस अधीक्षक संजय जाधव,गोंदिया पोलीस अधीक्षक गोरख भामरे,चंद्रपूर पोलीस अधीक्षक रिना जानबंधू,लातूर पोलीस अधीक्षक सोमय मुंढे, गडचिरोली पोलीस अधीक्षक नीलोत्पल, परभणी पोलीस अधीक्षक रविंद्रसिंग परदेशी, हिंगोली पोलीस अधीक्षक एस. डी. कोकाटे, भंडारा पोलीस अधीक्षक नुरुल हसन, वर्धा पोलीस अधीक्षक अनुराग जैन तसेच दुरदृष्य पद्धतीने सर्व जिल्ह्यातील अधिकारी व या निवडणूकीसाठी नेमलेले निवडणूक आयोगाचे निरीक्षक सहभागी झाले होते.

# चितेगाव रोडवरील रमानगर येथील घरातून आरोपीसह धारदार तलवार जप्त



तभा वृत्तसेवा

बिडकीन ६ नोव्हेंबर पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्यात कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी पदभार स्वीकारल्या पासून बिडकीन पोलीस ठाण्याचे हद्दीतील गुन्हेगारावर तसेच अवैध धंदे करणाऱ्या वर कारवाईचा धडाका लावल्याने यांच्यामध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे , कर्तव्यदक्ष अधिकारी निलेश शेळके रोज अवैध धंदे करणाऱ्या वर कारवाई करत आहे,

छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक सुनिल लाजेवार , पैठण उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे यांचे मार्गदर्शनाखाली आज दिनांक ५ नोव्हेंबर रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके पोलीस ठाण्यात हजर असताना मिळालेल्या गोपनीय माहिती वरुन रमानगर चितेगाव येथे इसम राहुल कैलास थोरात वय २३ वर्ष रा रमानगर चितेगाव ता पैठण यास ताब्यात घेऊन त्याच्या राहते घराची दोन पंचा समक्ष झडती घेतली असता झडती दरम्यान याच्याकडून अवैधरित्या धारदार शस्त्र तलवार जप्त करण्यात आली आहे. याच्या विरुद्ध पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून ५१५/२०२४,कलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा सह कलम १३५,महा पो.का प्रमाणे. गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी राहुल कैलास थोरात अटक करण्यात आले आहे ,सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, स्थानिक गुन्हा शाखेचे एस एस कदम,संजय चव्हाण ,शरद पवार हनुमान धनवे, यांनी कारवाई करुन पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, दिलीप साळवे, आप्पासाहेब माळी करीत आहे

# बिडकीन पोलीस ठाण्याचे हद्दीत अवैधरित्या देशी दारु विक्री करणाऱ्या दोन आरोपीस अटक



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ६ नोव्हेंबर पोलीस अधीक्षक डॉ. विनय कुमार राठोड ,अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार, उपविभागीय पोलीस अधिकारी पैठण सिद्धेश्वर भोरे यांचे आदेशावरुन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी दि ५ नोव्हेंबर रोजी मिळालेल्या गोपनीय माहिती वरुन पोलीस ठाण्याचे हद्दीत विनापरवाना बेकायदेशीर रित्या देशी दारु,गावठी दारुची विक्री करत आहे अशी माहिती मिळाली या वरुन आरोपी संतोष शामराव गवांदे वय ३९ वर्षे रा. इमामपूरवाडी ता. पैठण त्याच्याकडून मिळालेला मुद्देमाल देशी दारू भिंगरी संत्रा कंपनीच्या १८० मि लि क्षमतेच्या १३ बॉटल किंमत अंदाजे १२००,रुपये तसेच आरोपी भगवान कचरूलाल जयस्वाल वय ४० वर्षे रा रांजणगाव ता पैठण याच्याकडून देशी दारू भिंगरी १८० मि लि ५८ बॉटल,किंमत ५८०० रुपये, यांच्यावर कारवाई करून माल जप्त करण्यात आला असून कारवाई करुन आरोपींना अटक करण्यात आले आहे.

वरील कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, स्थानिक गुन्हा शाखेचे एस एस कदम,संदीप धनेधर ,अमोल मगर कानडे यांनी कार्यवाही केले आहे ,पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार अशोक सोकटकर करत आहे


**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 109-Aurangabad East | Atul Moreshwar Save | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 109 - Aurangabad East**
**Place : Mumbai**
**Date : 05/11/2024**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 103-Bhokardan | Santosh Raosaheb Danve | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 103 - Bhokardan**
**Place : Mumbai**
**Date : 05/11/2024**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 99 - Partur | Babanrao Dattatreya Yadav (Lonikar) | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 99-Partur**
**Place : Mumbai**
**Date : 05/11/2024**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

# राष्ट्रवादी काँग्रेसचा माजलगाव मतदारसंघाला विकासाचा वादा-आ.प्रकाश सोळंके




## २१ कलमी विकासाचा कार्यक्रम आ. सोळंके यांचेकडुन जाहिर

**माजलगावात पत्रकार परिषद**
**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.६ नोव्हेंबर**

माजलगाव विधानसभा मतदारसंघात आगामी काळात होणा-या २१ कलमी विकासाचा वादा आ. प्रकाशदादा सोळंके यांनी जाहिर करत राष्ट्रवादी काँग्रेसचा माजलगाव मतदारसंघाला विकासाचा वादा असल्याचे आ. प्रकाश सोळंके यांनी सांगीतले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर त्यांच्या निवासस्थांनी आयोजित पत्रकार परिषदेत दि. ६ नोव्हेंबर रोजी तल बोलत होते. पुढे बोलतांना आ. सोळंके म्हणाले की, पुढील पाच वर्षात माजलगावला प्रगतीच्या नव्या शिखरावर पोहचविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरूषांच्या स्मारकासाठी जागा उपलब्ध करून दिली, ग्रामीण भागातील स्वच्छ पाणी पुरवठा प्रतिव्यक्ती ५५ लिटर करून प्रत्येक गाव, वस्ती, तांडा बारमाही रस्त्याने जोडण्याचा वादा, शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग उभारून शेतक-यांना हमखास उत्पन्न मिळवुन देण्याचा तसेच शेतीपोच रस्त्यासाठी पाणंद रस्ते योजना प्रत्येक गावात राबविण्याचा वादा, माजलगाव येथे विकास प्रतिष्ठाणचे रत्नसुंदर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सहा महिण्यात सुरू करण्याचा वादा, पोखरा योजनेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये सर्व योजनांची प्रभावी अंमलबाजवणी करण्याचा वादा यासह मतदार संघात विवीध विकासकामांचा वादा आ. सोळंके यांनी यावेळी केला तर शहरात असलेल्या अनेक प्रलंबीत प्रश्नाबाबत पत्रकारांनी विचारले असता पुढील चार महिण्यांत बाजाराच्या जागेचा प्रश्न सोडविणार असल्याचे सांगीतले. धारूरच्या अरूंद रस्ता घाटाचा, माजलगाव शहरातील मुख्य रस्त्यावरील नाल्यावरील नाल्यांचा प्रश्न लवकर सोडविण्यात येईल तर अपक्ष उमेदवारांकडुन महायुतीचे नेते आ. पंकजा मुंडे व ना. धनंजय मुंडे यांच्या फोटोंचा वापर करून जनतेची दिशाभुल केली जात आहे. याच्याविरोधात पक्षश्रेंष्ठींकडे तक्रार केली असुन त्यावर कारवाई होईल असेही ते म्हणाले. पत्रकार परिषदेला शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, माजलगाव विकास प्रतिष्ठाणच्या अध्यक्षा मंगलाताई प्रकाश सोळंके, मा. सभापती जयसिंग सोळंके, अच्युतलराव लाटे, सभापती जयदत्त नरवडे, मा. सभापती संभाजी शेजुळ, चंद्रकांत शेजुळ यांची उपस्थिती होती.

मी दहशतवादी किंवा गुंड असतो तर माधव निर्मळ सारखा कार्यकर्ता माझ्यासोबत राजकीय, सामाजिक दृष्ट्या अनेक वर्षे राहिला नसता. मी राजकारण करतांना व समाजकारण करतांना गुंडगीरी अथवा दहशतवादाचा वापर कधीच केला नाही व सोळंके कुटूंबीय करणार ही नाहीत. आम्ही केवळ विकास कामांवर मते मागतो. कै. सुंदरराव सोळंके यांच्या पुण्याईपासुन ते आपर्यंत आम्ही फक्त विकासकामेच केली. दहशतवाद किंवा गुंडगीरी नाही असे त्यांनी पत्रकाराला उत्तर देतांना सांगीतले.

# आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली कार्यकर्त्यांची बैठक

## शरद पवार साहेबांच्या सभेचे झाले नियोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ नोव्हेंबर**

९ नोव्हेंबर २०२४ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार साहेब यांची बीड येथे सभा होणार आहे. या सभेच्या नियोजनासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.५) रोजी सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांची राष्ट्रवादी भवन, बीड येथे बैठक घेतली.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) व मित्रपक्षांचा महाविकास आघाडीचे, बीड विधानसभा मतदारसंघातून अधिकृत उमेदवार असलेले आ.संदीप क्षीरसागर यांनी मंगळवार (दि.५) रोजी मतदारसंघातील सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांची बैठक घेतली. या बैठकीत, ९ नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या शरदचंद्र पवार साहेबांच्या सभेच्या अनुषंगाने नियोजन करण्यात आले. तसेच प्रचार व इतर सर्व महत्त्वाच्या बाबींवरही चर्चा करण्यात आली. या बैठकीस बीड विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे सर्व पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# परळीत प.पु.माता कनकेश्वरी देवीजींची शिवमहापुराण कथा

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.६ नोव्हेंबर**

देश,ि वदेशात सहाशे पेक्षा अधिक रामकथा,श्रीमद् भागवत कथा,देवी भागवत कथा,शिव महापुराण आपल्या सुमधुर वाणीतुन सांगणार्या श्री श्री १००८ महामंडलेश्वर प.पु.माता कनकेश्वरी देवीजींच्या बुधवार दि.६ नोव्हेंबर पासून परळी येथे शिवपुराण कथा ज्ञान यज्ञास प्रारंभ होत असून या कथेस भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक सौ.जयश्री प्रभु कोरे परिवार हिंपळनेकर व पंचम ज्योतिर्लिंग प्रभु वैद्यनाथ शिवकथा समिती,परळी वैजनाथ यांनी केले आहे.वतीने करण्यात आले आहे.



माजलगाव विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार रमेशराव आडसकर यांनी प्रचार दौरा निमित्त शुक्लतिर्थ लिमगांव,सोनाथडी,गुंजथडी, सुरुमगांव,निपाणी टाकळी,वसंतनगर तांडा,आनंदगांव, घळाटवाडी, या गावांमध्ये प्रचार दौऱ्याच्या निमित्ताने भेटी दिल्या.या दौऱ्यात गावातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला या वेळी नेते,पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून लेख्यांच्या तपासणीसाठी तारखा निश्चित

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ नोव्हेंबर**

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार उमेदवाराच्या खर्चाची नोंदवही तपासणीसाठी तीन तारखा निश्चित करण्यात आल्या आहेत. उमेदवारांच्या खर्च नोंदवहीच्या तपासणीसाठी दिनांक, वेळ व स्थळ निश्चित करण्यात आल्याचे बीड जिल्ह्यातील सहाही मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविले आहे. २२८-गेवराई विधानसभा मतदारसंघातील उमेदवाराच्या खर्च नोंदवहीच्या लेख्यांची तपासणी करण्यासाठी ०७ नोव्हेंबर, १२ नोव्हेंबर आणि १७ नोव्हेंबर २०२४ या तारखा निश्चित करण्यात आल्या आहेत. सदरील तपासणी गेवराई येथील तहसील कार्यालयाच्या गेवराई विधानसभा मतदारसंघाच्या खर्च संनियंत्रण कक्ष येथे सकाळी नऊ ते दुपारी एक या कालावधीत होईल.

२३३-परळी विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवाराच्या खर्च नोंदवहीच्या लेख्यांचीही तपासणी ०७ नोव्हेंबर, १२ नोव्हेंबर आणि १७ नोव्हेंबर २०२४ याच तारखांना सकाळी अकरा वाजता परळी तहसील कार्यालयातील खर्च संनियंत्रण कक्षात होईल. तसेच २३०-बीड विधानसभा मतदारसंघात बीड उमेदवाराच्या खर्च नोंदवहीच्या लेख्याची तपासणीही ०७ नोव्हेंबर, १२ नोव्हेंबर आणि १७ नोव्हेंबर २०२४ रोजी बीड येथील तहसील कार्यालयातील खर्च संनियंत्रण कक्षात दुपारी दोन ते पाच यावेळेत होणार आहे. तर २३२-केज विधानसभा मतदारसंघातील उमेदवाराच्या खर्च नोंदवहीच्या लेख्याची तपासणीही ०७ नोव्हेंबर, १२ नोव्हेंबर आणि १७ नोव्हेंबर २०२४ रोजी केजच्या शासकीय विश्रामगृह येथे दुपारी तीन वाजता होणार आहे.

# केज विधानसभा निवडणुकीत रमेश तात्या गालफाडे यांना उत्स्फूर्त प्रतिसाद

केज/अनिल गलांडे

सुरुवातीला राष्ट्रवादी शरद पवार गटातुन उमेदवार मिळवण्यासाठी प्रयत्नशिल असलेले व राष्ट्रवादी शरद पवार गटाने उमेदवारी पाळल्यामुळे ऐनवेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने त्यांच्या मागील काळातील राजकीय व सामाजिक कार्याची दखल





घेऊन रमेश तात्या गालफाडे यांना केज विधानसभा मतदारसंघात मनसेने उमेदवारी दिली.

याविषयी सविस्तर वृत्त असे की मागील काळात रमेश तात्या गालफाडे यांचे मोठे सामाजिक कार्यात योगदान आहे तसेच दलीत चळवळीत देखील त्यांचा मोठा वाटा आहे. तसेच ऐनवेळी उमेदवारी नाकारल्याने सर्वसामान्य जनतेमध्ये त्यांच्या विषयी सहानुभूती आहे तसेच कोरोना काळात त्यांनी केलेल्या विशेष सहकार्यामुळे पुढील काळात देखील त्यांचा विषयी मोठा विश्वास आहे. यामुळे त्यांना चांगला प्रतिसाद भेटत आहे. दुसरी गोष्ट म्हणजे सत्ताधारी पक्षाने स्वतःचेच हित साधून घेतले आहे. फक्त तालुक्यातील तीन कार्यकर्ते सुधार योजना राबविल्या मुळे व फक्त गुत्तेदार पोसल्या मुळे जनतेतून परिवर्तनाची मागणी होत आहे. सतत तेच उमेदवार निवडून केज मधून घराणेशाही हद्दपार करण्याची मागणी जनतेतून होत आहे. मागील पाच वर्षांमध्ये विकास काहीच झालेला नसून आमदार मात्र स्वतःचेच हित साधून घेत आहे तर केज तालुक्याचा विकास काही झालेला दिसून येत नाही. तालुक्यामध्ये केज तालुक्यामधून नवीन चेहरा निवडून आला पाहिजे अशी जनतेतून मागणी होत आहे. तरी बहुजन विकास परिषदेचे व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे १ वकास परिषदेचे व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांना जनतेतून चांगला प्रतिसाद भेटत आहे. खास करून युवावर्ग महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि रमेश तात्या गालफाडे यांच्या पाठीशी उभा राहिलेला दिसून येत आहे केज तालुक्यात सर्वसामान्याचे अनेक प्रश्न आणि अनेक समस्या अनेक वर्ष झाले तरी केज तालुक्याचा विकास मात्र काही झालेला दिसून येत नाही बेरोजगारी तरुणांना काम नाही मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत आहे ऊस तोडून मजुराचे प्रश्न पाणी प्रश्न असे अनेक प्रश्न आहेत केज अंबाजोगाई तालुक्यामध्ये चांगला प्रतिसाद भेटत आहे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या नेतृत्वात केज विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करू, विकास काय असते हे दाखवून देऊ असे आश्वासन रमेश तात्या गालफाडे यांनी जनतेला दिले आहे.

## माजी आमदार संगिता ठोंबरे यांची महाराष्ट्र प्रदेश नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या उपाध्यक्षपदी निवड



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.६ नोव्हेंबर**

केज विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार व चालु निवडणूकीतू उमेदवारी पक्षश्रेष्ठींनी दिलेल्या सुचनांचे पालन करुन माघार घेतली त्यामुळे त्यांची पक्षनिष्ठा व सामाजिक, शैक्षणिक व इतर लोकोपयोगी क्षेत्रामध्ये आजवर दिलेले योगदान लक्षात घेऊन महाराष्ट्र प्रदेश नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या उपाध्यक्ष या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाची संघटनात्मक बांधणी उत्तमरित्या करून पक्ष मजबूत करण्यासाठी आपण सर्वशक्तीनिशी योगदान संगिता ठोंबरे देतील असा ठाम विश्वास धरुन समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन पक्षाची ध्येय धोरणे तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय पद्मविभूषण खा.शरद पवार यांचे विचार सर्वदूर पोहोचविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहातील अशी अपेक्षा धरुन राज्याचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी त्यांची निवड केली आहे.या त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# अंबाजोगाईत आज सामुहिक श्रीसूक्त हवनचे आयोजन

## माहेश्वरी महिला मंडळ व यज्ञ सेवा समितीचा संयुक्त पुढाकार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ नोव्हेंबर**

अंबाजोगाई शहरात आज गुरूवार, दिनांक ७ नोव्हेंबर रोजी परमपूज्य बहुसोमयाजी यज्ञमार्तंड यज्ञेश्वर सेलूकर महाराज यांचे प्रमुख उपस्थितीत सामुहिक श्रीसूक्त हवनचे आयोजन करण्यात आले आहे.



माहेश्वरी महिला मंडळ व यज्ञ सेवा समितीचा संयुक्त पुढाकाराने आज गुरूवार, दिनांक ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता योगेश्वरी देवी मंदिर परीसर, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आलेल्या सामुहिक श्रीसूक्त हवन कार्यक्रमासाठी शहर व परिसरातील नागरिकांनी सर्वांनी लाभ घ्यावा अशी विनंती व आवाहन आयोजक माहेश्वरी महिला मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे. श्रीसूक्त हवनसाठी आवश्यक असणारे साहित्य कार्यक्रम स्थळी उपलब्ध आहे. अशी माहिती ही माहेश्वरी महिला मंडळ व यज्ञ सेवा समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

# राजेसाहेब देशमुख समर्थकांचा नारा अनुक्रमांक तीन, आम्हीच होणार विन

## जनतेला सापडलाय राजेसाहेब देशमुख पर्याय नवा, परळी मतदारसंघात तुतारीची हवा

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.६ नोव्हेंबर**

परळी विधानसभा मतदारसंघात राजेसाहेब देशमुख यांच्या जनसंवाद दौऱ्यास जनतेचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. परळी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शरदचंद्र पवार पक्ष व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर जनसंवाद यात्रेस प्रारंभ केला. गावोगावी जनसंवाद दौरा सुरू केला आहे.

गावागावातून नागरिक त्यांचे सहर्ष स्वागत करीत असून, मोठ्या प्रमाणात मतदार या यात्रेत सहभागी होत आहेत. या जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून राजेसाहेब देशमुख मतदारसंघातील नागरिकांच्या मनाचा ठाव घेत आहेत. जनतेचे प्रेम आणि समर्थन पाहून राजेसाहेब देशमुखांच्या लोकप्रियतेचा अंदाज येत आहे. परळी विधानसभा मतदारसंघात राजेसाहेब देशमुख यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर ते हा जनसंपर्क दौरा करीत आहेत. मतदारसंघात एक नवा सक्षम पर्याय व लोकप्रिय चेहऱ्याच्या रूपात ते आले आहेत. त्यांच्या या उमेदवारीला मतदारसंघातील जनतेने दिलखुलास प्रतिसाद दिला आहे. परळीतील नागरिकांना विकासाची नवी आशा वाटत



आहे. या दौऱ्यात, प्रत्येक गावात त्यांचे जंगी स्वागत केलं जात आहे, आणि फुलांचा वर्षाव होत आहे. गावागावात राजेसाहेब देशमुख पोहोचताच लहान थोर, महिला आणि पुरूष मोठ्या संख्येने जनसंवाद यात्रेला उपस्थित राहताना दिसून येत आहेत. त्यांचा साधेपणा, स्पष्टवक्तेपणा आणि त्यांच्याकडे असलेले परळी विधानसभा मतदारसंघाच्या विकासाचे व्हिजन, लोकहिताच्या योजना यामुळे जनता त्यांच्याकडे मोठ्या अपेक्षेने पाहत आहेत. प्रत्येक भेटीत ते गावकऱ्यांशी थेट संवाद साधत आहेत, त्यांच्या समस्या, अडचणी समजून घेत आहेत आणि त्यांच्या प्रश्नांना सकारात्मक उत्तरे देत आहेत. प्रत्येक गावात ते लोकांशी भावनिक नातं निर्माण करीत आहेत, ज्यातून परळीचा विकास साधण्याचं त्यांचा दृढ संकल्प पाहायला मिळतो. राजेसाहेब देशमुखांच्या जनसंवाद यात्रेतील प्रत्येक ठिकाणी एकच चित्र दिसून येत आहे. ते म्हणजे सर्वत्र उत्साह आणि एकजुटीचं वातावरण, विविध वयोगटातील लोक मोठ्या संख्येने यात्रेत सामील होऊन त्यांना पाठिंबा देत आहेत. जनतेत असलेल्या उत्सुकतेमुळे हा जनसंवाद दौरा आता सभेसारख्या मोठ्या संख्येत बदलत चालला आहे. लोकांचा प्रतिसाद आणि सभांमध्ये असलेली गर्दी पाहता, राजेसाहेब देशमुखांना आगामी निवडणुकीत जनतेचा भरघोस पाठिंबा मिळेल असा विश्वास त्यांच्या समर्थकांना आहे.

# धारूरमध्ये महाविकास आघाडीचा जोरदार प्रचार

**तालुका अध्यक्ष युवराज लगड यांच्या नेतृत्वात प्रत्येक घरोघरी जाऊन उमेदवारांची जनजागृती**

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.६ नोव्हेंबर**



माजलगाव मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार मोहनदादा जगताप यांना विजयी करण्यासाठी धारूर शहर आणि तालुक्यातील राष्ट्रवादी कांग्रेसच्या कार्यकर्त्यांनी प्रचाराला गती दिली आहे. तालुका अध्यक्ष युवराज लगड यांच्या नेतृत्वात कार्यकर्ते प्रत्येक घरोघरी जाऊन उमेदवारांचे जाहीरनामा सादर करत आहेत, तसेच कॉर्नर बैठका आणि हॉटेल् सार्वजनिक ठिकाणी आयोजित सभा करून जनजागृती वाढवत आहेत.

राष्ट्रवादी मावळ्यांनी या वेळी मोहनदादा जगताप यांना मोठ्या प्रमाणात मतदान करून निवडून आणण्याचा निर्धार केला आहे. उपस्थित कार्यकर्ते सांगत आहेत की, आम्ही प्रत्येक ठिकाणी आमच्या उमेदवारांच्या समर्थित प्रचार करीत आहोत. मोहनदादा जगताप यांचे चिन्ह 'तुतारी' असल्याने, कोणत्याही स्थानिक कार्यक्रमांत तो दर्शवून मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करत आहोत. राष्ट्रवादीचे कार्यकर्ते समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन काम करण्याच्या दिशेने कार्यरत असून, आगामी निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारांना यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्यास तत्पर आहेत.

# प्रचार सोडून धनंजय मुंडे पोहचले आजारी जिवलग कार्यकर्त्याच्या मदतीला

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.६ नोव्हेंबर**

उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आणि त्यातच प्रचाराची धामधूम असताना स्वतः उमेदवार असलेल्या धनंजय मुंडे यांना आपला जिवलग कार्यकर्ता शरद कावरे एका आजारामुळे रुग्णालयात दाखल असल्याचे कळताच प्रचार सोडून धनंजय मुंडे यांनी थेट रुग्णालय गाठून आपल्या जिवलग सहकाऱ्याची भेट घेऊन चौकशी करून पुढील उपचारासाठी त्यांना लातूर येथे पाठवण्याची सोय करून दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी तसेच धनंजय मुंडे यांचे जिवलग सहकारी असलेले शरद कावरे यांना थायरॉईड व युरीन इन्फेक्शन मुळे अचानक त्रास होऊ लागल्याने आज कुटुंबीयांनी परळीतील डॉ. वैभव डुबे यांच्या दवाखान्यात ॲडमिट केले होते.

यावाबत माहिती मिळताच धनंजय मुंडे थेट डॉक्टर डुबे यांच्या रुग्णालयात पोहोचले. आपल्या नेत्याला अडचणीच्या काळात धावून आलेले पाहून शरद कावरे यांना रडू कोसळले. यावेळी धनंजय मुंडे यांनी शरद कावरे यांच्या पाठीवर थाप मारत त्यांना धीर दिला. 'शरद तुला लगेच लातूरला शिफ्ट करतो, काळजी करू नकोस, दोन दिवसात



बरा होऊन परत येशील' असा विश्वास धनंजय मुंडे यांनी शरद कावरे यांना व त्यांच्या कुटुंबीयांना दिला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी हेही उपस्थित होते.त्यानंतर पुढील काही मिनिटातच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या म्बुलन्स मधून शरद कावरे यांना लातूर येथील विवेकानंद रुग्णालयात शिफ्ट करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर असून ते लवकरच बरे होतील असा विश्वास डॉक्टरांनी व्यक्त केला आहे. अगदी अज्ञात व्यक्ती नाही अडचणीला मदत करणारे म्हणून धनंजय मुंडे सुपरीचीत आहेत. त्यातच निवडणुकीचा प्रचार सोडून आपल्या जिवलग कार्यकर्त्याच्या मदतीला धावून गेल्याचे वृत्त समजताच धनंजय मुंडे यांच्या कार्यकर्त्यांमध्ये चैतन्याचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# माजलगाव मतदारसंघात रमेशराव आडसकर बाजी मारणार!

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.६ नोव्हेंबर**



माजलगाव मतदारसंघात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी आता खऱ्या अर्थाने सुरु झाली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धारूर येथील प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व आणि सर्व समाजात मानले जाणारे डॉ. मयुर सावंत यांच्याशी चर्चा केली असता, त्यांनी अपक्ष उमेदवार रमेशराव आडसकर यांच्या विजयाची खात्री व्यक्त केली.

डॉ. सावंत म्हणाले, गेल्या निवडणुकीत रमेशराव आडसकर यांनी लाखाच्या जवळ मतदान घेतले होते. जरी त्यांचा तोपर्यंत पराभव झाला असला, तरी त्यांनी मतदारसंघात कायम राहून मतदारांच्या सुख-दुखात भागीदार बनले आहेत. त्यामुळे त्यांच्यात नागरिकांशी भावनिक नाते निर्माण झाले आहे. त्यांच्या कामाचे कौतुक करताना डॉ. सावंत यांनी पुढे सांगितले की विरोधी पक्षातील कार्यकर्ते, नेते आणि मतदार त्यांच्या पाठीशी उभे राहिले आहेत. तसेच, सर्व जाती धर्मातील नागरिकांमध्ये रमेशराव आडसकर यांच्याबद्दल विश्वासाचे नाते निर्माण झाले आहे.

आडसकर यांना दिलेल्या पाठिंब्याबद्दल बोलताना, डॉ. सावंत म्हणाले, त्यांनी विविध मुद्यांवर आंदोलने केली आहेत, शेतकऱ्यांच्या समस्यांवर आवाज उठवला आहे, आणि कोरोना काळात नागरिकांसाठी आवश्यक उपाययोजनाही केल्या आहेत. या सर्व बाबींमुळे रमेशराव आडसकर संपूर्ण मतदारसंघात घराघरात पोहचले आहेत आणि त्यांच्याविषयी जनतेत सहानुभूतीची लाट आहे.अशा परिस्थितीत, डॉ. मयुर सावंत यांनी विश्वास व्यक्त केला आहे की रमेशराव आडसकर अपक्ष आमदार म्हणून निवडून येणार आहेत.

# क्षुल्लक कारणावरून पाय मोडला

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : एका कार्यक्रमात गायक असलेल्या तरुणाना गाणे म्हणण्यापासून मज्जाव करण्याला तरुणाला विचारणा केली असता त्या तरुणाने गायकाचा लाकडी दांड्याने पाय मोडला. ही रांजणागांव शें . पू. या गावात घडली या प्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रांजणगाव येथील रहिवासी भगवान भानुदास घुगे वय २९ वर्षे हा, रांजणगाव फाटा येथील एका नविन मोबाईल शॉपीची जाहीरात प्रसिद्ध करण्यासाठी गाण्याचा कार्यक्रम ठेवला होता. यासाठी एकुण चार सिंगर हजर होते, परंतु त्याठिकाणी हजर असलेले अमोल ढगे, छोट्या व त्याचे दोन साथीदार यांच्यात गाणे म्हणण्याच्या कारणावरून वाद झाला. यात भगवान घुगे या गायकास अमोल ढगे, छोट्या व त्याचे दोन साथीदार यांनी लाकडी दांडयाने मारहाण केली यात भगवान घुगे यांच्या उजव्या पायावर मारुन पायाचे हाड फॅक्चर केले. घुगे यांच्या तक्रारींवरून एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# १९ गोमातेची पैठण पोलिसांकाडून सुटका; २९ लाखाचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०६ : गो हत्या करून गोमास विक्री करण्यासाठी क्रूरतेने वाहनात रात्रीच्या वेळेस घेऊन जाताना पैठण पोलीस पथकाने १९ गोमातेची सुटका करून वाहनासह २९ लाख ५० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.



अधिक माहिती अशी की पैठण विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पैठण पोलीस निरीक्षक संजय देशमुख व पोलीस पथक नगर कडे जाणाऱ्या मार्गावर असलेल्या वाहन तपासणी केंद्रावर कर्तव्य बजावीत असताना मंगळवारी रोजी रात्री नऊ वाजेच्या दरम्यान अशोक लिलँड कंपनीचा आयशर क्रमांक एम.एच १३ सी.यु २८६० हे वाहन वेगाने जात असताना तपासणी केंद्रावर पोलीस पथकाने थांबण्याचा इशारा देऊन देखील वाहन न थांबता पळून नेण्याचा प्रयत्न करीत असताना या वाहनात काहीतरी आहे या उद्देशाने वाहन तपासणी केली असता यामध्ये १९ गायी नियमाचे पालन न करता क्रूरतेने वाहतूक करून गोमास विक्री व कत्तल करण्यासाठी घेऊन जात असल्याचे आढळून आले. कारवाई सुरू असताना सदरील चालक व मालक वाहन सोडून फरार झाले असून प्रत्येक गायची किंमत ५० हजार रुपये प्रमाणे ९ लाख ५० व जप्त वाहन किंमतसह २९ लाख ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्याची कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय देशमुख, पोलीस उपनिरीक्षक एकनाथ नागरगोजे यांनी केली असून सदरील गोमातेची तपासणी पशुवैद्यकीय अधिकारी यांनी करून या गोमातेला पैठण येथील विजय पांडुरंग गोशाळा येथे ठेवण्यात आले आहे.

# विधानसभा निवडणूक अनुषंगाने बिडकीन पोलिसांचे पथ संचालन

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि .६ नोव्हेंबर पैठण विधानसभा मतदानाच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार,पैठण उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे यांच्या आदेशानुसार आज दि ६ नोव्हेंबर रोजी बिडकीन येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली बिडकीन शहरामध्ये तसेच चितेगाव, लोहगाव, येथे सी आर पि एफ दल व होमगार्ड ,व बिडकीन पोलीस यांनी पथ



संचालन केले यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, पोलीस उपनिरीक्षक अशोक माने, पोलीस उपनिरीक्षक मनेश जाधव, स्थानिक गुन्हा शाखेचे एस एस कदम,सहाय्यक फौजदार सोमनाथ तांगडे, अशोक सोकटकर, महादेव निकाळजे,दिलीप साळवे , संदिप धनेधर, आप्पासाहेब माळी,संजय चव्हाण, योगेश नाडे, साहेबराव राठोड व महिला पोलीस सहभागी होते.

# निवडणुकीत नात्या- गोत्यांचे राजकारण नको: खा. अशोक चव्हाण

तभा वृत्तसेवा

नांदेड,दि. ०५ नोव्हेंबर

लोकसभा तसेच जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघातील विकास कामे पूर्ण करायची असून या विकास कामात नात्या-गोत्याचे राजकारण आले नाही पाहिजे असे आवाहन खासदार अशोक चव्हाण यांनी केले.



शहरातील यशवंत महाविद्यालयाच्या मैदानात भोकर, मुदखेड, अर्धापुर येथील मतदार संवाद बैठकीत ते बोलत होते. यावेळी लोकसभा उमेदवार डॉ. संतुक हंबर्डे, नरेंद्र चव्हाण, गोविंद शिंदे नागलीकर, बालाजी जाधव, डॉ. विश्वंभर पवार यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना खासदार अशोक चव्हाण म्हणाले की, कुठल्याही मतदारसंघात विकासाची जाण असणारा उमेदवार असला पाहिजे. त्याच्या माध्यमातून विकास कामे खेचून आणता आली पाहिजेत. त्यातच उर्वरित विकास कामे देखील झाली पाहिजेत. उमेदवार श्रीजया चव्हाण यांना राजकीय वारसा आहे. कै. डॉ. शंकरराव चव्हाण यांच्यामुळे नांदेडची ओळख आहे. परंतु सध्या स्थितीत नात्या- गोत्यांचे राजकारण सुरू आहे. विरोधक व्यक्तिगत पातळीवर विरोध करत आहेत परंतु मतदार संघाच्या विकासासाठी या विरोधाकडे दुर्लक्ष करून विकासासाठी भाजपा जनतेसोबत आहे. त्यामुळे जनतेने देखील भाजपा महायुतीला साथ द्यावी असे आवाहन खासदार अशोक चव्हाण यांनी केले यावेळी केले. यावेळी बोलताना उमेदवार संतुक हंबर्डे म्हणाले की, प्रधानमंत्री मोदी यांच्या स्वप्नपूर्तीसाठी आपल्याला साथ द्यायची आहे. राम मंदिर परराष्ट्र धोरण, ३७० कलम असे ऐतिहासिक निर्णय प्रधानमंत्री मोदी यांनी घेतले असून देशाची महत्त्वपूर्ण निवडणूक असलेल्या या निवडणुकीत जनतेने भाजपाला साथ द्यावी असेही ते यावेळी म्हणाले.

# सुरेश बनकर च्या सभेला अंभई सर्कल मध्ये प्रचंड प्रतिसात

सिल्लोड, : ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था बिकट असून निवडणूक आली की स्थानिक लोकप्रतिनिधीकडून फक्त फलक लावून नारळ फोडली जातात. स्वतःच्या शाळा, मेडिकल कॉलेज हाच तालुक्याचा विकास असल्याची टीका महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेश बनकर यांनी नाव न घेता मंत्री अब्दुल सत्तारांवर केली.



उंडणगाव सर्कलमधील केळगाव, खुल्लोड, पांगरी, रेलगाव, अंभई, पिंपळगाव घाट, सिरसाळा आदी गावांमध्ये प्रचार सभा तसेच बैठका घेण्यात आल्या. यावेळी बनकर बोलत होते. सभांना सुनील मिरकर, शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख रघुनाथ चव्हाण, रघुनाथ घरमोडे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भास्कर घायवट, राष्ट्रवादी काँग्रेसचे राहुलकुमार ताठे, अजित पाटील, शांतीलाल अग्रवाल, अरुण काळे, उत्तम शिंदे, कृष्णा बावस्कर, विष्णू काटकर, देविदास आमटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेश बनकर यांना मोठा प्रतिसाद मिळत असल्याने मंत्री अब्दुल सत्तार यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. सुरेश बनकर यांचा विजय निश्चित असून निकालानंतर मंत्री सत्तार माजी होतील असा विश्वास यावेळी बोलताना सुनील मिरकर यांनी व्यक्त केला. तर भास्कर घायवट, राहुलकुमार ताठे, शांतीलाल अग्रवाल यांनी भाषणातून मंत्री अब्दुल सत्तार यांचा समाचार घेत सुरेश बनकर यांना विजयी करण्याचे आवाहन केले. यावेळी मधुकर राऊत, गणेश ढगे, हरिदास शेलार, उमेद देशमुख, विश्वनाथ पाटील, विजय पवार, विनोद चव्हाण, गणेश बावस्कर, त्रिंबक गव्हाणे, कृष्णा उखर्डे, अजीम पेंटर आदींसह महाविकास आघाडीतील पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिकअपने धडक देऊन डोक्यात रॉडने वार करून इसमास केले जागीच ठार

## माहूर तालुक्यातील मौजे हिंगणी येथील घटना

तभा वृत्तसेवा

माहूर दि. ०६ नोव्हेंबर

माहूर तालुक्यातील मौजे हिंगणी येथील बकऱ्या चारणाऱ्या एका इसमास पिकअप मालवाहू ऑटो चालविणाऱ्याने धडक देऊन खाली पडल्यानंतर डोक्यात रॉडने वार करून जागीच ठार केल्याची घटना दि ५ नोव्हेंबर रोजी १०.३० वाजता घडली असून, आरोपीस माहूरचे सपोनी शिवप्रकाश मुळे यांनी तात्काळ अटक केली आहे. मौजे हिंगणी येथील किरण विठ्ठल खिरे वय २६ वर्ष हे नेहमीप्रमाणे सकाळी बकऱ्या घेऊन जंगलाकडे जात होते गावातून पुढे काही अंतरावर गेल्यानंतर पाठीमागून मौजे हिंगणी येथील रहिवासी संतोष उत्तम शिंदे वय ३२ वर्ष याने आपल्या स्वतःच्या मालकीच्या टाटा पिकअप छोटा हत्ती मालवाहू छोटा टेम्पो क्रमांक एम एच १२ यु एम ४३४५ हा भरधाव वेगात नेऊन त्याचा आवाज ऐकून पलटण्याआधीच जोरदार धडक दिली त्यामुळे खिरे याच्या डोक्यात जबर मार लागल्याने तो खाली पडला. आरोपी शिंदे यांनी खाली उतरून गाडीतील जाक चढविण्याच्या टामिने त्याच्या डोक्यात व इतर ठिकाणी जोरदार वार करून त्याला जागीच ठार करून टाकले.सदरील घटना मयत खीरे याचे भाऊ गजानन खिरे यांनी प्रत्यक्ष बघितल्याने त्यांनी घटनास्थळाकडे आरडा ओरड करून धाव घेतली असता, आरोपी शिंदे यांनी टेम्पोसह घटनास्थळावरून पळ काढला. दरम्यान त्यानंतर इवळेश्वर येथे टेम्पो सोडून पळून जाण्याचे तयारीत असल्याची माहिती माहूरचे स पो नी शिवप्रकाश मुळे यांना मिळाली त्यांनी तात्काळ सपोनी सुनील गायकवाड पो उप नी पालसिंग ब्राह्मण पोहेका गजानन चौधरी पोहेका संदीप गोपनवाड पोहेका आशिष डगवाल पोहेका प्रशांत भोपळे पो का नागरगोजे पो का पवन राऊत यांनी आरोपीस अटक केली. सदरील माहिती फॉरेन्सिक टीमला कळविण्यात आल्याने त्यांनी माहूर पोलीस ठाण्यात जप्त केलेल्या वाहनाची तपासणी करून नमुने जप्त केले आहेत. मयत किरण खिरे यांचे भाऊ गजानन खिरे यांच्या फिर्यादीवरून संतोष शिंदे यांचे विरुद्ध माहुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून सदरील माहिती वरिष्ठांना कळविण्यात आल्याने घटनेची माहिती मिळताच उपविभागी पोलीस अधिकारी दादाराव शिनगारे यांनी मौजे हिंगनी गावात भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली आहे.

# प्रशिक्षण पूर्ण करून आलेल्या सीमा सुरक्षा बलाच्या जवानांची शहरात मिरवणूक

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.६ नोव्हेंबर

अकरा महिन्यांचे सीमा सुरक्षा बलाचे प्रशिक्षण पूर्ण करून आलेल्या सोयगावातील दोन जवानांची शहरवासीयांच्या वतीने सकाळी दहा वाजता घोड्यावर मिरवणूक काढुन दोन तास आनंदोत्सव साजरा करण्यात आला.हरियाणा येथे अकरा महिन्यांच्या प्रशिक्षण नंतर हे दोन जवान बुधवारी सोयगावात येताच त्यांची शहरातील वाल्मिक ऋषी मंदिरा पासून ते छत्रपती शिवाजी महाराज चौक,बस स्थानक परिसर,काळे नगर,शिवाजी नगर,आमखेडा या भागांतून मिरवणूक काढण्यात आली होती दहा वाजता सुरू झालेल्या मिरवणुकीचा बारा वाजता त्यांच्या निवासस्थानी समारोप करण्यात आला.



शहरातील काळेनगर भागातील कैलास गोंविदा इंगळे(वय.२२) व शिवाजी नगर-आमखेडा येथील अतुल गणेश आगे(वय.२४) असे शहरातून घोड्यावर मिरवणूक काढलेल्या जवानांची नावे आहे मंगळवारी हे दोन्ही हरियाणा येथील प्रशिक्षण आटोपून बुधवारी सोयगाव शहरात परतले यावेळी त्यांचा सत्कार म्हणून शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.यावेळी त्या दोघांची आई वडील भारावून गेले होते.मिरवणुकीत गोविंद इंगळे, निर्मलाबाई इंगळे,गजानन इंगळे,शिवजी कोळी,अमोल इंगळे,मंगेश निकम,ज्ञानेश्वर जाधव,विलास इंगळे,सागर राऊत,राजू माळी,अनिल नेरपगारे,कृषी भूषन अरुण सोहणी,ड स्वनिल सुरळकर,ड शुभम आगे,ड योगेश जावळे,गणेश आगे,ताराबाई आगे,जगदीश मिसाळ,राहुल परेराव,रामचंद्र लाठे, राहुल आगे,रामचंद्र आगे,अक्षय वाघ,अमोल इंगळे,पवन आगे, कृष्णा आगे,भागवत आगे,प्रकाश तायडे,आदींची उपस्थिती होती.

# भाजपा-शिवसेना महायुतीची विजय संकल्प पदयात्रा - भारतनगरमध्ये अतुल सावे यांचा भव्य प्रचार



छत्रपती संभाजीनगर : आगामी निवडणुकांसाठी मतदारसंघात जोरदार प्रचार सुरू असून, छत्रपती संभाजीनगर पूर्व मतदारसंघातील भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस-आरपीआय (आ)-मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार ना. अतुल मोरेश्वर सावे यांच्या प्रचारार्थ बुधवारी भारतनगरमध्ये भव्य पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेला ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि कार्यकर्त्यांचा जल्लोष यांची भरभरून साथ मिळाली.

मेहरसिंग नाईक विद्यालय येथून सुरू झालेली ही पदयात्रा वार्ड क्रमांक ११३ भारतनगरातील विविध भागातून पार पडली. पदयात्रेच्या मार्गात ना. सावे यांनी मतदारांशी संवाद साधत आपल्या भागातील प्रगतीचे वचन दिले आणि जनतेला विश्वास दिला की, महायुतीच्या माध्यमातून विकासाची गती अजून वाढवली जाईल. या वेळी महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात महायुतीच्या इतर घटक पक्षांच्या नेत्यांनीही सहकार्य देत एकात्मतेचा संदेश दिला आणि समर्थकांनी मतदारांमध्ये उत्साह निर्माण केला. महायुतीची ही ताकद पाहता या निवडणुकीत अतुल सावे यांना प्रचंड मतांनी विजय मिळणार अशी अपेक्षा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

# विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात १ लाखांहून अधिक मतदान केंद्र

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. ६ नोव्हेंबर:- विधानसभेच्या निवडणुकीसाठी राज्यभरात १ लाख ४२७ मतदान केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. मतदारांना सुलभतेने मतदान करता यावे, या दृष्टीकोनातून राज्यात मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात आले असून. सर्वाधिक मतदान केंद्र पुणे जिल्ह्यात आहे. पुण्यात ८ हजार ४६२ मतदान केंद्र आहेत. त्यानंतर मुंबई उपनगर येथे ७ हजार ५७९, ठाणे - ६ हजार ९५५, नाशिक - ४ हजार ९२२ तर नागपूर येथे ४ हजार ६३१ मतदान केंद्र आहेत. निवडणूक आयोगाने शहरी भागातील मतदाराची अनास्था विचारात घेऊन गृहनिर्माण संकुलात मतदान केंद्र उभारली आहेत तसेच ग्रामीण आणि आदिवासी भागातील मतदारांना मतदान केंद्राच्या जवळ लवकरात लवकर पोहोचावे यासाठी मतदान केंद्राची संख्या वाढवली आहे. राज्यातील २४१ विधानसभा मतदारसंघात मुख्य आणि सहायक मतदान केंद्रांची संख्या निश्चित केली आहे. यंदा राज्यात मुख्य मतदान केंद्र ही १ लाख १८६ असून त्यापैकी शहरी भागात ४२ हजार ६०४ तर ग्रामीण भागात ५७ हजार ५८२ इतकी मतदान केंद्र संख्या राहणार आहे. सहायक मतदान केंद्रांची संख्या २४१ इतकी आहेत. गेल्या काही निवडणुकांच्या तुलनेत मतदान केंद्रांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रात पोहोचता यावे, यासाठी बऱ्याच ठिकाणी आवश्यक रॅम्पची देखील व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**आदिवासी आणि दुर्गम क्षेत्रावर विशेष लक्ष -** निवडणुकीत आदिवासी मतदारसंघ आणि दुर्गम भागांतील मतदारांसाठी विशेष सुविधा देण्यावर भर दिला आहे. गडचिरोली, गोंदिया, नंदुरबार, धुळे, आणि अमरावती जिल्ह्यात जेथे आदिवासी आणि दुर्गम भाग आहेत तेथे मतदान केंद्रांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली आहे.

# औद्योगिक परिसरात महिला कामगार सुरक्षीत आहे का?

वाळूज महानगर (प्रतिनिधी): घरगुती काम करणाऱ्या, कंपनी कामगार, मातीकाम व शेतमजूर या असंघटित क्षेत्रातील महिलांच्या कार्यक्षेत्राला कोणतेही वलय नसते. कामावर असताना या महिलांकडे वाईट नजरेने पाहिले जाते. पुरूष कामगार, मुकादम, कंत्राटदार, तर कधी खुद्द मालकाकडून त्यांना लैंगिक छळ सहन करावा लागतो. कुटुंब किंवा यंत्रणेकडून सुरक्षा मिळत नसल्याने असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांना लैंगिक छळाच्या प्रमाण जास्त आहेत.



वाळूज एमआयडीसी हा परिसर कामगारांचा परीसर म्हणून ओळखला जातो, या ठिकाणी आपल्या हजारो कारखान्यात पुरुषांबरोबर खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या महिलांचा वर्ग जास्त आहे. शासनाने महिलांच्या सुरक्षेसाठी अनेक कठोर नियम आणि कायदे करून ठेवले आहे परंतू या कायद्याचा व नियमांचा उपयोग फक्त कागदोपत्री होत आहे. त्याचाच परिणाम म्हणून खाजगी महाविद्यालय, शाळा, दवाखाने, आणि खाजगी कारखाने यामध्ये काम करणाऱ्या महिलांना मात्र रोजच स्वतःचे मरण उघड्या डोळ्यांनी पाहावे लागत आहे. केवळ कुटुंबाची जबाबदारी आणि नोकरी टिकवण्यासाठी त्रास सहन करत काम करावे लागत आहे.

दोन दिवसांत तीन गुन्हे वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले, त्यांपैकी एक मुलगी अल्पवयीन तर दोन महिला विभक्त राहुन मुलांच्या भवितव्यासाठी विखारी नजरांना तोंड देत लढत आहेत, या महिलांनी हिंमत केली म्हणून पोलिसांना न्याय देता आला परंतु अशा कित्येक महीला लैंगिक छळाला बळी पडत आहेत. हे जरी कटू सत्य असले तरी शासनाने नियुक्त केलेल्या समित्या केवळ कागदावरच असल्याचे दिसून येत आहे. कामगार उपायुक्त ही या प्रकरणी गंभीर नसल्याचे दिसून येत आहे.आज पर्यंत उद्योग क्षेत्रात महिलांच्या सुरक्षेसाठी करण्यात आलेल्या एकाही समितीला महिला अत्याचाराचे एकही प्रकरण उघड करण्यास यश आले नाही हे विशेष.

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party** : **Bharatiya Janata Party**

***Name of Election** : **Maharashtra Legislative Assembly - 2024**

**Name of State/UT** : **Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 232 - Kaij (S.C.) | Namita Akshay Mundada | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 232 - Kaij (S.C.)**

**Place : Mumbai**

**Date : 05/11/2024**

Signature of office bearer of the Political Party

Name and designation...

**Chandrashekhar Bawankule, President**

**Bharatiya Janata Party, Maharashtra**

# डंके की चोट पर, अर्जुन खोतकरच आमदार जालनेकरांची तुर्त हाक!

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

दिवसेंदिवस विधानसभा निवडणुकांच जालना शहरात वातावरण गरम होताना दिसत आहे . जो तो राजकीय व पुढाऱ्यांची गुणगाण गात असून आजी माजी आमदार यांच्या नेतृत्वात जालन्यातील विकास कामे आणि शहरातील बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी केलेल्या जनजागृतीची सामान्य जणतेतुन मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहेत मात्र महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनी आमदारकी नसतानाही जालना शहरातीन प्रलंबीत रस्त्यांसह ग्रामीण भागात अनेक ठिकाणी सभागृहे , जलकुंभ , दळण वळण करण्यासाठी रस्ते , शेतकऱ्यांच्या बांधावर विजेचे ट्रान्सफार्म बसवले बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून दिला विकासकामे केली आहे . त्यामुळे अर्जुनराव खोतकरांना आवेळी मतदार संघातुम जणता स्वतः तारणार असल्याचे बोलले जात आहे . महाविकास आघाडीचे उमेदवार कैलाश गोरंटयाल यांच्या विषयी



मतदार संघातून रोष निर्माण झाला आहे तर अर्जुनराव खोतकर यांच्या बाबतीत मात्र मतदार बांधव समाधानाने सांगतात कि अबकी बार डंके कि चोटपर खोतकर आमदार त्यामुळे यावेळी जालना विधानसभा मतदारसंघातुन कॉग्रेस पक्षाचे आमदार गोरंटयालमाल यांना जालनेकर आमदार पदावरूण धक्का मारणार असून मतदार संघाला नवा आमदार महायुती सरकार चा असेल आणि जालना मतदारसंघाचा आमदार असताना मी रस्ते, पाणी पुरवठा, आरोग्य, रोजगार आणि वीज प्रत्येक गाव आणि शहरात आधुनिक सुविधा सुनिश्चित करण्यासाठी, प्रभावी योजनांची अंमलबजावणी केली.

यामुळेच मला मतदारसंघातील जनतेचे प्रेम व आशीर्वाद लाभले !

भविष्यात जालना मतदारसंघास समृद्ध आणि संपन्न बनविण्यासाठी मी विकास आराखडा बनविला आहे! पाच वर्षात थांबलेल्या विकासाची पोकळी भरून काढायची व जालना मतदारसंघास पुन्हा एकदा विकासाच्या नव्या उंचीवर न्यायचे!

## तात्काळ निदान व उपचाराने कर्करोग बरा होऊ शकतो-डॉ.आदित्य मंत्री



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

तात्काळ निदान झाल्यास उपचाराने कर्करोग ९० ते ९५ टक्के बरा होऊ शकतो. त्यामुळे काही शंका आल्यास अथवा लक्षणे दिसू लागताच तात्काळ तपासणी करून घ्यावी व संभाव्य धोका टाळावा, असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथील ऑंकोरिलीफ कॅन्सर क्लिनिकचे कर्करोग शस्त्रक्रिया तज्ञ डॉ. आदित्य दीपक मंत्री यांनी येथे बोलताना केले. शहरातील एसआरपीएफ कॅम्पमध्ये पोलीस जवानांसाठी आयोजित कर्करोग मार्गदर्शन शिबिरात डॉ. आदित्य मंत्री बोलत होते. व्यासपीठावर एसआरपीएफच्या कमांडंट उज्वला वनकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीमती जे. के. वाडिया, श्री. होटकर, स्त्रीरोग तज्ञ डॉ. आरती मंत्री, ओंको पॅथॉलॉजीस्ट डॉ. श्वेता सिकची यांची उपस्थिती होती. यावेळी पोलीस जवानांना मार्गदर्शन करताना डॉ. मंत्री यांनी कर्करोगाच्या पूर्वचाचण्या (स्क्रीनिंग टेस्ट), लक्षणे दिसल्यास त्वरित निदान व या आजारावर करण्यात येणाऱ्या विविध उपचार पद्धती, शस्त्रक्रिया, बिना टाक्याच्या शस्त्रक्रिया तसेच रोबोटिक सर्जरीबद्दल सखोल माहिती दिली.

## संक्षिप्त

### जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत.

संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. ६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजेपासून ते दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### ११ वर्षीय बालकाचा विहीरीत पडून मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**



जाफ्राबाद तालुक्यांतील वडाळा येथील शिवरात नव तरुण कुमार जितेंद्र प्रविण आव्हाड, वय वर्ष ११ या बाल तरुण पणातच या तरुणावर काळ ओडावला असुन दि.३० ऑक्टोबर रोजी वेळ १० :३०च्या दरम्यात वडाळा येथील जितेंन्द्र प्रविण आव्हाड, व बबलु मुलतानी, हे वडाळा शिवरात शेळ्या चारीत असतांना उन्हाच्या चटक्यामुळे जितं न्द्र आव्हाड, वय ११ वर्ष, यास तान्हाण लागल्यामुळे, विहिरी जवळ गेल्या व पाणी काढतांना विहिरीवरुण पाय घसरूण आव्हाड पाण्यांत पडल्यांने दुसऱ्या बबलु मुलतांनी यांने पाण्यात पडलेल्या आव्हाड,यास वाचवण्यास गेला असता त्यांचा सुध्दा दोघही पाण्यांत पडल्यामुळे बुचकळ्या खात बबलुने वर्ष ९ यांने मोटार वायर पकडले, मात्र आपल्या मित्र ला वाचण्यांची धडपड बबलु करित होता. मात्र हे लवकरच कोणी लक्ष न दिल्यांने अखेर वडाळा येथील जितेंन्द्र आव्हाड च्या आई वडीलांना माहिती मिळाल्या नंतर बबलु विहिरीच्या कडेला मोटार वायर पकडुन होता. तर दुसरा सहकारी मित्र जिंतेन्द्र आव्हाड, विहिर गच्च पाण्याने भरलेली असल्याने आव्हाड, हा तरुण विहिरीच्या खोल तळात गाळात जाऊन फसलेला होता. त्या नंतर वडाळा येथील आव्हाड परिवार ने मुलगा सापडत नसल्यांने विहिरीत गळ टाकुन पाहिले, मात्र त्या मध्ये गावकऱ्यांना यश आले नाही. त्यांने लगेच भोकरदन नगर परिषदची आग्णी शमन ची गाडी पाचरण करूण त्या ११ वर्ष य जितेंन्द्र आव्हाड शोधा, शोध सुरू केला. त्या आग्णी शमन दाला चा जावाना यश आले. व जितेन्द्र बाहेर काढुन शेवचछेदन करण्यासाठी माहोरा प्राथमिक आरोग्य केंद्रांत आले. व शेवच्छेदन माहोरा येथील प्रा.आ.केंन्द्रांचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोकराव वाघमारे, यांनी शेवच्छदेन करून संबधितांच्या मुत्यु देह ताब्यात देण्यात आले होते. सदरील जिंतेंन्द्र आव्हाड हा. विद्यार्थी इयता ४थीच्या वर्गात केंन्द्रीय प्राथमिक शाळा माहोरा येथे शिक्षण घेत होता. संद्या दिपावलीच्या सुटया लागल्यामुळे जितेंन्द्र शेळ्याचारण्यास गेला होता. जिंतेन्द्र आव्हाड, यांच्या निधनाने आव्हाड कुंटुंबार दुःखाचा डोंगर कोसळला, व जितेंन्द्र चा अंत्यं संस्कार वडाळा येथे करण्यांत आले. व जाफ्राबाद पोलिसानी भारतिय नागरीक सुरक्षा संहित कायदा १९४प्रमाणे दाखल करून पुढील या प्रकरणाचा तापास सहाय्यक फौजदार जे.ई. भापकर, एस.एन. गवई हे करित आहे.

## शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करून शेतकरी सन्मान योजनेतून वर्षाला बारा हजार ऐवजी पंधरा हजार देणार -आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**



प्रत्येकास अन्न आणि निवारा प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा देण्याचे महायुती चे असून वचन वृद्ध पेन्शनधारकांना महिन्याला १५०० वरून २१०० देणार असून जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर होतील २५ लाख रोजगारनिर्मिती करून १० लाख विद्यार्थ्यांनादरमहा १०,००० रुपये विद्यावेतन महायुती सरकार देईल. या बरोबर च ४५,००० गावांत पांदण रस्ते बाधणार या सह अंगणवाडी आणि आशा सेविकांना महिन्याला १५,००० वेतन आणि विमा संरक्षण देणार असल्याचे प्रतिपादन देणार असल्याच प्रतिपादन परतूर विधानसभा मतदार संघाचे महायुती चे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. परतूर तालुक्यातील आनंदवाडी, खांडवीवाडी, श्रीष्टी, दैठणा, सिंगोना, श्रीष्टी वाहेगाव, माव, पाटोदा, येनोरा, हातडी, सोयंजना, वलखेड, बामणी आणी शेरवाडा या चौदा गावात महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मतदार संवाद दौरा केला याप्रसंगी गाव- ागावात आयोजित बैठकीत मार्गदर्शन करत असताना ते बोलत होते. परतुर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रचारार्थ आयोजित जनसंवाद बैठकीदरम्यान दौऱ्यात शत्रूघन कणसे, रमेश भापकर, संपत टकले, बद्रीभाऊ ढवळे, अशोकराव बरकूले, अंकुशराव बोबडे, संभाजी वारे, गजानन लोणीकर, रवी सोळंके, माजी सभापती वाघमारे शिवाजी पाईकराव यांची उपस्थिती होती.

## अपक्ष उमेदवार जेथलियांना जनतेतून मिळतोय प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**



परतुर, मंठा, नेर सेवली विधानसभा मतदारसंघ अंतर्गत आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज मोहाडी तांडा येथे संत सेवालाल महाराज आणि ग्रामदेवतांच्या दर्शनाने दौऱ्याची सुरूवात करत मोहाडी तांडा, नेर तांडा, तिमा नाईक तांडा, वसाराम नाईक तांडा, काकडा गावं, भानुनाईक तांडा, रामेश्वर तांडा, शंभु सावरगाव येथील जनतेशी संवाद साधला तसेच आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या समस्या प्रश्न आणि विविध मुद्द्यांवर चर्चा केली यावेळी ही फक्त निवडणूक म्हणूनच नाही तर परिवर्तनाची लढाई म्हणून जनतेनेच निवडणूक हातात घेतली असल्याचे दिसून आले यावेळी वाडी तांडे आणि गावोगावी मिळत अस- लेला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद बघून मी अक्षरशः भारावून गेलो मोहाडी तांडा, नेर तांडा, तिमा नाईक तांडा, वसाराम नाईक तांडा, काकडा गावं, भानुनाईक तांडा, रामेश्वर तांडा, शंभु सावरगाव येथील पदाधिकारी कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी दौर्यास भरभरून प्रतिसाद दिला यावेळी माझ्यासोबत अविनाश चव्हाण, भागवत उफाड, लक्ष्मण शिंदे, तेजेश कुलवंत, दिलीप चव्हाण, सुहास राठोड, महादेव चेंबड, संतोष पवार, विजय चव्हाण, विशाल पाटील, विजय पवार, दिगंबर इंगळे, सुनिल ठाकरे, सुनील तूरेराव, जनार्धन काळे, गजानन ढाकणे, संदीप वैद्य, विजय पवार, भागवत बाहेकर, रणजीत राठोड, संजय शहाणे, अनिल राठोड, शिवाजी आढे, संतोष पवार, शाम जाधव, शंकर मिस्त्री,

यांच्या सह मोहाडी तांडा, नेर तांडा, तिमा नाईक तांडा, वसाराम नाईक तांडा, काकडा गावं, भानुनाईक तांडा, रामेश्वर तांडा, शंभु सावरगाव येथील पदाधिकारी कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत प्रस्थापिता विरोधात सतीश घाटगेंचा एल्गार

### नृसिंह महाराजांच्या चरणी नतमस्तक होऊन सतीश घाटगेनी फोडले प्रचाराचे नारळ

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

घनसावंगी: विधानसभा निवडणुकीचे मैदान ४ तारखेनंतर तापायला सुरुवात झाली आहे. घनसावंगी विधानसभेची निवडणूक तिरंगी होणार असल्याची जोरदार चर्चा सुरु झाली आहे. दरम्याण जनतेच्या आग्रहाखातर निवडणुकीच्या मैदानात उतरलेले समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी मंगळवारी घनसावंगी शहराचे आराध्य दैवत श्री नृसिंह महाराज मंदिरात सपत्नीक दर्शन घेऊन प्रचाराचे नारळ फोडले. या प्रसंगी हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत त्यांनी परिवर्तनाचा एल्गार केला. मंगळवारी दिवसभरात त्यांनी केलेल्या प्रचार दौऱ्यास जनतेचं मोठा प्रतिसाद मिळाला. घनसावंगी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सामना रंगेल अशी सर्वसामान्यांना वाटत होते. परंतु, महायुतीत सतीश घाटगे आणि हिकमत उढान दोघेही इच्छुक असल्याने पेच वाढला होता. समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांना पक्षाकडून उमेदवारी न मिळाल्याने घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील त्यांना मानणाऱ्या जनतेने आणि त्यांच्या समर्थकांनी त्यांना अपक्ष उभा राहण्याचा आग्रह केला. जनता आणि कार्यकर्त्यांच्या भावनेचा आदर करून सतीश घाटगे यांनी विधानसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. शेवटच्या क्षणापर्यंत महायुतीकडून आणि मोठ्या नेत्यांकडून सतीश घाटगे यांना माघार घेण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. परंतु महायुतीच्या एकाही नेत्याला त्यांना थांबवण्यात यश आले नाही. शेवटी



सतीश घाटगे यांनी जनतेला दिलेल्या शब्दांनुसार निवडणुकीतून माघार घेतली नाही. ४ नोव्हेंबर रोजी निवडणुकीचे चिन्ह मिळाल्यानंतर ५ नोव्हेंबर रोजी सतीश घाटगे यांनी आपल्या हजारो समर्थकांसह घनसावंगी शहरातील नृसिंह महाराज मंदिरात प्रचाराचे नारळ फोडत प्रस्तापिताविरोधात एल्गार केला. प्रचाराचा शुभारंभ केल्यानंतर घनसावंगी तालुक्यातील भेंडाळा, घाणेगाव, साकळगाव, दर्गा शरीफ, कोठाळा अनेक गावात त्यांनी भेट देऊन जनतेशी संवाद साधला. या प्रचार दौऱ्यास जनतेचा मोठा प्रतिसाद मिळाला. सर्वधर्मियाच्या दर्गा शरीफवर टेकला माथा सतीश घाटगे यांनी रवना-पराडा येथील सर्वधर्मियाच्या दर्गाहवर माथा टेकून दर्शन घेतले. या लढाईत जनतेच्या स्वाभिमानाचा विजय होऊ दे...परिवर्तनाची पहाट उजाडू दे असे साकडे त्यांनी घातले. जगप्रसिद्ध सर्वधर्मियाचे हे श्रद्धास्थान विकासापासून वंचित असल्याचे खेदाने इथल्या धर्मगुरूंनी त्यांना सांगितले. या पवित्र ठिकाणी नतमस्तक होत, येणाऱ्या पाच वर्षात हे श्रद्धास्थान सर्व सोयी सुविधांनी परिपूर्ण करेल असा शब्द घाटगे साहेबांनी दिला.

# लोणीकरांच्या रूपाने पुन्हा परतुर-मंठ्यात कमळ फुलणार

## परतूर विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाकरिता महायुतीचे अधिकृत उमेदवार बबनराव लोणीकर यांना प्रचंड मतांनी विजयी करा -विनोद तावडे

**परतूर । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र जी मोदी च्या नेतृत्वात केंद्रात असलेल्या सरकारमुळे देशातील दहशतवादी कारवाया शंभर टक्के थांबले असून भारत विकसित देशाच्या यादीत अव्वल स्थानी गेला आहे. गेल्या दहा वर्षाच्या कार्यकाळात पंतप्रधान मोदी जी यांच्या सरकारच्या कुठल्याही मंत्र्यावर भ्रष्टाचाराचे साधे आरोप सुद्धा झालेली नाहीत असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोदजी तावडे यांनी केले. परतूर येथील स्वर्गीय भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी नाट्यगृहात ९९ परतूर-मंठा-नेर- सेवली विधानसभा निवडणुक २०२४ भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई (आठवले गट), रयत क्रांती संघटना व मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रचारार्थ आयोजित परतूर मंठा नेर सेवली विधानसभा मतदारसंघातील प्रभावशाली व्यक्तींच्या आयोजित बैठकीत बोलताना केले. महायुती सरकारने सुरू केलेली लाडकी बहीण योजना शरद पवार यांना बंद करायची असल्याचा आरोप त्यांनी केला. या





योजनेसाठी इतर योजनांचा पैसा कमी केल्याचे पवार यांनी म्हटले होते. त्यांना इतर योजनांना तो पैसा द्यायचा आहे. म्हणजे त्याचा लाभ मधल्या मंडळींना करून द्यायचा आहे, असे तावडे म्हणाले.

पुढे बोलताना विनोद तावडे म्हणाले की युतीच्या जागावाटपात तत्कालीन शिव- सेनेकडून नेहमीच अडवणुकीचे धोरण स्वीकारले जात असे. त्यावेळी काँग्रेसला मजा येत असे. आता शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाकडून त्यांना खेळवले जात आहे, असा आरोप भाजपचे राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे यांनी केला.

या प्रसंगी महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या भाषणात परतूर मतदारसंघातील तीनशे गावांना डांबरीकरणाचे रस्ते प्रत्येक गावात सिमेंट काँक्रिटीकरण चे रस्ते गावोगाव सांस्कृतिक सभागृह अनेक प्रशासकीय इमारती मागासवर्गीय मुलींसाठी परतुर व मंठा येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मुलींचे वस्तीगृह न्यायालयीन इमारती परतुर मंठा येथे भव्य क्रीडा संकुल यासह शेगाव पंढरपूर दिंडी मार्ग आरोग्याच्या सुविधा उपलब्ध हव्यात यासाठी परतुर व मंठा या दोन्ही ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र ३३ केव्ही १३२ केव्ही २२० केव्ही परतुर विधानसभा मतदारसंघात रस्त्याचा आणि विजेचे जाळ आपण निर्माण केलं असल्याचं यावेळी आमदार लोणीकर यांनी आवर्जून नमूद केलं.

परतूर तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी रु), वाटूर, आष्टी, श्रीष्टी व सातोना येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (२४ कोटी ८८ लाख) असा एकूण ८४ कोटी ८८ लक्ष रु निधी तर मंठा तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी), दहिफळ खंदारे व ढोकसाळ या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (१२ कोटी ४४ लक्ष), तर खोराड सावंगी व उस्वद प्राथमिक आरोग्य उपकेंद्रसाठी (१ कोटी १० लाख) असे एकूण ७३ कोटी ५४ लक्ष रु निधी. मतदारसंघात २ उपजिल्हा रुग्णालयासाठी १२० कोटी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ३७ कोटी ३२ लाख तर २ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी १ कोटी १० लाख रुपये असा एकूण १५७ कोटी ४२ लक्ष रुपयांचा निधी आणला असल्याची माहिती दिली.

महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर, भाजपा महाराष्ट्र राज्य प्रदेश सचिव राहुल लोणीकर, भाऊसाहेब गोरे, संदीप गोरे, सतिश निर्वळ, भाऊसाहेब कदम, गजानन राजबिंडे, पंजाब बोराडे, गणेश बोराडे, शत्रूगण कणसे, रमेश भापकर, संभाजी वारे, संपत टकले, माऊली शेजूळ, जिजाबाई जाधव, दिपक बोराडे, कैलाश बोराडे, तौफिक कुरेशी, विठ्ठल बरकुले, गणेश घारे, श्री कारके, डॉक्टर प्रमोद जगताप, शंकर भांडवलकर, बंडू मानवतकर, विलास घोडके, प्रवीण सातोनकर, भगवानराव मोरे, दया काटे महाराज, कृष्णा आरगडे, संदीप बाहेकर, प्रकाश चव्हाण, ऍड. काळे, नंदू गांजे, जिजा शिंदे, गजानन लोणीकर, रवी सोळंके, तुकाराम सोळंके यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## अजामीनपात्र वारंटमधील आरोपीना केली अटक

तभा वृत्तसेवा

कन्नड :-दि.०६ - शहर पोलिस स्टेशन अंतर्गत असलेल्या अजामीनपात्र वारंट मधील आरोपींना विशेष मोहिमेत अटक करण्यात आली आहे पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कन्नड शहर पोलिसांनी धडाकेबाज कामगिरी करत कन्नड न्यायालयात दिवाणी व फौजदारी प्रकरणात सुनावणीकामी वारंवार गैरहजर असणाऱ्या आरोपीं विरोधात न्यायालयाने अजामीनपात्र वारंट जारी केले होते, सदरचे वारंट बजावणीसाठी कन्नड शहर पोलिसांनी दि.०५ रोजी कन्नड शहर पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या आरोपीना अटक करण्यासाठी विशेष पथक बनवून आरोपींना अटक केली यात तब्बल ०७ आरोपी होते तर ०२ आरोपी मयत झाल्याने त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र न्यायालयात सादर केले तर बाकीच्या ०७ आरोपीना न्यायालयात हजर केले. सदर पथक उपविभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड,पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सुर्यवंशी, सहाय्यक फौजदार नासेर पठाण, पोलिस कॉन्स्टेबल विजय चौधरी, लक्ष्मण चव्हाण यांनी सदर कामगिरी बजावली आहे

## बियर बार फोडून बाटल्या केल्या लंपास

छत्रपती संभाजीनगर : गंगापूर तालुक्यातील सिंधीसिरसगाव येथील एक रेस्टॉरंट व बार फोडून चोरट्यांनी ४१ हजार रूपये रोख आणि २६ हजार रुपयांची किंमती दारू लंपास केली. या प्रकरणी दौलताबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रतीक संदीप सोनवणे रा. सिंधीसिरसगाव ता. गंगापूर यांनी दिललेया फिर्यादीनुसार ४ नोव्हेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी हॉटेलचे शटर उचकटून आत प्रवेश केला. चोरट्यांनी ४१ हजार रुपये रोख तसेच २६ हजार रुपयांच्या किंमती दारूच्या बाटल्या लंपास केल्या. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## सिडको परिसरात रिक्षा चालकाला लुटले

छत्रपती संभाजीनगर : दुचाकीवर जाणाऱ्या रिक्षा चालकाला चोरट्याने लुटून खिशातील पैसे काढून घेतल्याची घटना सिडको एन ५ परिसरात घडली. या प्रकरणी सिडको पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजय शिरसाठ रा. बिजवाडी असे आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी मोहम्मद हमीद मोहम्मद युसुफ रा. संजयनगर बायजीपुरा यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार ४ नोव्हेंबर रोजी रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास फिर्यादी हे दुचाकी वर सिडको एन ५ परिसरातील एसबीआय बँके समोरून जात होते. आरोपीने दुचाकीस लाथ मारून त्यांना खाली पाडले. मारहाण करीत खिशातील २ हजार २०० रुपये काढून घेतले. या प्रकरणी सिडको पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## महिलेचा विनयभंग

छत्रपती संभाजीनगर : दोन कुटुंबात हाणामारी होऊन परस्परावर तक्रारीवरून सात जणांवर गुन्हे दाखल झाल्याची घटना पहाडसिंगपूरा परिसरात घडली. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून सुधाकर रामभाऊ वाघोले व दोन महिला आरोपी यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. महिलेच्या फिर्यादीनुसार आरोपीने फिर्यादी शिवीगाळ करून मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादीचा हात धरून जवळ ओढले. तर दुसऱ्या महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून गणेश वाघुले व तीन महिला आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलेच्या फिर्यादीनुसार आरोपीने महिलेचा हात धरून विनयभंग केला तसेच पति व सासू सोडवण्यासाठी आले असता आरोपींनी त्यांना मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी दिली.

# जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मध्ये दिवाळी च्या सुट्टी मुळे हाऊसफुल्ल

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि ६ दिवाळी सुट्ट्यांचे औचित्य साधत हजारो देशी विदेशी पर्यटकांनी दिली जगप्रसिद्ध अजिंठा लेणीस भेट.दिवसभरात ४५०० पर्यटकांनी अजिंठा लेणी बघण्याचा लुटला आनंद.

अजिंठा डोंगर रांगेत वसलेली जागतिक वारसा स्थळ असलेली अजिंठा लेणीचा परिसर सद्या हिरवाईने नटलेला आहे.त्यातच पर्यटकांचा आकर्षणाचा केंद्रबिंदू असलेला सप्तकुंड धबधबा,लेणीच्या कुशीतून वाहणारी वाघूर नदी, लेण्यांमधील शिल्प,कलाकृतीचे



विहंगम दृश्य पाहण्याचा एक वेगळाच आनंद पर्यटकांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.सद्या दिवाळीच्या सुट्या असल्यामुळे मंगळवारी सकाळपासूनच पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली होती.पुरुष,महिला,वयोवृद्ध यांच्यासह बच्चे कंपनीनी लेणी बघण्याचा मनमुराद आनंद लुटला. पर्यटकांमध्ये वाढ झाल्याने येथील व्यावसायिकांमध्ये समाधानकारक वातावरण बघायला मिळाले.

दिवाळी सुट्या असल्यामुळे पर्यटकांची गैरसोय होऊ नये म्हणून राज्य परिवहन महामंडळाने सोयगाव आगाराच्या १२ बसेसची व्यवस्था केली होती.मात्र पर्यटकांची वाढती संख्या लक्षात घेता ३ बसेस मागविण्यात आल्या.

वेरूळ लेणी बंद मुळे पर्यटक संख्येत वाढ :

वेरूळ लेणी ही मंगळवारी बंद असल्याने पर्यटकांनी आपला मोर्चा अजिंठा लेणीकडे वळविला त्यामुळे संध्याकाळ पर्यंत पर्यटकांची संख्या ही वाढतच असल्याचे चित्र पाहायला मिळाले.परिणामी,टी जंक्शन बसस्थानकावर गर्दी जमा होऊन पर्यटकांना तासभर रांगेत उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागली.

## एमजीएममध्ये 'फिलॉसॉफर्स वर्ल्ड' व्याख्यानमालेचे यशस्वीपणे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील तत्त्वज्ञान विभाग आयोजित 'फिलॉसॉफर्स वर्ल्ड' या व्याख्यानमालेतील तृतीय व्याख्यानाचे दुरदृश्यप्रणालीमार्फत आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेत बाबासाहेब भीमराव आंबेडकर केंद्रीय विद्यापीठ, लखनऊ येथील संस्कृत व वैदिक अध्ययन विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. बिपिन कुमार झा यांनी 'भर्तृहरी : दि लाईफलाईन ऑफ फिलॉसॉफी ऑफ लँग्वेज' या विषयावर उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी, अधिष्ठाता प्रा. डॉ. जॉन चेल्लादुराई, डॉ. रामेश्वर कणसे, सुधीर कार्ले, डॉ. प्रज्ञा कोनार्डे, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ.झा यांनी भारतीय ज्ञान परंपरेतील भर्तृहरीची भूमिका अधोरेखित केली. त्यांनी भर्तृहरी संदर्भात विचार मांडताना भारतीय विचारसरणीमध्ये व्यक्तिमत्त्वापेक्षा कृती अधिक महत्त्वाची असल्याचे सांगितले. व्याख्यानात नोअम चॉम्स्की आणि सर विल्यम जोन्स यांसारख्या पाश्चात्त्य भाषावैज्ञानिक विचारवंतांच्या भाषा तत्त्वज्ञानातील योगदानाचा उल्लेख केला, तसेच पाणिनि, कात्यायन आणि पतंजली यांसारख्या भारतीय विद्वानांचाही संदर्भ दिला. त्यांनी भर्तृहरींच्या महत्त्वाच्या रचनांवर प्रकाश टाकला, ज्यामध्ये वाक्यपदीयम्, महाभाष्यदीपिका, शतकत्रय, शब्दधातुसमीक्षा आणि धातुसमीक्षा यांचा समावेश होतो. यातील 'वाक्यपदीयम्' हा संस्कृत व्याकरणातील एक आधारस्तंभ मानला जातो, जो भाषाशास्त्रातील भारतीय परंपरेचा नमुना आहे, जिथे व्याकरण व भाषाशास्त्र परस्पर गुंफलेले आहेत.

कार्यक्रमाच्या प्रश्नोत्तर सत्रात सहभागींनी भर्तृहरींच्या समकालीन विचारसरणीतल्या योगदानाचा शोध घेतला. भारतीय आणि विदेशी भाषा संस्थेचे संचालक प्रा.डॉ.के.पी.सिंग यांनी अध्यक्षीय समारोप केला, ज्यामध्ये त्यांनी भारतीय बौद्धिक वारशात भाषाशास्त्राचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. रामेश्वर कणसे यांनी प्रारंभी प्रास्ताविक करून कार्यक्रमांती सर्वांचे आभार मानले.

## मसाप कार्यकारी मंडळ, 'परिवर्तन मंच'च्या वादावर निर्वाचन अधिकाऱ्यांकडून पडदा

### मतपत्रिका देण्याची प्रक्रिया सुरू

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी - मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळ निवडणुकीत 'परिवर्तन मंच' ने घेतलेल्या आक्षेपांवर निर्वाचन अधिकाऱ्यांनी लेखी खुलासा करीत वादावर पडदा टाकला आहे. 'मसाप' चा लोगो व नाव वापरण्यास मज्जाव करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच मतपत्रिका न मिळालेल्या मतदारांना लेखी अर्जानंतर मतपत्रिका देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीत संस्थावर्धक पॅनल आणि परिवर्तन मंच यांच्यात लढत आहे. परिवर्तन मंचचे प्रमुख डॉ. सर्जेराव जिगे यांनी निर्वाचन अधिकारी यांच्याकडे काही आक्षेप नोंदवले होते. परिषदेचे नाव आणि लोगो सर्रास वापरला जात असल्याकडे लक्ष वेधले होते. त्यावर निर्वाचन अधिकारी डॉ. राम चव्हाण यांनी लेखी खुलासा केला आहे. परिषदेचे नाव व लोगो विविध संकेतस्थळ आणि समाजमाध्यमात उपलब्ध आहेत. त्यांना वापरण्यास मज्जाव करणे तांत्रिकदृष्टाया शक्य नाही. मसापच्या २०१३ च्या घटनेनुसार ते माझ्या कार्यकक्षेत येत नसल्याचे त्यांनी खुलाशात म्हटले आहे. काही मतदारांना मतपत्रिका मिळाल्या नसल्याचा आक्षेप घेण्यात आला होता. निवासी पत्ता अपुरा असणे किंवा चुकीचा असणे या कारणामुळे मतपत्रिका परत आल्या आहेत. मतदारांनी लेखी अर्ज केल्यास त्यांना मतपत्रिका देण्यात येतील, असे चव्हाण यांनी म्हटले आहे.

निवडणूक कार्यालयातून मतपत्रिका पंजीकृत टपालाने पाठविण्यात आल्या आहेत. ज्या मतदारांना मतपत्रिका मिळाली नाही आणि ती मतपत्रिका निवडणूक कार्यालयात परत आलेली असेल अशा मतदाराला प्रत्यक्ष निवडणूक कार्यालयात येऊन मतपत्रिका मिळाली नसल्याबाबतचे लेखी पत्र आणि स्वत:चे अधिकृत ओळखपत्र देऊन निवडणूक कार्यालयातून मतपत्रिका घेऊन जाता येईल.

मतदानाची मुदत ८ पर्यंत


ज्यांना प्रत्यक्ष निवडणूक कार्यालयात येणे शक्य नाही त्यांनी मतपत्रिका मिळाली नसल्याबाबतच्या पत्रासह सध्याच्या पत्त्याचा पुरावा २८ ऑक्टोबरपर्यंत निवडणूक कार्यालयात पोहचेल अशा बेताने पाठवल्यानंतर मूळ मतपत्रिका परत आलेली असेल तरच मतपत्रिका निवडणूक कार्यालयाकडून पोस्टाने पाठविण्यात येईल. मतपत्रिका मिळाल्यावर मतदाराला ती भरून पोस्टाने, कुरियरने किंवा प्रतिनिधीमार्फत पाठवता येऊ शकेल. निवडणूक कार्यालयात येऊन कार्यालयीन वेळेत मतपेटीत टाकता येईल. मतदानाची मुदत ८ नोव्हेंबरपर्यंत आहे.

## अंजना नदी पात्रावरील बंधाऱ्याचे दरवाजे बंद करून पाणी अडवण्याची गरज

### भविष्यात निर्माण होऊ शकते भीषण पाणीटंचाई -सिंचन विभागाचे दुर्लक्ष

तभा वृत्तसेवा

नाचनवेल: दि.५. नोव्हेंबर- मागील वर्षी कन्नड तालुक्यासह संपूर्ण मराठवाड्याला पाणीटंचाईमुळे भीषण दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागला होता त्यामुळे शेतकऱ्यांचे खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते चाऱ्या पाण्याअभावी जनावरांचे अतोनात हाल झाले होते. गावोगावी टँकरने पाणीपुरवठा सुरू होता. अंजना पळशी प्रकल्पात टँकरच्या रांगा लागल्या होत्या. यासाठी प्रशासनाला कोट्यवधी रुपये खर्च करावे लागले होते. यावर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस पडला असून नदी नाले तलाव तुडुंब भरलेले आहे तर नदीला पाण्याचा प्रवाह सुरू आहे मात्र दिवसेंदिवस नदीचे वाहते पाणी कमी होत चालले असून काही दिवसात पाण्याचा प्रवाह बंद होऊ शकतो. शेतकऱ्यांची सर्वत्र रब्बी हंगामाची पेरण्या सुरू झाले असून



त्यामुळे नदीपात्राचे पाणी पातळी देखील कमी होत आहे. अंजना नदी पात्रात अनेक गावांच्या पाणीपुरवठ्याच्या विहिरी असून पाणी आडवा पाणी जिरवा या हेतूने नदीवर लहान मोठे पुलकमकेटी बंधारे बांधण्यात आले आहे तर काहींची अतिशय दुरवस्था झालेली आहे . मात्र अद्यापही या नदीवरील एकाही बंधाऱ्याचे दरवाजे टाकलेले नाही त्यामुळे भविष्यात पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई होऊ शकते शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी पाण्याची समस्या निर्माण होऊ शकते. शासनाला पुन्हा टँकरने पाणीपुरवठा योजना सुरू करावी लागेल त्यामुळे सिंचन विभागाने प्रशासनाने तत्काळ दरवाजे टाकून पाणी अडवणे गरजेचे आहे मात्र संबंधित विभागाच्या दुर्लक्ष मुळे भविष्यात मोठी समस्येला सामोरे जावे लागेल तर ग्रामपंचायत यांनी देखील पुढाकार घेऊन मागणी किंवा निवेदन देऊन पाठपुरावा करणे हे कर्तव्य ग्रामपंचायतचे आहे. शेतकऱ्यासह ग्रामस्थ मागणी करीत आहे.

## दुबई साहित्य संमेलनात कविसंमेलन अध्यक्ष म्हणून डॉ. अनिता तिळवे

छत्रपती संभाजी नगर/ प्रतिनिधी

मुक्त सृजन संस्था, मुक्त सृजन साहित्य पत्रिका व संस्कृती प्रकाशन ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने दुबई येथे ०४ डिसेंबर ते १० डिसेंबर २०२४ या दरम्यान पहिले विश्व मुक्त सृजन मराठी साहित्य संमेलन आयोजित केले आहे. सदर साहित्य संमेलनातील कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी गोवा येथील सुप्रसिद्ध कवयित्री डॉ. अनिता तिळवे यांची निवड करण्यात आलेली आहे.असे मुक्त सृजन साहित्य पत्रिकेचे संपादक डॉ. महेश खरात यांनी जाहीर केले.

डॉ. अनिता तिळवे यांनी रसायनशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी प्राप्त केली असून, भाषेच्या आवडीमुळे मराठी विषयात एम. ए. ही पदवीही प्राप्त केली आहे. त्यांना अमेरिकेतील पेनसिल्वानिया विद्यापीठातील शिष्यवृत्ती प्राप्त झालेली होती. गोवा येथील पी.ई.एस. महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून त्या कार्यरत आहेत. त्यांचा 'भाव तरंग' हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. या कवितासंग्रहाला महाराष्ट्रातील अनेक



पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांचा दुसरा कवितासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. समाजकार्याच्या योगदानासाठी त्यांना राज्यपाल डॉ. मृदुला सिन्हा यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सावित्रीबाई फुले स्त्री शिक्षण पुरस्कार, उत्कृष्ट समाजसेविका पुरस्कार, आदिशक्ती संत मुक्ताई अध्यात्म पुरस्कार, ग्लोबल चेंज पुरस्कार आणि मानव सद्भाव पुरस्कार आदी पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांची पहिल्या विश्व मुक्त सृजन मराठी साहित्य संमेलनातील कविसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. सदर कविसंमेलनात गोविंद काळे (सोलापूर),बबन धुमाळ (पुणे), सुनंदा शिंगनाथ (पुणे), डॉ. सुभाष भोपळे (वैजापूर), डॉ. संतोष देशमुख (छत्रपती संभाजीनगर), हनुमंत सोनवणे ( छत्रपती संभाजीनगर), डॉ. रामदास कांबळे (लातूर), डॉ. वैशाली आहेर (अहिल्यानगर), चैतन्या आहेर (अहिल्यानगर) डॉ. मृणालिनी आहेर, (सातारा), सृजना मृणालिनी अजित (सातारा), राधिका बनकर (छत्रपती संभाजीनगर), सीताराम नरके (पुणे), गोविंद जाधव (लातूर), दीपलक्ष्मी कुलकर्णी (अमरावती), साबिर सोलापुरी (दुबई) , हरिभाऊ कवडे,(परतूर), प्राची जोशी (पणजी) आदी कवी सहभागी होणार आहेत.

बैठकीला डॉ. संतोष देशमुख, प्राचार्य डॉ. रामकिशन दहिफळे, प्रिया धारूरकर, डॉ. निलेश देगावकर, हनुमंत सोनवणे, डॉ. संभाजी पाटील आणि डॉ. किसन माने आदी उपस्थित होते.

## जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष ललीत गांधी यांनी घेतले भगवान शांतीनाथांचे दर्शन

छत्रपती संभाजीनगर प्रतीनीधी - जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष राज्यमंत्री दर्जा ललीत गांधी हे नुकतेच छत्रपती संभाजीनगर दौ-यावर आले असता त्यांनी राजाबजार येथील श्री.खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजारला सदिच्छा भेट दिली. तसेच भगवान शांतीनाथांचे श्रीफळ अर्पण करून दर्शन घेतले.

सर्व प्रथम पंचायतचे अध्यक्ष महावीर पाटणी यांनी आपल्या प्रास्ताविकात ललीत गांधी यांच्या विषयी माहिती देतांना सांगीतले की, ललीत गांधी हे अत्यंत करमठ धार्मिक, गुरभक्तीत सदैव लिन असणारे व समाजाच्या विकासासाठी सदैव आपले तन मन धन अर्पण करणारे असे निष्काम कर्मयोगी आहे. तसेच त्यांना महाराष्ट्र शासनाने हे पद बहाल करुन एका योग्य व्यक्तीला या स्थानी बसवीले



आहे त्यांच्याकडुन समाजाच्या विकासासाठी अनेक कार्य केले जाणार आहे. तसेच यावेळी ललीत गांधी यांनी महामंडळाची माहिती देतांना सांगीतले की, समस्त जैन समाजासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्यात आली असुन या महामंडळाव्दारे थेट कर्ज योजना, गृह कर्ज, वैयक्तिक कर्ज, कौशल्य विकास प्रशिक्षण, महिला स्वयं सिध्दी व्याज परतावा योजना, बिज भांडवल योजना, शैक्षणिक कर्ज याच बरोबर तिर्थाचे संरक्षण व संवर्धन, जैन साधु संताच्या विहारासाठी सुरक्षा आदी कार्य या मंडळाव्दारे करण्यात येणार असुन या सर्वाचा जैन समाज बांधवानी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी खंडेलवाल दिगंबर जैन पंचायतच्या वतीने अध्यक्ष महावीर पाटणी, सचिव प्रकाश अजमेरा व विश्वस्थ मंडळाच्या वतीने ललीत गांधी यांचा भगवान शांतीनाथाचे स्मृतिचिन्ह,शाल,श्रीफळ व पंचरंगी दुपटटा देऊन यथोचित सत्कार करण्यात आला तसेच त्यांच्याबरोबर उपस्थित असलेले तनसुखभाऊ झांबड यांचाही किरण गंगवाल यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी ललीत गांधी यांचे श्री.क्षेत्र कचनेरच्या वतीने ललीत पाटणी, तिर्थरक्षा कमिटी महाराष्ट्र प्रांत व मांगीतुंगी क्षेत्र,गचपथा क्षेत्र यांच्या वतीने संजय पापडीवाल यांनीही त्यांचे स्वागत केले तसेच के.डी.जे.एम या संस्थेच्या वतीने राजेश पाटणी, शैलेश रावका, एलोरा संस्थानच्या वतीने वर्धमान पांडे पि यु.जैन शिक्षण संस्थेच्या वतीने महावीर सेठी, जटवाडा क्षेत्राच्या वतीने अशोक गंगवाल,पांचालेश्वर मंदिराच्या वतीने महावीर पहाडे, श्री.हिराकाका प्रांगणच्या वतीने ॲड.अनिल कासलीवाल, प्रमोद पाटणी, किरण गंगवाल, बापु कासलीवाल सनी पितळे आदींनी त्यांचे स्वागत केले.

या प्रसंगी विशस्थ अरूण पाटणी, नलनिकांत कासलीवाल, कोमल पाटणी, प्रविण काला, महाणिकचंद गंगवाल, उमेश चुडीवाल, नरेंद्र अजमेरा, माणिकचंद पांडे, दिलीप पांडे यांच्यासह सकल जैन समाजाचे समाज बांधव उपस्थित होते अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

## एमजीएम विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाला मिळाले भारत सरकारचे पेटंट

छत्रपती संभाजीनगर, दि.६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाचे डॉ.सूर्यकांत सपकाळ व डॉ.सुचिता गादेकर यांना 'इनोव्हेटिव्ह कॅटलिस्ट प्रोसेस फॉर असेमेट्रिक सिंथेसिस ऑफ कैरल कंपाऊंड' या विषयावरील संशोधनासाठी भारत सरकारचे पेटंट मिळाले आहे.

या संशोधनामुळे वेगवेगळ्या बायो ऍक्टिव्ह हेटरो सायकलिक कंपाऊंड तयार करण्यासाठी मदत होऊ शकते तसेच एनान्सिओ सिलेक्टिव्हिटी वाढणे, मोलेक्युलची कार्यक्षमता वाढणे, पर्यावरणीय प्रभाव कमी करणे, प्रॉडक्टची किंमत कमी करणे, स्केलेबिलिटी सुनिश्चित करण्यासाठी तसेच पृथक्करण पद्धती सुधारणा घडवून आणण्यासाठी याचे महत्त्व आहे.





डॉ.सूर्यकांत सपकाळ हे एमजीएम विद्यापीठामध्ये विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक म्हणूनही कार्यरत आहेत. हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांचे एडिटरियल बोर्ड मेंबर तसेच मेंबर ऑफ रिव्ह्यूवर् म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे अठ्ठेचाळीस शोध निबंध प्रकाशित झालेले आहेत.

या यशाबद्दल डॉ.सूर्यकांत सपकाळ आणि डॉ.सुचिता गादेकर यांचे विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.प्राप्ती देशमुख, संचालक डॉ.अण्णासाहेब खेमनर व सर्व संबंधितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

**पालघरमधील वसई, नालासोपारा आणि बोईसर या तीन मतदारसंघांमध्ये बहुजन विकास आघाडीचे आमदार आहेत. पालघरमध्ये शिवसेनेचे श्रीनिवास वनगा, विक्रमगडमध्ये शरद पवार गटाचे सुनील भुसारा आणि डहाणू मतदारसंघामध्ये विनोद निकोले हे आमदार आहेत. स्थानिक पक्ष असूनही ‘बविआ’ने या मतदारसंघांवर वरचष्मा ठेवला आहे; मात्र या मतदारसंघामध्ये लोकसभा निवडणुकीत हेमंत सावरा निवडून आल्याने भाजप समोरील आव्हान वाढले आहे; परंतु शिवसेनेच्या शिंदे आणि ठाकरे गटात नाराजी उफाळून आली. त्याचा फटका महाविकास आघाडी आणि महायुतीलाही बसण्याची शक्यता आहे.**

# प्रमुख पक्षांमध्ये नाराजीनाट्य

‘बविआ’साठी ही अस्तित्वाची लढाई आहे, तर युती-आघाडी पालघर जिंकण्यासाठी जोर लावणार आहे. वसई हा जवळपास तीन लाख ५१ हजार मतदार असलेला मतदारसंघ मुख्यतः नायगावपासून वसई ते अर्नाळा असा पश्चिम पट्ट्यात पसरला आहे. या मतदारसंघामध्ये पूर्वीपासून राहणाऱ्या स्थानिक मतदारांची संख्या मोठी आहे. या भागात कोळी, आगरी, वाडवळ, भंडारी, ख्रिस्ती, मुस्लिम आणि गुजराती असे विविध जाती-धर्माचे मतदार असून त्यांची मते निर्णायक आहेत. वसई मतदारसंघ ‘बविआ’चा बालेकिल्ला समजला जातो. या मतदारसंघामधून १९९० पासून पक्षाध्यक्ष तथा विद्यमान आमदार हितेंद्र ठाकूर निवडणूक लढवत आहेत. पक्षाने हा मतदारसंघ सातपैकी सहा वेळा हातात ठेवला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये विजय मिळाल्यानंतर, ‘ही माझी शेवटची निवडणूक असेल’, असे ठाकूर यांनी पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले होते; मात्र २०२४ च्या निवडणुकीआधी पुन्हा निवडणूक लढवणार असल्याचे सांगत ते रिंगणात उतरले आहेत. वसईतून महाविकास आघाडीने दिलेला उमेदवार पाहता त्यांनी बविआला पुढे चाल दिली आहे. शरद पवार आणि बाळासाहेब थोरात यांनी ठाकूर यांच्यांशी चर्चा केली होती. नालासोपारा जिल्ह्यातील सर्वाधिक म्हणजे जवळपास पाच लाख ९८ हजार मतदार असलेला मतदारसंघ आहे. या मतदारसंघाची वैतरणापासून ते बरफ पाडा, विरारमधील समेळपाडा, बोळींज, तुळींज, वलई पाडा, मनवेलपाडा अशी हद्द आहे. या मतदारसंघात सर्वाधिक म्हणजेच ४६ टक्के इतके परप्रांतीय मतदार आहेत. तेथील समस्यांवर ‘बविआ’कडून तोडगा काढण्याचा नेहमी प्रयत्न केला जातो. शिवाय महापालिकेमध्ये सत्ता असल्यामुळे या भागातील प्रत्येक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न पक्षाकडून केला जात असल्याने ‘बविआ’ला मानणारा मोठा वर्ग आहे. पक्षाचे क्षितिज ठाकूर सलग तीन वेळा निवडून आले असून यंदाही ते रिंगणात आहेत. हा मतदारसंघ भाजपने शिवसेनेकडून पुन्हा मिळवला आहे. यामध्ये भाजपने महायुतीतर्फे राजन नाईक यांना उमेदवारी जाहीर केली आहे. मनसेने विनोद मोरे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे ‘बविआ’ हा गड राखणार का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

पालघर जिल्ह्यातील बोईसर विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. या मतदारसंघाचा निम्मा म्हणजेच ५० टक्के भाग वसई-विरार महापालिकेमध्ये, तर निम्मा भाग पालघर जिल्ह्यामध्ये मोडतो. या मतदारसंघामध्ये वसई पूर्वेच्या गोखिवरे, वालीव नालासोपारामधील संतोष भुवन, पेल्हारपासून मांडवीपर्यंतचा भाग, तर पालघरमधील सफाळे, मनोर आणि बोईसर शहरांचा समावेश होतो. यात उत्तर भारतीय मतदारांची संख्या २५ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. बोईसर हा औद्योगिक पट्टा आहे. येथील बहुतांश कामगार वर्ग उत्तर भारतीय आहे. तर मनोर, तारापूर हा मुस्लिमबहुल भाग आहे. या मतदारसंघामध्ये २००९पासून ‘बविआ’चाच आमदार निवडून येत असून यंदाही पक्षातर्फे विद्यमान आमदार राजेश पाटील हे रिंगणात आहेत. २०१९च्या निवडणुकीत राजेश पाटील यांचा निसटता विजय झाला होता. यंदा महायुतीसोबत महाविकास आघाडीचेही आव्हान त्यांच्यापुढे असणार आहे. २०१९मध्ये सेना-भाजप युतीमधील शिवसेनेच्या विलास तरे यांचे आव्हान पाटील यांच्यासमोर होते; मात्र तेव्हा भाजपतर्फे तिकीट न मिळाल्याने संतोष जनाठे यांनी बंडखोरी केली. ही बंडखोरी ‘बविआ’च्या पथ्यावर पडली. आता पुन्हा तरे यांनी शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश करून उमेदवारी मिळवली आहे. शिवसेनेच्या ठाकरे गटातून




डॉ. विश्वास वळवी यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. डॉ. वळवी हे सामाजिक कार्यकर्ते असून विश्वास फाऊंडेशनच्या माध्मयातून त्यांचे काम चालू असते. या मतदारसंघामध्ये तिरंगी लढत बघायला मिळणार आहे. दुसरीकडे ठाकरे गटातर्फे येथे डॉ. वळवी यांचे नाव उमेदवार म्हणून जाहीर झाल्यानंतर पालघर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य कमलाकर दळवी हे नाराज झाले आहेत. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत अविभक्त शिवसेनेचे उमेदवार असलेले कमलाकर दळवी यांनी त्या निवडणुकीत सुमारे ५६ हजार मते मिळवली होती. पराभूत झाल्यानंतरही पक्ष संघटनेत कार्यरत राहून ग्रामीण भागात पक्ष वाढवण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरु ठेवले होते. शिवसेना पक्षफुटी दरम्यान अनेक मातब्बर नेते शिंदे गटात सामील होत असताना,त्यांनी ठाकरे गटात राहून आपले काम सुरू ठेवले होते. लोकसभा निवडणुकीत पालघर लोकसभा मतदार संघाच्या ठाकरे गटाच्या उमेदवार भारती कामडी यासाठी प्रचंड मेहनत घेतली होती. या पार्श्वभूमीवर डॉ. वळवी हे बोईसर विधानसभा मतदार संघातून उमेदवारी मिळवण्यात यशस्वी झाल्यामुळे ठाकरे गटातील अनेक जण नाराज झाले आहेत.

### रण तापले

पालघर हा एकेकाळी समाजवादी पक्षाचा बालेकिल्ला असणारा मतदारसंघ. दोन वेळा काँग्रेस आणि त्यानंतर अविभाजित शिवसेनेकडे आला. त्यामुळे आत्तापर्यंत हा शिवसेनेचा बालेकिल्ला असून, तब्बल पाच वेळा या पक्षाचे अविनाश सुतार, मनीषा निमकर, कृष्णा घोडा, अमित घोडा आणि श्रीनिवास वनगा हे प्रत्येक वेळी भरघोस मतांनी निवडून आले आहेत. या मतदारसंघातून शिवसेनेच्या ठाकरे गटाकडून जिल्हा परिषदेतील गटनेते जयंत दुबळा यांना उमेदवारी मिळाली आहे. या मतदारसंघामध्ये २०१९ ला श्रीनिवास वनगा निवडून आले; मात्र महाविकास आघाडीचे सरकार पडल्यानंतर ते शिवसेनेच्या शिंदे गटासोबत गेले. त्या वेळी शिंदे यांनी त्यांना विधानसभेत तिकीट देण्याची ग्वाही दिली होती; मात्र वनगा यांना उमेदवारी न देता ती भाजपतून राजेंद्र गावित याना आयात करून त्यांना देण्यात आली. त्यांनी शिंदे यांचा विश्वासघातकी असा उल्लेख करताना ठाकरे यांचे कौतुक केले.

विक्रमगड विधानसभा मतदारसंघातील राजकीय गणिते वेगाने बदलत आहेत. विधानसभेत खरी लढत दुहेरी होत असली तरी सध्या येथे सर्वच पक्षांची उमेदवारीसाठी रस्सीखेच सुरू आहे. शरद पवार गटाने विद्यमान आमदार सुनील भुसार यांना पुन्हा तिकीट दिले आहे, तर भाजपने हरिश्चंद्र भोये यांना उमेदवारी दिली आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम येथून इच्छुक होते. भाजपने लोकसभेला त्यांना थांबवून विधानसभेला विचार करू, असे सांगितले होते; परंतु शिवसेनेच्या शिंदे गटाला हा मतदारसंघ सुटला नाही. त्यामुळे निकम यांनी बंडाचे निशाण फडकावले आहे. विक्रमग-मोखडा या दोन तालुक्यांत शिंदे गटाची ताकद जास्त आहे. या मतदारसंघात कुपोषण, बेरोजगारी या मुद्द्यांवर निवडणूक लढवली जात असून, यात जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा तालुक्यातील दोन जिल्हा परिषद गटांचा समावेश आहे. भाजपला मागील निवडणुकीत पराभवाची धूळ चाखावी लागली असली तरी पराभूत उमेदवार हेमंत सवरा सध्या विद्यमान खासदार असून विक्रमगड विधानसभा क्षेत्रातून त्यांना घसघशीत मते मिळाली आहेत. जिजाऊ संघटना आपला उमेदवार उभा करण्याची चाचपणी करीत असून, निकम यांना त्यांची उमेदवारी मिळाली, तर तिरंगी लढतीत पवार यांच्या पक्षाच्या उमेदवाराचा फायदा होण्याची शक्यता आहे.

डहाणू विधानसभा मतदारसंघ हा अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. २००९ साली मतदारसंघ पुनर्रचनेत डहाणू आणि तलासरी तालुक्यांचा समावेश झाला. हा मतदारसंघ मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा बालेकिल्ला मानला जातो. या निवडणुकीत महाविकास आघाडीकडून माकपचे विद्यमान आमदार विनोद निकोले यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. महायुतीकडून हा मतदार संघ भाजपला सुटला आहे. वाढवण बंदर, मुंबई-अहमदाबाद रस्त्याची दुरवस्था अशा अनेक प्रश्नांवर निकोले लढले आहेत. त्यांचा साधेपणा, विधानसभेत सर्वाधिक प्रश्न मांडणारा आमदार म्हणून ओळख या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. लोकसभा निवडणुकीत पालघर मतदारसंघामध्ये भाजपने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले, तरी सहापैकी डहाणू विधानसभा मतदारसंघात भाजपचा उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर राहिला. तेव्हापासून निकोले यांची विधानसभेसाठी उमेदवारी पक्की समजली गेली. माकपच्या राज्य समितीने त्यांच्या नावाची घोषणा केल्यानंतर महाविकास आघाडीने पाठिंबा दिला.




# अजितदादांच्या खेळीमुळे निवडणूक अवघड

**आर. आर. पाटील यांचा मतदारसंघ ही तासगाव-कवठे महांकाळची ओळख. येथे आर. आर. पाटील यांच्या पत्नी सुमनताई आमदार आहेत. या वेळी त्यांचे पुत्र रोहित पाटील यांना येथून उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांच्यासाठी निवडणूक अवघड नव्हती; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माजी खासदार संजयकाका पाटील यांना निवडणुकीत उतरवले आणि अजित घोरपडे-संजयकाकांचे मनोमिलन घडवून आणले. त्यामुळे रोहित यांच्यासमोर तगडे आव्हान उभे राहिले आहे.**

अजित पवार यांनी पुढाकार घेऊन तासगाव - कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघात माजी खासदार संजय पाटील आणि माजी आमदार अजित घोरपडे यांच्यात समेट घडवून आणला आहे. पवारांच्या या खेळीमुळे दिवंगत आर. आर. पाटील यांचे पुत्र रोहित पाटील यांच्या समोर तगडे आव्हान निर्माण झाले आहे. लोकसभा निवडणुकीत संजयकाका यांचा पराभव झाला. त्यात त्यांचा स्वभाव तापट. कवठेमहांकाळमध्ये नुकत्याच झालेल्या एका मारामारी प्रकरणात ही ते अडकले. त्याविरोधात आमदार सुमनताई आणि रोहित यांनी रस्त्यावर उतरून संघर्ष केला. रोहित सध्याच्या युवा पिढीचे


रोहित पाटील
संजयकाका पाटील

प्रतिनिधित्व करतात. त्यांचे वक्तृत्वही चांगले आहे. रोहित पाटील गेल्या तीन - चार वर्षांपासून विधानसभेची तयारी करत आहेत. त्यांचा जनसंपर्क चांगला आहे. प्रबळ विरोधक नसल्यामुळे यंदाची विधानसभा निवडणूक रोहित पाटीलांसाठी काहीशी सोपी जाईल, असे वाटत होते; पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पडलेल्या फुटीमुळे रोहित पाटील त्यांची कोंडी झाली आहे. महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून रोहित पाटील यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. दुसरीकडे महायुतीच्या जागा वाटपात ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या वाट्याला गेली आहे. अजित पवारांनी ही जागा निवडून आणण्याचा चंग बांधला असून संजयकाका यांनाच उमेदवारी दिली आहे. रोहित पाटील यांचे पारडे काहीसे जड दिसत होते. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत तासगाव-कवठेमहांकाळ मतदारसंघामध्ये भाजपचे उमेदवार असलेले संजय पाटील पिछाडीवर होते. त्यामुळेच अजित पवार यांनी पुढाकार घेऊन माजी आमदार अजित घोरपडे आणि संजय पाटील यांच्यातील वाद मिटवून समेट घडवून आणला आहे. घोरपडे- पाटील यांच्यात झालेल्या समेटामुळे रोहित पाटील यांच्यासमोर तगडे आव्हान निर्माण झाले आहे. प्रारंभी रोहित पाटील यांच्यासाठी सोपी वाटणारी निवडणूक आता चुरशीची होणार आहे. १९९० पासून तासगाव - कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघावर दिवंगत आर. आर. पाटील कुटुंबीयांचे वर्चस्व आहे. आर. आर. पाटील यांनी तासगाव विधानसभा मतदारसंघातून १९९०, १९९५, १९९९ आणि २००४ ची निवडणूक जिंकली मतदारसंघातून २००९ आणि २०१४ ची निवडणूकही पाटील यांनी जिंकली होती. त्यांच्या निधनानंतर झालेली पोटनिवडणूक आणि २०१९ ची विधानसभा निवडणूक पाटील यांच्या पत्नी सुमन पाटील यांनी मोठ्या मताधिक्याने जिंकली होती. त्यामुळे या मतदारसंघात रोहित पाटील यांचा पराभव करून विजय खेचून आणणे संजयकाका पाटील यांच्यासाठी फारसे सोपे असणार नाही. आर. आर. पाटील - संजय पाटील यांच्यातील चुरशीच्या लढती राज्याने पाहिल्या आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपचे उमेदवार असलेले संजय पाटील यांच्या विरोधात अजित घोरपडे यांनी खासदार विशाल पाटील यांचा प्रचार केला होता. जाहीर सभांमधून जोरदार आरोप-प्रत्यारोप झाले होते. संजय पाटील ही जिल्ह्याला लागलेली कीड आहे, अशी जहरी टीका करणारे अजित घोरपडे आता विधानसभा निवडणुकीत त्यांचाच प्रचार करणार आहेत. वरिष्ठ पातळीवरील तडजोडीतून समेट झाला खरा; पण नेत्यांमध्ये झालेले मनोमिलन कार्यकर्त्यांच्या पचनी पडेल का, कार्यकर्ते एकजुटीने काम करणार का, हे लवकरच दिसून येणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्याचा निर्णय संजयकाका पाटील यांनी जाहीर केला. याचवेळी माजी राज्यमंत्री अजित घोरपडे यांनीही संजय पाटील यांना साथ देण्याची भूमिका जाहीर केली.

### लक्षवेधी लढत

जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात हा निर्णय धक्कादायक आणि अनपेक्षित मानला जात आहे. तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघ महायुतीत कोणत्या पक्षाला जाणार आणि उमेदवार कोण असणार, याबाबत सातत्याने चर्चा होत होती. या चर्चेवर पडदा पडला. हा मतदारसंघ अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला जाणार असल्याचे शिक्कामोर्तब झाल्यानंतर राष्ट्रवादी पक्षातून भाजपचे माजी खासदार संजयकाका पाटील यांना विधानसभेच्या आखाड्यात उतरविण्याचा निर्णय झाला. तासगाव तालुक्यात तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील आणि संजयकाका पाटील यांचे २००८ साली मनोमिलन झाले होते. त्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसकडून संजयकाका सहा वर्षे विधान परिषद सदस्य होते. २०१४ ला त्यांनी राष्ट्रवादीपासून फारकत घेत भाजपमध्ये प्रवेश केला. तब्बल दहा वर्षांनंतर पुन्हा त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केल्यामळे संजयकाकांचे एक राजकीय

**शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे चिरंजीव आदित्य ठाकरे यांच्याविरोधात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खासदार मिलिंद देवरा यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. उद्धव यांच्यापेक्षाही आदित्य यांनी शिवसेनेतील बंडानंतर शिंदे यांच्यावर अधिक कडवी टीका केली होती. आदित्य यांच्या पराभवासाठी शिंदे यांनी आता मिलिंद यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले असले, तरी त्यांचा हा डाव मुंबईकर किती यशस्वी होऊ देतात, हा प्रश्नच आहे.**

# वरळीच्या ‘हॉट सीट’वर काय होणार?

आदित्य ठाकरे वरळी मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. गेल्या वेळीही ते याच जागेवरून निवडून आले होते; मात्र या वेळी त्यांचा मार्ग गेल्या वेळेइतका सोपा दिसत नाही. त्यांच्या विरोधात शिंदे यांच्या शिवसेनेने मिलिंद देवरा यांना उमेदवारी दिली आहे. वरळी मतदारसंघ ही ‘हाय प्रोफाईल’ जागा आहे. २०१९ मध्ये आदित्य या जागेवरून विजयी झाले होते. त्या वेळी शिवसेना एक होती आणि शिवसेनेची भाजपशी युती होती. त्यांना ८९,२४८ मते मिळाली, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार सुरेश माने २१,८२१ मतांनी दुसऱ्या क्रमांकावर राहिले. आदित्य जवळपास ६७ हजार मतांनी विजयी झाले होते. त्यानंतर राजकारणाच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. शिवसेनेत दोन गट पडले आहेत. वरळी विधानसभेची जागा मुंबई दक्षिण लोकसभेत येते. हा परिसर देवरा घराण्याचा गड मानला जातो. आदित्य यांना कोंडीत पकडण्यासाठी शिंदे यांनी देवरा यांच्यासारख्या तगड्या चेहऱ्याला रिंगणात उतरवले आहे. राष्ट्रीय राजकारणात मिलिंद यांचे उत्तम वजन आहे. शिवसेनेत येण्यापूर्वी ते काँग्रेसमध्ये होते. १४व्या आणि १५व्या लोकसभेतही त्यांनी मुंबई दक्षिण लोकसभेचे प्रतिनिधित्व केले आहे. आदित्य यांच्याविरोधात मिलिंद यांना उभे करून शिंदे यांनी मोठा राजकीय जुगार खेळला आहे; मात्र मिलिंद आदित्य यांना पराभूत करू शकणार का, मिलिंद निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यास आदित्यला वॉकओव्हर मिळेल का, असे प्रश्नही राजकीय वर्तुळात उपस्थित केले जात आहेत.


आदित्य ठाकरे


मिलिंद देवरा

मिलिंद देवरा हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मुरली देवरा यांचे चिरंजीव. गांधी घराण्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी यांच्यांशी संबंध असताना देवरा यांना दक्षिण मुंबईची जागा न सोडल्याने त्यांनी पक्षांतर केले. मिलिंद यांनी २००४ मध्ये राजकारणात प्रवेश केला. काँग्रेसने त्यांना मुंबई दक्षिण मतदारसंघातून उमेदवारी दिली. २००४ आणि २००९ मध्ये या मतदारसंघामध्ये विजयी होऊन मिलिंद देवरा संसदेमध्ये पोहोचले. २०११ मध्ये मिलिंद यांना डॉ. मनमोहन सिंग सरकारमध्ये राज्यमंत्री करण्यात आले. मिलिंद हे मुंबई काँग्रेसचे अध्यक्षही राहिले आहेत.

मात्र २०२४ च्या निवडणुकीपूर्वी मिलिंद यांनी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेनेने त्यांना राज्यसभेवर पाठवले. देवरा यांनी २००९, २०१४ आणि २०१९ मध्ये दक्षिण मुंबईतून लोकसभा निवडणूक लढवली होती. २००९ सोडल्यास, मिलिंद देवरा २०१४ आणि २०१९ मध्ये दक्षिण मुंबईतून पराभूत झाले. मिलिंद यांना २००९ मध्ये वरळीतून ३९ हजार, २०१४ मध्ये ३५ हजार आणि २०१९ मध्ये ४१ हजार मते मिळाली होती. २००९ वगळता दोन्ही निवडणुकांमध्ये शिवसेनेच्या उमेदवाराला मिलिंद याच्यापेक्षा जवळपास दुप्पट मते मिळाली. लोकसभेच्या निवडणुकीत वरळीच्या जागेवर उद्धव यांच्या उमेदवाराला सात हजारांची आघाडी

### वलयांकित

यांचे उमेदवार होते. शिंदे यांच्या शिवसेनेने दक्षिण मुंबईतून यामिनी जाधव यांना उमेदवारी दिली होती.

२०१९ च्या आकडेवारीनुसार वरळीमध्ये सुमारे दोन लाख ७१ हजार मतदार आहेत. एके काळी येथे मनसेची स्थिती भक्कम होती; पण २०१९ मध्ये आदित्य रिंगणात आल्याने मनसेने येथे उमेदवार दिला नाही. जातीय समीकरणाबद्दल बोलायचे झाले तर वरळीमध्ये अकरा टक्के दलित आणि नऊ टक्के मुस्लिम आहेत. याशिवाय २.७ टक्के पाटील, दोन टक्के जाधव आणि दोन टक्के कांबळे असे मतदार या भागात आहेत. वरळीतील सर्व मतदार शहरी समाजातील आहेत. १९९० पासून शिवसेनेने फक्त एकदाच ही जागा गमावली आहे. २००९ मध्ये राष्ट्रवादीचे सचिन अहिर यांनी शिवसेनेच्या आशिष यांचा पराभव केला होता. मिलिंद यांचा ट्रॅक रेकॉर्ड खराब आहे. मिलिंद २०१४ पासून एकही निवडणूक जिंकू शकलेले नाहीत; मात्र त्यांच्यासाठी दिलासा देणारी एक बाब आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये या जागेवर शिंदे यांचे उमेदवार अवघ्या सहा हजार मतांनी मागे पडले. दुसरे म्हणजे उद्धव ठाकरे यांनी माहीमच्या जागेवर राज ठाकरे यांचे चिरंजीव अमित यांच्याविरोधात उमेदवार उभा केला आहे. राज आदित्य यांच्याविरोधात प्रचार करू शकतात. या साठमारीमध्ये नक्की कोणाची सरशी होते हे

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पुसेगाव, फाळेगाव सर्कलमध्ये भाजपचे तान्हाजीराव मुटकुळे यांच्या प्रचार सभांना जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## साटंबा येथील उबाठा शिवसेना, काँग्रेस कार्यकर्त्यांचा प्रवेश, बजरंग दलाचे कार्यकर्त्यांचा पाठींबा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ नोव्हेंबर**

हिंगोली विधानसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांचा झंझावती प्रचार सुरू झाला असून सेनगाव तालुक्यातील पुसेगाव आणि हिंगोली तालुक्यातील फाळेगाव येथे प्रचार सभा घेण्यात आल्या. तसेच साटंबा येथील उबाठा शिवसेना आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी तान्हाजी मुटकुळे यांच्या नेतृत्वात जाहीर प्रवेश केला आहे.





हिंगोली विधानसभा मतदारसंघात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून भाजपचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांनी सेनगाव तालुक्यातील पुसेगाव सर्कलमध्ये घरोघरी भेट दिली. नागरिकांनीही चांगला प्रतिसाद दिला. यावेळी पुसेगाव येथे जाहीर सभा घेण्यात आली. या सभेला तान्हाजीराव मुटकुळे, सुरजितसिंह ठाकूर, तालुकाध्यक्ष हिंमत राठोड, युवा जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण, ॲड के के शिंदे, नारायण खेडकर यांच्यासह गावातील प्रतिष्ठीत नागरिक उपस्थित होते. यावेळी बोलतांना तान्हाजी मुटकुळे म्हणाले की, भाजप महायुतीचे सरकार हे सर्वसामान्यांचे, शेतकऱ्यांचे सरकार आहे. केंद्र व राज्य सरकारने अनेक कल्याणकारी योजना राबवल्या असून या योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांना मिळत आहे. त्यामुळे सर्वच ठिकाणी महायुतीला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. जनतेने मला दोन वेळा बहुमताने निवडून दिले आहे. यावेळीही आपण मला प्रचंड मतांनी निवडून दिल्यास मी या भागाचा विकास केल्याशिवाय राहणार नाही. राहीलेली पांदन रस्ते, सिंचन तसेच इतर विकास कामे करण्यासाठी मी कटीबध्द आहे.



यावेळी गावकऱ्यांच्यावतीने तान्हाजीराव मुटकुळे यांचा सत्कार करण्यात आला.

हिंगोली तालुक्यातील फाळेगाव येथे युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांनी घरोघरी भेटी देत भाजप महायुतीचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांना मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी फाळेगाव येथे प्रचार सभेत बोलतांना शिवाजीराव मुटकुळे म्हणाले की, तान्हाजीराव मुटकुळे यांनी मागील दहा वर्षात मतदार संघात रचलेला विकासाचा डोंगर जनतेने पाहीला आहे. विकासाचा हा प्रवास निरंतरपणे सुरू ठेवण्यासाठी पुन्हा एकदा महायुती सरकार आणण्यासाठी फाळेगाव सर्कलमधील जनता तान्हाजीराव मुटकुळे यांना आशिर्वाद देईल असा विश्वास व्यक्त केला. यावेळी ॲड अमोल जाधव यांच्यासह गावातील प्रतिष्ठीत मंडळी, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. साटंबा येथील उबाठा शिवसेना आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी तान्हाजीराव मुटकुळे यांच्या विकास कामांवर प्रभावीत होऊन भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी माजी सभापती उत्तमराव जगताप, पद्माकर नायक, जेजेराम घ्यार आदींची प्रमुख उपस्थिती होती. त्यानंतर बजरंग दल हिंगोलीच्या पदाधिकारी आणि कार्यकत्यांनी तान्हाजीराव मुटकुळे यांची भेट घेत त्यांना निवडून आणण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी आ. रामराव वडकुते, शहराध्यक्ष कैलाशचंद काबरा, राजेंद्र हलवाई, कैलास श्रीनाथ आदींची प्रमुख उपस्थिती होती.

हिंगोली विधानसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या प्रचारासाठी भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यां घरोघरी भेटी देत मुटकुळेंनी मागील दहा वर्षात मतदार संघात केलेल्या विकास कामांची माहीती देत आहेत. जनतेचाही मुटकुळे यांना चांगला प्रतिसाद मिळत असतांना दिसत आहे.

# पूर्णा सहकारी कारखान्याचा अग्निप्रदीपन समारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ६ नोव्हेंबर**



पुर्णा सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम ४४ वा बॉयलर अग्निप्रदीपन व गव्हाण पुजन समारंभ दि.०६ नोव्हेंबर २०२४ रोजी अनुक्रमे स. ०९.३५ वा. व स. १०.५५ वा. कारखान्याचे उपाध्यक्ष डॉ. सुनिलराव कदम यांचे अध्यक्षतेखाली तसेच अध्यक्ष जयप्रकाश दांडेगांवकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि संचालक सुरेशराव गणेशराव आहेर व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सारदाताई आहेर, संचालक शंकरराव तुकारामइंगोले व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. ललीताताई इंगोले आणि सभासद तुकाराम उत्तमराव चव्हाण व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. मनिषाताई चव्हाण, संचालिका या उभयंतांचे शुभहस्ते संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक कारखान्याचे कार्यकारी संचालक सुनिल दळवी यांनी केले. प्रास्ताविकात गळीत हंगाम २०२४-२५ साठीचे सर्व तयारीबाबत माहीती दिली. कारखान्याचे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगांवकर यांनी मार्गदर्शन करतांना कारखान्याचे सन्मा. सभासदांनी यावर्षी ६.०० लाख मे.टन गाळपाचे उद्दीष्ट पुर्ण करण्यासाठी आपला ऊस आपल्याच पुर्णा कारखान्याला द्यावा असे आवाहन यावेळी अध्यक्ष महोदयांनी केले. तसेच ऊसतोड करण्यासाठी कामगारांची कमतरता भासत असल्याने या हंगामात ऊसतोडणी यंत्राव्दारे जास्तीत-जास्त ऊसाची तोडणी करण्यात येणार असल्याचे अध्यक्ष महोदयांनी नमुद केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व कारखान्याचे उपाध्यक्ष मा. डॉ. सुनिलराव कदम यांनी कारखान्याच्या आर्थिक परिस्थितीचा तसेच कारखान्याच्या प्रगतीचा आलेख सभासदांसमोर मांडला. तसेच सर्वच मान्यवरांनी आपल्या भाषणात सर्व सभासदांना आपला ऊस आपल्याच पुर्णा कारखान्याला द्यावा अशी विनंती केली. सदर कार्यक्रमास कारखान्याचे सर्व संचालक, परिसरातील सभासद, शेतकरी बंधु, तोड/वाहतुक ठेकेदार, कारखान्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन कारखान्याचे शेती व ऊसविकास उपसमिती अध्यक्ष शहाजीराव देसाई यांनी केले.

# हिंगोलीत उबाठा शिवसेनेची संवाद बैठकीत दानवेंचे मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ नोव्हेंबर**

शहरातीलशिवाजी सभागृहात दि ६ नोव्हेंबर रोजी उबाठा शिवसेनेचे नेते आंबादास दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पदाधिकाऱ्यांची संवाद बैठक पार पडली. यावेळी दानवे यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करीत महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आणण्याचे आवाहन केले.

य९४-हिंगोली विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अधिकृत उमेदवार रूपाली पाटील गोरेगावकर यांच्या प्रचाराच्या निमित्ताने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना पक्षाचे नांदेड हिंगोली जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात, शिवसेना पक्षाचे हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली प्रमुख पदाधिकारी संवाद बैठक पार पडली.

या संवाद बैठकीमध्ये विनायकराव भिसे पाटील यांनी हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचा सत्कार केला व जमलेल्या प्रमुख पदाधिकाऱ्यांना सहसंपर्क प्रमुख विनायकराव भिसे पाटील यांनी मार्गदर्शन करतांना कोणत्याही परिस्थितीत महाविकास आघाडीच्या उमेदवार रूपाली पाटील गोरेगावकर यांना विजयी करण्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे. यावेळी राज्यात निश्चित महाविकास आघाडीचेच सरकार येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

यावेळी राजेश पाटील गोरेगावकर, जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, उपजिल्हा प्रमुख परमेश्वर मांडगे, माजी जि प उपाध्यक्ष उद्धवराव गायकवाड यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, संपर्क प्रमुख बबनराव थोरात यांनी पदाधिकाऱ्यांना प्रचाराबाबत तसेच हिंगोली विधानसभेचा उमेदवार विजयी करण्यासाठी मार्गदर्शन केले.

यावेळी विरोधी पक्षनेते दानवे यांनी पत्रकारांशी संवाद साधतांना सांगितले की, मराठवाड्यात निश्चितपणे महाविकास आघाडीच्या जास्तीत जास्त उमेदवार विजयी होणार आहेत. यासाठी पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या ८ ते ९ जाहीर सभा, संजय राऊत, नितीन मानगुडे पाटील आदी नेते प्रचारासाठी मराठवाड्यात आहेत. शिवसेनेचे तीन खासदार मराठवाड्यात आहेत. बंडखोरांवर बोलतांना त्यांनी एकदम कोणावर कार्यवाही करता येत नाही कारण वर्षानुवर्षे त्यानी काम केलेले असते. त्यांना समजावून सांगण्याचा महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून प्रयत्न सुरूच आहे. अधिकृत उमेदवारांना ते निश्चितच पाठींबा देतील. आता मशाल पेटली असून विजय मिळवून ती थेट विधान भवनावर जाणार आहे यामध्ये मुळीच शंका नाही. यावेळी त्यांनी महायुती सरकार भ्रष्ट असून जनतेसमोर त्यांचा असली चेहरा आला आहे. महायुती सरकारवर सडकून टीका केली.

## संक्षिप्त वृत्त

### निवडणूक निकालाच्या अंदाजावर बंदी

हिंगोली- भारत निवडणूक आयोगाने दि. १३ नोव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी ७ वाजता पासून ते दि. २० नोव्हेंबर, २०२४ च्या सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने निवडणूक निकालाचे अंदाज प्रसार माध्यमावर प्रसारित करण्यास प्रतिबंध घातल्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. मुद्रित माध्यम, इलेक्ट्रॉनिक माध्यम, दूरदर्शन, आकाशवाणी इत्यादी प्रसार माध्यमांनी यांची नोंद घ्यावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी दिले आहेत.

### सावंगी मूर्तीजापूर येथे अवैध दारूविक्री बंद करा



हिंगोली- औंढा नागनाथ येथील सावंगी मूर्तीजापुर गावात देशी विदेशी, गावठी दारू मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्यामुळे गावात भांडण तंट्यात वाढ झाली आहे. त्यामुळे तरुण व्यसनाधीन होत चालले आहेत. सरपंच यांच्या नेतृत्वाखाली गावकऱ्यांनी औंढा नागनाथ पोलीस ठाणे गाठून पोलीस निरीक्षक जी एस राहीरे यांना निवेदन देऊन सर्व गावातील अवैध देशी दारू विक्री बंद करण्याची मागणी केली यावेळी सरपंच विशाल मस्के, रेखाबाई टाके, विमल मोरे, कल्पना मोरे जयश्री मोरे, मजुरान मोरे, कुसुम घोरपडे, कंचना मोरे, वनिता देवरे, निलाबाई कोकाटे, मिराबाई देवरे, प्रेरणा मोरे, भाग्यश्री घोरपडे, शोभाबाई वाघमारे, शोभाबाई मोहिते, छाया पुंडगे, शांताबाई मोरे आदींच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

### श्रीगुरू चरित्र कथामृत पारायणास प्रारंभ

हिंगोली- गुरूत्व प्रदीप हिंगोली आयोजित १००८ श्री गुरूचरित्र सारामृत पारायण, श्री गुरूचरित्र कथामृत व श्रीदत्त पंचायतन याग ६ नोव्हेंबर पासून प्रारंभ झाला आहे. या पाराण्यास ८९० भाविक बसले आहेत. महावीर भवनमध्ये ६ ते १३ नोव्हेंबर या दरम्यानच्या कालावधीत गुरूत्व प्रदीप हिंगोली आयोजित १००८ श्री गुरूचरित्र सारामृत पारायण, श्री गुरूचरित्र कथामृत व श्रीदत्त पंचायतन याग ६ नोव्हेंबर पासून प्रारंभ झाला आहे. या निमित्त ७ नोव्हेंबरला श्री दत्तात्रय, श्रीपाद श्रीवल्लभ, श्रीनृसिंग सरस्वती स्वामी महाराज सेवा, ८ नोव्हेंबरला दुपारी २ वाजता गणेश याग, ९ नोव्हेंबरला शनिवारी सकाळी ११.३० वाजता श्रीदत्त मुर्तीस पुष्पार्चण महापूजा, दुपारी २ वाजता श्रीविष्णू याग, १० नोव्हेंबरला रविवारी सकाळी १० वाजता पुष्पांची होळी, दुपारी २ वाजता श्रीदत्त याग, ११ नोव्हेंबर सोमवार रोजी दुपारी २ वाजता श्री रूद्र याग, १२ नोव्हेंबरला मंगळवारी सकाळी ९.३० वाजता श्री यंत्रास कुंकूमार्चन सेवा, दुपारी २ वाजता शतचण्डी याग, १३ नोव्हेंबरला बुधवारी श्रीची पालखी सेवा असे धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत.

# लाचखोर तलाठ्यास तडकाफडकी निलंबीत करण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ नोव्हेंबर**

शहरालगत बळसोंड येथे प्लॉटच्या फेरफार करण्यासाठी ५० हजारांची लाच घेणारा बळसोंड सज्जाचा लाचखोर तलाठी विजय सोमटकर यास तडकाफडकी निलंबीत करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दि ५ नोव्हेंबर रोजी आदेश काढले आहेत.

शहरालगत बळसोंड येथील तलाठी विजय सोमटकर याने एका तक्रारदाराकडून प्लॉटच्या फेरफारसाठी पन्नास हजार रूपयांची लाच मागितली होती. विशेष म्हणजे तक्रारदाराने उपविभागीय अधिकारी कार्यालयात तक्रार केल्यानंतर उपविभागीय अधिकारी कार्यालयाने सुनावणी घेवून प्लॉटचे फेरफार करण्याचे आदेश दि १ आक्टोबर रोजी दिले होते. मात्र वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत तलाठी सोमटकर याने पन्नास हजाराची लाच मागितली होती.

यानंतर संबंधित तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दाखल केली होती. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक विकास घनवट, पोनि विनायक जाधव, प्रफुल्ल अंकुशकर यांच्या पथकाने दि २९ आक्टोबर रोजी तलाठी सोमटकर यांच्यासह खाजगी व्यक्ती जयंत देशमुख यांना ५० हजाराची लाच घेतांना रंगेहाथ पकडले. याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेची माहीती लाचलूचपत विभागाचे उपअधीक्षक घनवट यांनी जिल्हाधिकारी कार्यालय व तहसील कार्यालयाला कळवली होती. त्यानंतर घटनेचा सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी लाचखोर तलाठी विजय सोमटकर यास तडकाफडकी निलंबीत करण्याचे आदेश काढले आहेत.


# निवडणुकीसाठी ईव्हीएम मशीनची पुरवणी सरमिसळ प्रक्रिया पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ नोव्हेंबर**

जिल्ह्यात निवडणूक नामनिर्देशन मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी वसमत वगळता इतर दोन मतदार संघात प्रत्येकी दोन बॅलेट युनिट लागणार असल्यामुळे आज निवडणूक निरीक्षक सामान्य श्रीमती वंदना राव यांच्या उपस्थितीत पुरवणी सरमिसळ प्रक्रिया राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीसमोर पूर्ण करण्यात आली. या तिन्ही मतदार संघात यातून कोणते ईव्हीएम मशीन कोणत्या मतदारसंघात जाणार, हे निश्चित करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राष्ट्रीय सूचना केंद्रात ईव्हीएम सरमिसळ प्रक्रिया संगणक प्रणालीद्वारे पूर्ण करण्यात आली. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, उपजिल्हाधिकारी मंजुषा मुथा, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी बारी सिद्दीकी तसेच विविध राजकीय पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्ह्यातील ९२-वसमत विधानसभा मतदार संघासाठी ११, ९३-कळमनुरी मतदार संघासाठी १९ व ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघासाठी २३ उमेदवार निवडणूक रिंगणात निश्चित झाले आहेत. कळमनुरी व हिंगोली विधानसभा मतदारसंघात १६ पेक्षा जास्त उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने प्रत्येक मतदार केंद्रावर २ बॅलेट युनिट लागणार आहेत. तसेच वसमत विधानसभा मतदारसंघात एक बॅलेट युनिट लागणार आहे. कळमनुरी विधानसभा मतदार संघात ७ अशा एकूण ८ सहाय्यकारी मतदान केंद्रासाठी अतिरिक्त बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व व्हीव्हीपॅट हे मतदान यंत्र वितरीत करण्यासाठी निवडणूक निरीक्षक सामान्य श्रीमती वंदना राव यांच्या उपस्थितीत पुरवणी सरमिसळ प्रक्रिया आज राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीसमोर पूर्ण करण्यात आली. या तिन्ही मतदार संघात यातून कोणते ईव्हीएम मशीन कोणत्या मतदारसंघात जाणार, हे निश्चित करण्यात आले आहे.



यापूर्वी विधानसभा निवडणुकीकरिता जिल्ह्यातील ९२-वसमत, ९३-कळमनुरी आणि ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघाना वितरीत करावयाच्या बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व व्हीव्हीपॅट या मतदान यंत्रांची प्रथम सरमिसळीकरणाची (फर्स्ट रॅण्डमायझेशन) प्रक्रिया जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीसमोर पूर्ण करण्यात आली होती. भारत निवडणूक आयोगातर्फे विकसित संगणक प्रणालीमध्ये सर्व प्रकारच्या ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट्सची नोंद घेऊन मतदारसंघनिहाय वितरित करण्यात येते. जिल्ह्यात प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय मतदान केंद्राच्या संख्येपेक्षा बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅट यंत्रे हे २० व ३० टक्के अधिक प्रमाणात संबंधित मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना वितरित करण्यात येत आहेत. जिल्ह्यातील ९२-वसमत विधानसभा मतदारसंघासाठी ९६ बॅलेट युनिट, ०३ कंट्रोल युनिट व ०४ व्हीव्हीपॅट यंत्र अतिरिक्त उपलब्ध करण्यात आले आहेत. ९३-कळमनुरी विधानसभा मतदारसंघासाठी ४७० बॅलेट युनिट, १४ कंट्रोल युनिट व १४ व्हीव्हीपॅट यंत्र अतिरिक्त उपलब्ध करण्यात आले आहेत. ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघासाठी ४७० बॅलेट युनिट, ४ कंट्रोल युनिट व ४ व्हीव्हीपॅट यंत्र अतिरिक्त उपलब्ध करण्यात आले आहेत.

निवडणूक मतदान यंत्र वितरीत करताना २० टक्के कंट्रोल युनिट व ३० टक्के व्हीव्हीपॅट मशीन अतिरिक्त देण्यात आल्या आहेत. यानंतर संबंधीत विधानसभा मतदार क्षेत्रात कोणत्या मतदान केंद्रावर कोणते मतदान यंत्र जाईल, हे निश्चित करण्यासाठी पुन्हा एकदा मतदान यंत्रांच्या सरमिसळीची प्रक्रिया संबंधित विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर पार पाडेल, अशी माहिती यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना दिली.

## इति-उवाच...


विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्रात काय होईल, हे सांगता येत नाही. महाराष्ट्रात सध्या वेगळेच काहीतरी सुरू आहे. नवाब मलिक यांनी भविष्य सांगू नये, त्यांचा व्यवसाय पोपटाचा नाही.

**आशिष शेलार**, भाजपा नेते


सरवणकर समोर असते-नसते, तरी मी निवडणूक माझ्या पद्धतीनेच लढवली असती. मी प्रामाणिकपणे निवडणुकीच्या रिंगणात उतरलो आहे. मला मतदान करायचे की नाही हे लोकांच्या हातात आहे, तर जिंकणार की नाही, हे देवाच्या हातात आहे.

**अमित ठाकरे**, मनसे नेता


राज ठाकरे आता देवेंद्र फडणवीस, अमित शाह आणि नरेंद्र मोदी यांना आपले नेते मानतात. त्यांनीच ही बाळासाहेब ठाकरेंची प्रॉपर्टी बेकायदेशीरपणे एकनाथ शिंदे यांना दिली आहे. राज ठाकरे यांना बाळासाहेब ठाकरे कधीही माफ करणार नाहीत.

**संजय राऊत**, उबाठा खासदार


लोकसभेत भुजबळ सांगत होते, माझी उमेदवारी केंद्रातून जाहीर झाली आणि आता ते रणांगण सोडून पळून गेले. शिवसैनिक पळून गेले नाही. लोकसभेत आपल्यासोबत राहिले आणि हातावर लिहिले ३ 'वाजे' ला मतदान करा आणि माझ्या पाठीत खंजीर खुपसला.

**हेमंत गोडसे**, शिवसेना नेता

# सयाजी शिंदेंनंतर आता भाऊ कदम करणार घड्याळाचा प्रचार

◆ **मुंबई, ६ नोव्हेंबर**

ज्येष्ठ अभिनेते संयाजी शिंदे यांच्यानंतर आता प्रसिद्ध विनोदी अभिनेता भाऊ कदम राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रचार करताना दिसणार आहे.

संयाजी शिंदे यांनी काही दिवसांपूर्वीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यानंतर त्यांच्यावर पक्षाचे स्टार प्रचारक म्हणून जबाबदारी देण्यात आली. अशातच 'चला हवा येऊ द्या' या विनोदी मालिकेतून घराघरात पोहोचलेला विनोदी अभिनेता भाऊ कदम देखील राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रचार करणार आहे. लोकांना खळखळवून हसवण्यात भाऊ कदम तरबेज आहेत. त्यामुळे त्याला प्रचार रॅलीत सहभागी करून लोकांपर्यंत पोहोचण्याचा अजित पवारांचा प्रयत्न आहे. याशिवाय, अर्थसंकल्पात अजित पवार यांनी लाडकी बहीण योजना आणली. ही योजना महिलांपर्यंत पोहोचली आहे. मात्र, आता विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर लाडकी बहीण योजनेसह विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यभरात भाऊ कदम यांच्या प्रचार रॅलीचे आयोजन केले जाणार आहे.

◀ *(तभा वृत्तसेवा)*



### गोविंदाही शिवसेनेचा स्टार प्रचारक

» निवडणुकीची घोषणा होण्याआधीच प्रख्यात अभिनेता तसेच माजी खासदार गोविंदाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर शिवसेनेच्या स्टार प्रचारकाच्या यादीत गोविंदाच्या नावाचा समावेश करण्यात आला आहे. आता गोविंदा शिवसेना उमेदवारांचा प्रचार करणार आहे. त्यामुळे मनोरंजन विश्वासतील तारे-तारका निवडणुकीच्या प्रचारात ग्लॅमरचा तडका देताना दिसणार आहेत. ■



# 'करून करून भागले, देवपूजेला लागले'

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, ६ नोव्हेंबर**



### शरद पवारांच्या संन्यासाची कथा

महाराष्ट्राच्या राजकारणातील दिग्गज नेते राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राजकारण संन्यासाचे संकेत दिले आहे. पवार खरोखरच राजकीय संन्यास घेणार की नेहमीप्रमाणे त्यांची ही घोषणा मतदारांना कात्रजचा घाट दाखवणार, हे लवकरच समजणार आहे.

आतापर्यंत १४ वेळा निवडणुका लढवल्या आणि जिंकल्या, आणखी किती निवडणुका लढवायच्या, कधी तरी तर थांबावेच लागेल, असे पवार म्हणाले. विशेष म्हणजे, वयाच्या ८४ व्या वर्षी सत्तेची सर्व पदे उपभोगून पवारांनी तरुणांना संधी देण्यासाठी राजकारण संन्यासाची घोषणा केली नाही, तर फक्त संकेत दिला. 'करून करून भागले आणि देवपूजेला लागले', असे पवारांच्या या निर्णयाचे वर्णन करता येईल.



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा प्रचार सुरू झाला असताना शरद पवार यांनी ही घोषणा करून निवडणुकीला भावनात्मक वळण देण्याचा प्रयत्न केला, असे म्हणायला हरकत नाही. पवारांनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात आलेले अनेक नेते काळाच्या प्रवाहात संपले, पण पवार कायम आहे. पंतप्रधान तसेच राष्ट्रपतिपद वगळता अन्य बहुतांश महत्त्वाची पदे त्यांनी उपभोगली. कधी काय बोलायचे, निवडणूक कशी फिरवायची, चर्चेत कसे राहायचे, हे पवार यांना चांगल्या प्रकारे माहिती आहे.

जवळपास सहा दशकांपासून पवार महाराष्ट्राच्याच नाही तर, देशाच्या राजकारणातही सक्रिय आहे. पवारांना पराभव माहिती नाही. पवारांनी आतापर्यंत जेवढ्या निवडणुका लढवल्या, त्यातील एकाही निवडणुकीत त्यांना पराभवाचे तोंड पहावे लागले नाही. १९६७ मध्ये शरद पवार यांनी बारामती मतदारसंघातून विधानसभेची पहिली निवडणूक लढवली आणि जिंकली. पहिल्यांदाच आमदार झालेल्या पवार यांचा वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश झाला. १९७२ आणि १९७८ च्या विधानसभा निवडणुकीतही त्यांनी विजय मिळवला. १९७८ मध्ये वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात असताना पवार यांनी काँग्रेसच्या १२ आमदारांसह बाहेर पडत विरोधी पक्षांसोबत हातमिळवणी केली व वसंतदादांचे सरकार पाडले. जनता पक्षाच्या मदतीने त्यांनी पुलोदचे सरकार स्थापन करीत मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. २९ वर्षांचे पवार देशातील सवार्ंत तरुण मुख्यमंत्री होते. १९८० मध्ये इंदिरा गांधी सत्तेत आल्यावर त्यांनी विरोधी पक्षांची सरकारे बरखास्त केली, त्यात पवारांचे सरकारही बरखास्त झाले.

१९८४ ची लोकसभा निवडणूक पवारांनी लढवली आणि जिंकली. पण, राष्ट्रीय राजकारणात ते तेव्हा रमले नाही. १९८५ ची विधानसभा निवडणूक त्यांनी लढवली आणि जिंकली. लोकसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. यावेळी विरोधी पक्षनेते म्हणून त्यांच्याकडे जबाबदारी आली. ९ वर्षे विरोधी पक्षात राहिल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या उपस्थितीत पवार यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. राजीव गांधी यांनी शंकरराव चव्हाण यांचा मंत्रिमंडळात अर्थमंत्री म्हणून समावेश केल्यानंतर रिक्त झालेल्या जागी मुख्यमंत्री म्हणून पवार यांची निवड झाली. पवार दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. १९९० च्या निवडणुकीत पवारांच्या नेतृत्वात काँग्रेसला राज्यात स्पष्ट बहुमत मिळाले नसले तरी, काँग्रेस सर्वांत मोठा पक्ष ठरला. १२ अपक्ष आमदारांच्या पाठिंब्याने पवार यांनी तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. पवारांच्या मंत्रिमंडळातील विलासराव देशमुख, सुरुपसिंग नाईक आणि अन्य मंत्र्यानी पवारांविरुद्ध बंड पुकारले आणि हटवण्याची मागणी राजीव गांधींकडे केली, पण राजीव गांधींनी ती फेटाळली. ■

# डॉ. हीना गावित यांचा भाजपाला रामराम

◆ **मुंबई, ६ नोव्हेंबर**

नंदूरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा विधानसभा मतदारसंघाच्या भाजपाच्या माजी खासदार तसेच राष्ट्रीय प्रवक्त्या हीना गावित यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केल्यानंतर पक्षाला रामराम ठोकला आहे. प्राथमिक सदस्यत्वासह पक्षाच्या इतर पदांचाही त्यांनी राजीनामा पाठवला आहे.

बंडखोरीमुळे पक्षाची प्रतिमा मलिन होऊ नये म्हणून त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले आहे. हीना गावित या राज्याचे आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित यांच्या कन्या आहेत. विजयकुमार गावित नंदुरबार विधानसभा मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार आहेत. तर, अक्कलकुवा मतदारसंघातून हीना गावित महायुतीच्या विरोधात निवडणूक लढवत आहेत.

येथे हायव्होल्टेज लढत पाहायला मिळत आहे. अक्कलकुवा अक्राणी विधानसभा मतदारसंघात बंड केल्याने हीना गावित यांनी शिवसेनेचे विधान परिषदेचे आमदार आमश्या पाडवी आणि काँग्रेसच्या ॲड. के. सी. पाडवी यांच्यासमोर आव्हान उभे केलं आहे.

◀ *(तभा वृत्तसेवा)*



# छत्रपती शिवाजी महाराजांचे सुरतमध्ये मंदिर बांधणार

### उद्धव ठाकरेंची कोल्हापुरात घोषणा

◆ **कोल्हापूर, ६ नोव्हेंबर**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या कामात तुम्ही भ्रष्टाचार केला. केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यासाठी घाईघाईने पुतळा उभारून महाराजांचा अवमान केला. आम्ही केवळ पुतळे उभे करणार नाही तर, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर उभे करू तसेच महाराष्ट्रातच नाही तर सुरतमध्येही छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर उभारणार असल्याचे उबाटा गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी सांगितले.



इंग्रजांना विरोध करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत लुटली होती. त्याच सुरतेमध्ये महाराष्ट्राच्या पाठीत वार करून तुम्ही गद्दार घेऊन गेला होता. त्याच सुरतमध्ये शिवाजी महाराजांचे मंदिर बांधू. ५० खोके घेऊन तुम्ही महाराष्ट्र विकत घेऊ शकत नाही. तुमचे कितीही जन्म गेले तरी, माझा महाराष्ट्र तुमच्या खोक्यात मावू शकणार नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

**राज्यात आघाडीचे सरकार येणारच**

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार म्हणजे येणारच. आताची लढाई महाराष्ट्र प्रेमी विरुद्ध महाराष्ट्र द्रोही अशी आहे. आज मी साथ मागायला आलो आहे. राधानगरीची जनता गद्दाराला गाडल्याशिवाय राहणार नाही. मी उमेदवारी दिली, मान सन्मान दिला, प्रेम दिले. सगळे देऊन शिवसेनेसारख्या आईवर वार कसा काय करू शकता, असे म्हणत शिवसेना सोडलेल्यांवर ठाकरेंनी जोरदार टीका केली. सतेज पाटील आमच्यासोबत आहेत, हे पाहून मला आणखी बरे वाटले. येथील विजयाची जबाबदारी सतेज पाटील यांच्यावर टाकतो. शाहू महाराज आहेत, सतेज पाटील आहेत, असे वातावरण असले की मन भरून येत असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले.

◀ *(वृत्तसंस्था)*



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी मुंबईत मंगळवारी आयोजित जाहीर सभेत सहभागी झालेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थितांना अभिवादन करताना

## उद्धव ठाकरेंची जाहीर सभेत माफी

◆ **कोल्हापूर, ६ नोव्हेंबर**

महाविकास आघाडीचे उमेदवार के. पी. पाटील यांच्या प्रचारार्थ उद्धव ठाकरे यांची पहिली जाहीर सभा पार पडली. येथील जबाबदारी सतेज पाटील यांच्यावर टाकली असल्याचे त्यांनी सभेत सांगितले. याच सभेत उबाठाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी हात जोडून जाहीर माफी मागितली.

मधल्या कळात जे ग्रहण लागले होते, त्याची जबाबदारी माझी असल्याचे सांगत त्यांनी माफी मागितली. माझ्याकडून चूक झाली होती. पण, तुम्ही फार मोठ्या मनाचे आहात. त्याला सर्व काही दिले, आमदार केले, तुम्ही माझे ऐकले होते. पण, सर्व काही देऊनही तुमच्या पाठीवर वार करून आता छातीवर वार करण्यासाठी उभे राहिले आहेत. आमदारकी, मान सन्मान, प्रेम सर्व काही दिले. शिवसेना नावाच्या आईवर वार करणारा माणूस तुमचा होऊ शकतो का? पण सतेज पाटील सोबत आहेत, याचा आनंद आहे. येथील विजयाची जबाबदारी आता सतेज पाटील यांच्यावरच टाकली आहे, असे उद्धव ठाकरेंनी सांगितले.

◀ *(वृत्तसंस्था)*

## उद्धव ठाकरे, शरद पवारांचा इशारा केराच्या टोपलीत

◆ **मुंबई, ६ नोव्हेंबर**

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची वेळ सोमवारी दुपारी तीन वाजेपर्यंत होती. बंडखोरी टाळण्यासाठी महाविकास आघाडीतील तिन्ही घटक पक्षांच्या राज्य नेतृत्वाकडून बंडखोरांशी संपर्क करून उमेदवारी मागे घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यात काही प्रमाणात यश आले तरी, सर्वाधिक बंडखोरांची संख्या मविआतच दिसून येत आहे.

रामटेक विधानसभा क्षेत्रात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मुळक यांनी उद्धवसेनेचे उमेदवार विशाल बरबटे यांच्याविरोधात बंड कायम ठेवले आहे. यासोबतच अनेक मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढत पाहायला मिळेल, असे दिसते. बंडखोरांना नियंत्रणात आणण्यासाठी उद्धव ठाकरे आणि शरद पवारांनी एकत्रितपणे फोनाफोनी केली. त्यात पवारांना काही प्रमाणात यश आले तरी दोघांनी दिलेल्या इशाऱ्यांना काही बंडखोरांनी

# आता कुठे गेली महाराजांची प्रतिष्ठा?

### सतेज पाटलांनी छत्रपती घराण्याची इज्जत काढली

◆ **मुंबई, ६ नोव्हेंबर**

छत्रपती शिवाजी महाराजांप्रती भाजपा किंवा महायुतीतील कोणीही काही बोलले तरी हा महाराजांचा अपमान झाल्याचे सांगत नेहमी अंगावर येणारे मविआचे नेते आता सतेज पाटलांनी 'दम नव्हता तर अर्ज कशाला भरला' अशा शब्दांत छत्रपती घराण्याची इज्जत काढली. मात्र, मविआतील कोणीही ब्र उच्चारताना दिसले नाही. मधुरीमा राजे यांनी शेवटच्या क्षणी कोल्हापूर उत्तर मतदारसंघातून उमेदवारी अर्ज परत घेतला. त्या काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार होत्या. त्यांनी अचानक उमेदवारी अर्ज परत घेतल्यानंतर काँग्रेस नेते सतेज बंटी पाटील यांनी प्रचंड आगपाखड केली. खासदार छत्रपती शाहू महाराजांना वाट्टेल तशे बोलले. त्यानंतर महाराजांच्या



तर अर्ज कशाला भरला' अशा शब्दांत छत्रपती घराण्याची इज्जत काढली. पण, याचा कोणी निषेध केला नाही आणि सतेज पाटलांची कानऊघाडणी केली नाही. तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी अपमान केला नसताना, अपमान केल्याचे सांगणारे, नैसर्गिक आपत्तीने पुतळा पडला तर महाराजांचा अपमान केल्याचे सांगत आकांडतांडव करणारे आता छत्रपतींच्या घराण्याचा, छत्रपतींच्या गादीचा, वंशजांचा प्रत्यक्ष अवमान केल्यानंतर देखील शरद पवार, सुप्रिया सुळे, उद्धव ठाकरे, संजय राऊत, आदित्य ठाकरे, नाना पटोले आदी काँग्रेसी मंडळी आता मुग गिळून बसली आहे. त्यांच्या एका नेत्याने महाराजांच्या वंशजाचा थेट अपमान केल्यानंतरही यांना महाराजांचा अपमान वाटला नाही. गादी विरोधात काही लिहिले तरी, धमक्या द्यायला तथाकथित शिवप्रेमी व मविआचे समर्थक अग्रेसर असतात व त्यांच्या खानदानाचा उद्धार करतात. पण, इथे तर सतेज पाटलांनी त्याच राजघराण्यातील सूनेचा जाहीर अपमान केलाच, पण खुप खालच्या दर्जाची आक्षेपार्ह भाषा वापरली.

राजघराण्यातील सूनेविषयी आतापर्यंत वापरली गेलेली ही सर्वांत गलिच्छ भाषा आहे आणि यातून पुरोगामी महाराष्ट्रात स्त्री सन्मान व महिलांचा आदर केला जातो, ही जी काही पुडी सोडली जाते, ती पूर्णतः पोकळ आहे, हे संपूर्ण महाराष्ट्राने आज बघितले आहे. या ठिकाणी एखादा भाजपा नेता असता, तर महाचर्चा झाली असती आणि त्या नेत्याला जाहीर माफी मागायला लावून राजीनाम्याची मागणी केली असती व भाजपा विरोधात संपूर्ण महाराष्ट्रात एक वेगळाच नॅरेटीव्ह सेट केला असता. हाच काँग्रेस, ठाकरे गट, शरद पवार

# एकाच राज्यासाठी काम करायचे असल्यास मुख्यमंत्री व्हा!

### शरद पवार यांचा मोदींना टोला

◆ **पुणे, ६ नोव्हेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी केवळ गुजरातच्या विकासाचा विचार करतात. गुजरातशिवाय त्यांना इतर राज्ये दिसत नाहीत. म्हणूनच आपल्या महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला नेण्यात येत असल्याचे सांगत, ज्येष्ठ नेते शरद पवारांनी मोदींवर नाव न घेता हल्लाबोल केला.

पुण्यातील जाहीर सभेत ते बोलत होते. ते म्हणाले, माझ्याकडे जेव्हा राज्य होते, तेव्हा मी पुण्याचा विचार केला होता; कारण फक्त शेतीवर सगळे होणार नाही. पण, या सरकारने काय जादू केली, माहिती नाही. टाटा एअरबसचा कारखाना नागपूरवरून गुजरातमध्ये नेला. सेमी कंडक्टरचा एक कारखाना ज्याचे नाव वेदांता फॉक्सकॉन आहे, तो सुद्धा गुजरातमध्ये गेला. एकाच राज्यासाठी काम करीत असाल, तर तुम्ही पंतप्रधान का होता, राज्याचे मुख्यमंत्री व्हा, अशा शब्दांत शरद पवारांनी पंतप्रधान मोदींवर हल्लाबोल केला.

महाराष्ट्रात सत्ता बदलायला हवी. सत्ता बदलल्याशिवाय पर्याय देईल. मतदारसंघातील पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्या खोलात मी आता जात नाही. ज्यांच्याकडून झाले नाही, त्यांनासुद्धा विश्वासात घेत युगेंद्र यांच्या पाठीशी मी आणि माझे सहकारी उभे राहू, मला काही नको, आमदारकी नको, खासदारकी नको. मला फक्त तुमची राहिलेले कामे पूर्ण करायची आहेत, असे म्हणत शरद पवार यांनी युगेंद्र पवारांच्या पाठीशी राहण्याचे आवाहन बारामतीकरांना केले.

◀ *(वृत्तसंस्था)*

### अजित पवारांना टोला

» राज्याचे नेतृत्व कोणीही करेल, त्याच्या पाठीशी आम्ही भक्कमपणे उभे राहू. काही सांगतात, मी लोकांना सांगेल, भावनिक आवाहन करेल, पण त्याची काही गरज नाही. मी माझ्या लोकांना ओळखतो, असे म्हणत शरद पवारांनी अजित पवारांना टोला लगावला. आपल्या विचारांचे सरकार आले तर, युगेंद्र इथले प्रश्न सोडवेल, असा विश्वास शरद पवार यांनी व्यक्त केला. ■

